मंगळवार
१९
ऑगस्ट २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १६८
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग



मेस्सीचा ८७५ गोलांचा टप्पा पार!
(पान ७ वर)

## शेतीचे सर्वाधिक नुकसान : शाळांना सुट्टी जाहीर

# राज्यभरात पावसाचा धुमाकूळ!

**मुंबई, दि. १८** वृत्तसंस्था

राज्यभरात धुवाधार पाऊस सुरू आहे. मुंबई, कोकणासह विदर्भ, मराठवाड्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. नवी मुंबई आणि ठाण्यातही मुसळधार पाऊस सुरू आहे. तर मराठवाड्यात पावसामुळे आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. नांदेडमध्ये ५ जण बेपत्ता असून, २००हून अधिक ग्रामस्थ अडकले आहे.

अतिमुसळधार पावसामुळे मराठवाड्यात शेतीचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. दरम्यान, एनडीआरएफची १ टीम, एक लष्करी पथक आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून बचाव कार्य सुरू आहे. मुंबईतील सखल भागात पाणी साचले असून पावसामुळे वाहतूक मंदावली आहे. तसेच लोकल वाहतूकही उशिराने सुरु आहे. पावसामुळे मुंबईतील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तर मुंबईसह ठाणे आणि कोकणात पुढील ४८ तास रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. खबरदारीच्या पार्श्वभूमी ठाणे, नवी मुंबई आणि बुलडाणा येथे उद्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. बुलडाण्यातील चिखली आणि मेहकर तालुक्यात पावसाचा हाहाकार सुरू आहे. त्यामुळे फक्त या दोन तालुक्यातील शाळा उद्या बंद राहणार आहेत. दरम्यान पावसाचे अलर्ट लक्षात घेऊन उद्या शाळांना सुट्टी देण्यासंदर्भात निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्यात सोमवारी पहाटेपासून जोरदार पाऊस सुरु झाला. मुखेड तालुक्यात पहाटे झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे अनेक गावात हाहाकार उडाला. नांदेडमध्ये ४ ते ५ जण वाहून गेल्याची प्राथमिक माहिती मिळते. या आपत्तीमुळे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. पूरात अडकलेल्यांना एसडीआरएफरच्या टीमने बाहेर काढले. बुलडाण्याच्या चिखली आणि मेहकर तालुक्यात पावसाचा कहर पाहायला मिळाला. आज आणि उद्या तालुक्यातील सर्व शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला. बुलडाणा जिल्ह्याच्या चिखली आणि मेहकर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी सुरू आहे. या अतिवृष्टीमुळे शहर आणि तालुक्यात बिकट प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी नदी नाले काठाच्या बाहेरून वाहत आहे. मन प्रकल्पाचे सर्व पाच दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले असून मन नदीकाठच्या गावांना व नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. हिंगोली जिल्ह्यात सुरू असलेल्या दमदार पावसाने ओढे नदी नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठी असलेली पैनगंगा नदी धोक्याच्या पातळीने वाहत आहे. विदर्भात होत असलेल्या पावसाचे पाणी हिंगोलीच्या ईसापूर धरणात येत आहे. त्यामुळे ईसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढविला जात आहे. याच पैनगंगेने रौद्ररूप धारण केल्याचे बघायला मिळत आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. आज सकाळपासून मुंबईसह, मुंबई उपनगरात मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे नाले तुडुंब भरून वाहण्याची, रस्ते वसाहती जलमय होण्याची, वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता असून नागरिकांनी अत्यंत सतर्क राहण्याची गरज आहे. मध्य रेल्वेची वाहतूक १० ते १५ मिनिटं उशिराने, तर हार्बर रेल्वे ५ मिनिटं उशिरा धावत आहे. मराठवाड्यात बीड, लातूर आणि नांदेडमध्ये पूरस्थिती गंभीर आहे. नांदेडच्या मुखेडमध्ये २०६ मिमी पाऊस पडला, ५ जण बेपत्ता झाले, तर १५० हून अधिक जनावरे वाहून गेली. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथकांनी २२६ लोकांना सुरक्षित काढले. अमरावतीत २ लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले. पुणे विभागात कोल्हापूर-सातारा घाटात रेड अलर्ट आहे, तर अलमाटी धरणाच्या पाण्यावर कर्नाटक सरकारशी समन्वय साधला जात आहे. मुंबईत ४८ तासांत २०० मिमी पाऊस पडला, चेंबूरमध्ये सर्वाधिक १७७ मिमी नोंदले गेले. रेल्वे वाहतूक मंदावली असली तरी सुरळीत आहे. समुद्रात ३-४ मीटर उंच लाटांची शक्यता असून, नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. कोकणातील जगबुडी, अंबा, पुंडलिका आणि वसिष्ठी नद्यांची पाणी पातळी इशारा स्तरावर आहे. चिपळूणमध्ये पूर टाळण्यासाठी वसिष्ठी नदीवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. राज्यात पुढील २४ तासासाठी मुंबई, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट आणि कोल्हापूर घाट या भागात रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर पालघर, ठाणे, सिंधुदुर्ग, जळगाव,

(पान २ वर)







### हवामानाचे तिहेरी गणित

राज्यात पावसाच्या या जोरदार पुनरागमनामागे एक-दोन नव्हे, तर तब्बल तीन हवामान प्रणाली कार्यरत आहेत.

**बंगालचा उपसागर :** बंगालच्या उपसागरापासून आंध्र प्रदेश आणि ओडिशा किनारपट्टीपर्यंत एक कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय झाले आहे, जे पुढील १२ तासांत तीव्र कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतरित होणार आहे.

**अरबी समुद्र :** ईशान्य अरबी समुद्रापासून गुजरातपर्यंत हवेच्या वरच्या थरात एक चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे.

**द्रोणीय स्थिती :** दक्षिण कोकणापासून उत्तर केरळपर्यंत एक द्रोणीय स्थिती तयार झाली आहे.

या तिहेरी संगमामुळे राज्यात पावसासाठी अत्यंत पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

### महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा

पुढील ४ ते ५ दिवसांत महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. १८ ऑगस्ट रोजी बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र विकसित होण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरावर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे कोकण, घाट परिसर, मराठवाडा, विदर्भातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. पावसाचा जोर वाढल्यास काही भागांत तालुक्यातील नद्यांमध्ये पुरसदृश स्थिती निर्माण होऊ शकते.

### फडणवीसांकडून पावसाचा आढावा



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा कंट्रोल रूममधून आढावा घेतला. जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, राज्यात ४ लाख हेक्टर शेती पावसामुळे बाधित झाली आहे. यवतमाळ, नांदेड, वर्धा, बीड आणि वाशीम येथे सर्वाधिक नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त भागात उपाययोजनांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, गेल्या दोन दिवसांत अतिवृष्टीमुळे कोकण, मराठवाडा आणि विदर्भात मोठी हानी झाली आहे. १८ ते २१ ऑगस्टदरम्यान पुन्हा अतिवृष्टीचा अंदाज असून, १५-१६ जिल्ह्यांत रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आले आहेत.

### सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा - शिंदे



राज्यात अनेक ठिकाणी सुरू झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केली आहे. राज्यात विशेष अधिवेशन बोलविण्याची मागणी करतानाच सरकारने तातडीने शेतकऱ्यांना पंचनामे न करता मदत जाहीर करावी, अशी पुरवणी मागणीही त्यांनी जोडली आहे.

## महत्त्वाचे

### राज्यपालांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट



**नवी दिल्ली :** एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आज दिल्लीत पोहोचले. विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यासाठी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि अनेक वरिष्ठ भाजप नेते उपस्थित होते. महाराष्ट्राच्या राज्यपालांचे यावेळी दिल्लीत जोरदार स्वागत करण्यात आले. दिल्लीत पोहोचल्यानंतर राधाकृष्णन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधान मोदींना भेटल्यानंतर सी.पी. राधाकृष्णन यांनी सोशल मीडियावर त्यासंबंधीत माहिती आणि फोटो देखील पोस्ट केला आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, आज मला आमचे प्रिय जननेते, आमचे सर्वात आदरणीय माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नवी दिल्लीत भेटून अभिमान वाटत आहे.

### त्र्यंबकेश्वर मंदिरात भाविकांना मारहाण



**त्रंबकेश्वर :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे बाहेरगावहून येणाऱ्या भाविकांची दर्शन घेताना गैरसोय होऊ नये यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असल्याचा दावा देवस्थानच्यावतीने केला जातो. परंतु, ढिसाळ नियोजनाचा फटका भाविकांना बसत आहे. दर्शन व्यवस्थेत अकस्मात बदल केल्यामुळे उद्भवलेल्या वादात सुरक्षारक्षकांनी भाविकांना मारहाण केली. तिथे पोलीस होते. या घटनेच्या चित्रफिती समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्या. त्र्यंबकेश्वर येथे श्रावण सोमवार, महाशिवरात्र याशिवाय आठवड्याचे शनिवार, रविवार, काही वेळा सुट्टी असल्यावर भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर होते. या उत्सव काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून विशेष बंदोबस्त तैनात केला जातो. मधल्या काळात देवस्थानने ऑनलाईन देणगी दर्शनाची व्यवस्था केली. मात्र, या व्यवस्थेत आर्थिक घोटाळा झाल्याचे समोर आले. या प्रकरणात त्र्यंबकेश्वर पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेत देवस्थानच्या ऑनलाईन देणगी दर्शन पध्दतीवर प्रश्नचिन्ह उभे केले होते.

### चीनचे परराष्ट्र मंत्री भारत दौऱ्यावर



**नवी दिल्ली :** चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी आज सोमवारपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. या दौऱ्यात ते भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्यासोबत महत्त्वपूर्ण चर्चा करणार आहेत. भारत-चीन सीमावाद आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्यावर या भेटीत भर दिला जाईल. या भेटीला विशेष महत्त्व आहे, कारण २०२० मध्ये गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते. त्यानंतर हे संबंध सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. वांग यी यांचा हा दौरा त्याच प्रयत्नांचा एक भाग मानला जात आहे. या भेटीदरम्यान, वांग यी आणि अजित डोभाल यांच्यामध्ये भारत-चीन सीमा प्रश्नावर विशेष प्रतिनिधी स्तरावरील २४ व्या फेरीची चर्चा होणार आहे. तसेच, एस. जयशंकर यांच्यासोबतच्या बैठकीत व्यापार, गुंतवणूक आणि इतर द्विपक्षीय मुद्द्यांवरही चर्चा अपेक्षित आहे.

## केरळ : देशातील पहिले 'डिजिटल साक्षर' राज्य म्हणून घोषित!

**थिरुवनंतपुरम, दि. १८** वृत्तसंस्था

केरळने एक ऐतिहासिक टप्पा गाठत स्वतःला देशातील पहिले 'संपूर्ण डिजिटल साक्षर' राज्य म्हणून स्थापित केले आहे. २०२२ मध्ये सुरू झालेल्या एका महत्त्वाकांक्षी मोहिमेने चार वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर हे यश मिळवले आहे.



या मोहिमेमुळे राज्यातील १४ ते ६५ वयोगटातील ९९.९८ टक्के नागरिक आता स्मार्टफोन वापरणे, डिजिटल पेमेंट करणे आणि ऑनलाईन शासकीय सेवांचा लाभ घेण्यास सक्षम झाले आहेत. येत्या २१ ऑगस्ट रोजी याची अधिकृत घोषणा होणार असून, या उपक्रमाने लाखो नागरिकांना डिजिटल जगाशी यशस्वीपणे जोडले आहे. 'डिजी केरळ' या नावाने राज्यभरात राबवलेल्या या प्रकल्पाने केवळ तंत्रज्ञानाचा प्रसार केला नाही, तर सामान्य नागरिकांच्या जीवनात मोठा बदल घडवून आणला आहे. या मोहिमेची सुरुवात थिरुवनंतपुरम जिल्ह्यातील 'पुल्लमपारा' या ग्रामपंचायतीपासून झाली, जी देशातील पहिली संपूर्ण डिजिटल साक्षर पंचायत ठरली होती. या यशस्वी प्रयोगातून प्रेरणा घेत 'डिजी केरळ' मोहिमेची व्याप्ती संपूर्ण राज्यात वाढवली. या कार्यक्रमांतर्गत सुमारे २१.८७ लाख केरळवासीयांना डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण दिले. विशेष म्हणजे या अभियानाची सुरुवात ६५ वर्षांपर्यंतच्या नागरिकांना लक्ष्य करून करण्यात आली होती. मात्र, याला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. प्रशिक्षण पूर्ण केलेल्यांमध्ये १,५०० हून अधिक नवसाक्षर नागरिक हे ९० वर्षांपेक्षा जास्त वयाचे होते, हे या योजनेच्या सर्वसमावेशकतेचे उत्तम उदाहरण आहे. मोहिमेंतर्गत डिजिटल साक्षरतेची व्याख्या निश्चित केली असून यामध्ये स्मार्ट फोनचा प्रभावी वापर करता येणे, इंटरनेटच्या माध्यमातून माहिती शोधणे, शासकीय सेवांसाठी असलेले मोबाईल ॲप्स आणि वेब पोर्टल्स वापरता येणे आणि विविध डिजिटल माध्यमांतून आर्थिक व्यवहार करणे यांचा समावेश आहे.

## मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग प्रस्ताव?

### इंडिया आघाडी मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत!

**नवी दिल्ली, दि. १८** वृत्तसंस्था

इंडिया आघाडीचे नेते मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव मांडण्याच्या विचारात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यसभेतील खासदार आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बैठकीत या विषयावर चर्चा झाल्याचं बोललं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.



लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी मागील काही दिवसांपासून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर टीका करत आहेत. मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप राहुल गांधी करत आहेत. या संदर्भात काही दिवसांपूर्वी राहुल गांधींनी एक पत्रकार परिषद घेत काही पुराव्यांचं सादरीकरण केलं होतं. राहुल गांधींनी केलेल्या आरोपानंतर देशभरात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, राहुल गांधींच्या आरोपानंतर निवडणूक आयोगाने १७ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषद घेत आरोपांना उत्तर देत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच राहुल गांधींच्या मत चोरीच्या आरोपांना निवडणूक आयोगाने काही नेते मतदारांची दिशाभूल करत असल्याचं म्हटलं. मात्र, निवडणूक आयोग अशा खोट्या आरोपांना घाबरत नाही. तसेच मतचोरी सारख्या चुकीच्या शब्दाचा वापर करण्यात आल्यामुळे हा भारतीय संविधानाचा अपमान असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं. तसेच राहुल गांधी यांनी मत चोरीच्या आरोपांबाबत सात दिवसांत शपथपत्र सादर करावं किंवा देशाची माफी मागावी असा इशारा निवडणूक आयोगाने दिला. निवडणूक आयोगाने केलेल्या या टिकेनंतर आता विरोधक चांगलेच आक्रमक झाल्याचं बोललं जात आहे. कारण इंडिया आघाडीचे नेते मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव मांडण्याच्या विचारात असल्याची चर्चा राजकीय (पान २ वर)

## देशी ॲपची गरज! स्टेट बँक ऑफ इंडियाचा धक्कादायक अहवाल

# भारतातील यूपीआय व्यवहार धोक्यात?

**मुंबई, दि. १८** वृत्तसंस्था

भारताला आर्थिक व्यवहारांच्या डेटाचा सुरक्षितपणे वापर करायचा असेल, तर परदेशी पेमेंट प्लॅटफॉर्मवर अवलंबून न राहता, भारताला देशी आणि प्रभावी यूपीआय (युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस) ॲपची गरज आहे, असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात नमूद करण्यात आला आहे.




सध्या देशातील यूपीआय प्रणालीवर काही मोजक्या थर्ड-पार्टी ॲप प्रोव्हायडर्सचे वर्चस्व असून, त्यातही फोनपे, गुगल पे आणि पेटीएम सारख्या कंपन्या आघाडीवर आहेत. या कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक किंवा मालकी असल्यामुळे, देशातील कोट्यवधी नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांचा डेटा त्यांच्या हातात आहे. ही बाब देशाच्या भविष्यातील डेटा सुरक्षेसाठी आणि आर्थिक स्वायत्ततेसाठी चिंतेची असून भारताला देशी काउंटर इन्ट्युटिव्ह यूपीआय ॲपची आवश्यकता असल्याचे एसबीआयच्या अहवालात म्हटले आहे.जागतिक मॉडेल्सचे अनुकरण करण्याऐवजी, भारताच्या विशिष्ट गरजांवर लक्ष केंद्रित करणारे देशी ॲप तयार करण्याचे महत्त्व अहवालात सांगितलं आहे. पूर्णपणे स्वदेशी यूपीआय ॲपमुळे केवळ व्यवहारांच्या डेटाचे संरक्षण होणार नाही, तर देशातील फिनटेक क्षेत्रातील नवनिर्मिती ही भारताच्या गरजा आणि प्राधान्यक्रमांशी सुसंगत राहील, याचीही खात्री मिळेल, असे अहवालाच्या शेवटी म्हटले आहे.

### देशी ॲपची गरज का?

यूपीआयने डिजिटल पेमेंट्समध्ये क्रांती घडवून आणली असली तरी, पूर्णपणे स्वदेशी ॲप नसल्यामुळे डेटा-कंट्रोल आणि इनोव्हेशनच्या दृष्टीने दीर्घकालीन आव्हाने निर्माण होऊ शकतात. सध्याच्या घडीला यूपीआय संबंधीचा बहुतेक डेटा काही मोजक्या मोठ्या कंपन्यांकडे एकवटलेला आहे. त्यापैकी बहुतांश प्लॅटफॉर्मवर परदेशी मालकी किंवा प्रभाव आहे. अशा परिस्थितीत, डिजिटल कर्ज, विमा आणि इतर फिनटेक सेवांमध्ये डेटा हा इनोव्हेशनचा मुख्य घटक बनत असल्याने, भारतासाठी ही स्थिती योग्य नाही, असे अहवालात म्हटले आहे.



## छायाचित्रकारांची रंगतदार परंपरा अकोला महानगरात भव्य कॅमेरा दिंडीचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १८ :** जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त अकोला-बुलडाणा जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशनतर्फे यावर्षीही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत मंगळवार, दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता स्थानिक श्री. राजेश्वर मंदिर येथून ''भव्य कॅमेरा दिंडी''चे आयोजन करण्यात आले असून, जिल्ह्यातील सर्व हौशी व व्यावसायिक छायाचित्रकार या दिंडीत सहभागी होणार आहेत.

या दिंडीचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या हस्ते होणार आहे. श्री. राजेश्वर मंदिरापासून सुरू होणारी ही दिंडी जयहिंद चौक, मोठा पूल, सिटी कोतवाली, गांधी चौक, मनपा चौक मार्गे स्वराज्य भवन येथे येऊन समारोप होणार आहे. छायाचित्रकार आपल्या कॅमेऱ्यांसह व छायाचित्रण उपकरणांसह एकत्र येऊन या दिंडीला रंगतदार रूप देणार आहेत.

असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र नायसे, उपाध्यक्ष नीरज भांगे, दिग्विजय देशमुख, सचिव नितीन देशमुख, सहसचिव उमेश चाळसे, दत्तात्रय सरोदे, कोषाध्यक्ष योगेश उन्होने तसेच सुशील बडेरे, शामसुंदर बाळे, महेश इंगळे, हर्षल गढेकर, राहुल ताडे, गणेश खेते, राज पिंपळे, प्रविण अंबिलकर, पंकज पराते यांसारखे पदाधिकारी या दिंडीच्या आयोजनात सक्रिय आहेत.

याशिवाय असोसिएशनतर्फे रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता वाडेगाव रस्त्यावरील अवनीश कृषी पर्यटन केंद्र येथे ''जलजल्लोष'' या वार्षिक आनंदोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. छायाचित्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित या कार्यक्रमात संगीत खुर्ची, दहीहंडी, पारंपरिक वेशभूषा स्पर्धा, कॅमेरा पूजन, सांस्कृतिक कार्यक्रमांसह वॉटर व ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटींची उत्साही मेजवानी असणार आहे.

फोटोग्राफर्स असोसिएशन केवळ छायाचित्रणापुरती मर्यादित न राहता समाजकार्यातही सातत्याने सक्रिय असते. आतापर्यंत पालखी स्वागत सोहळे, गणेश विसर्जन मिरवणुकीतील छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शने, काटेपूर्णा अभयारण्य फोटो वॉक, कोजागिरी निमित्त सांस्कृतिक उपक्रम, गरजूंना १०० ब्लँकेटचे वाटप, ज्येष्ठ छायाचित्रकारांचा गौरव, महिलांचा सत्कार, विमा शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त आयोजित होणाऱ्या या कॅमेरा दिंडीत जिल्ह्यातील सर्व छायाचित्रकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन अकोला-बुलडाणा जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

# पान 1 वरून...

## राज्यभरात पावसाचा ...

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. आपत्तीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे. पालघर, रायगड आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना १९ व २० ऑगस्टपर्यंत ३.५ ते ४.२ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत समुद्राची स्थिती खवळलेली व ताशी ५०-६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशारा देण्यात आला आहे. सर्व जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**हतनूरचे २० दरवाजे उघडले!**

**जळगाव :** हतनूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या ४८ तासांत जोरदार पाऊस झाल्याने धरणातील पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पाण्याच्या वाढत्या आवकेमुळे १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता धरणाचे ४ दरवाजे पूर्णपणे आणि १६ दरवाजे एक मीटरने उघडण्यात आले होते. त्यानंतर पाण्याची पातळी वाढल्याने सोमवार (दि.१८) रोजी दुपारी १ वाजता ६ दरवाजे पूर्णपणे व १४ दरवाजे एक मीटरने उघडण्यात आले.

**सतर्कतेचा इशारा : कुठे रेड, कुठे ऑरेंज?**

हवामान खात्याने विविध जिल्ह्यांसाठी खालीलप्रमाणे अलर्ट जारी केले आहेत :

**रेड अलर्ट (अतिवृष्टीचा इशारा)**

१९ ऑगस्ट : पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, नाशिक घाट, पुणे घाट, सातारा घाट.

ऑरेंज अलर्ट (मुसळधार पावसाची शक्यता)

१९ ऑगस्ट : सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट, गडचिरोली.

२० ऑगस्ट : पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, नाशिक घाट, पुणे घाट, कोल्हापूर घाट, सातारा घाट.

२१ ऑगस्ट : पुणे घाट.

यलो अलर्ट (मध्यम पावसाची शक्यता)

१९ ऑगस्ट : सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे शहर, कोल्हापूर, गडचिरोली, तसेच मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश जिल्हे.

२० ऑगस्ट : सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक, मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश जिल्हे.

२१ ऑगस्ट : पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, नाशिक घाट, सातारा घाट, पुणे शहर, सातारा शहर.

२२ ऑगस्ट : पुणे घाटमाथा.

## मुख्य निवडणूक ...

वर्तुळात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यसभेतील खासदार आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बैठकीत या विषयावर चर्चा झाल्याचं बोललं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. विरोधी पक्ष नेत्यांच्या पत्रकार परिषदेत राजदचे नेते मनोज कुमार झा यांनी म्हटलं की, आमच्यासमोर सर्व संसदीय आणि कायदेशीर पर्याय खुले आहेत. दरम्यान, महाभियोगाच्या सूचनेची शक्यतेनंतर भाजपाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. दरम्यान, या घडामोडींवरून आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण तापण्याची शक्यता आहे. जेव्हा निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून भारताच्या मतदारांना लक्ष्य करत राजकारण केले जाते, अशावेळी निवडणूक आयोग प्रत्येकाला स्पष्ट करू इच्छितो की निवडणूक आयोग गरीब, श्रीमंत, वृद्ध, महिला, तरुण यासह सर्व स्तरातील, सर्व धर्माच्या सर्व मतदारांबरोबर कोणताही भेदभाव न करता खंबीरपणे उभा आहे. पुढे बोलताना त्यांनी राहुल गांधी यांनी केलेली वक्तव्य ही संविधानाचा अपमान असल्याचे म्हटले आहे, तसेच मत चोरी यासरखे शब्द हे लोकशाही संस्थांना कमकुवत करतात असेही निवडणुक आयुक्त म्हणाले.

**लोकशाहीची गळचेपी**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, भारतीय निवडणूक आयोग आपले संविधानिक कर्तव्य सोडून राजकीय पक्षांच्या खऱ्या प्रश्नांना टाळू शकत नाही. मतदानाचा अधिकार हा भारतीय संविधानाने आपल्याला दिलेला सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे. लोकशाहीची गळचेपी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाचा भारत निषेध करेल.

# वीस लाखांच्या निधीतून मनपाच्या शाळा होणार सुसज्ज

## शैक्षणिक साहित्यासह विद्यार्थ्यांना मूलभूत सोयी,सुविधा पुरविणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १८ :** महापालिका शाळेच्या इमारती सुसज्ज करण्यासाठी प्रशासनाने पाऊल उचलले असून शैक्षणिक साहित्यासह मूलभूत सोयी सुविधा व पूरक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी पुढाकार घेतला आहे. २० लाख रुपयांच्या मनपा निधीतून ही कामे करण्यात येणार आहेत. आयुक्त यांच्या आदेशानुसार शिक्षण विभागाने प्रस्ताव तयार केला आहे.

महापालिकेच्या मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती व सिंधी अशा ३१ शाळा असून यामध्ये मराठी मुलांची शाळा क्रमांक १,२,४, ७, ९, १२, १४, १६ तसेच मराठी कन्या शाळा क्र. ७, हिंदी बालक शाळा क्रमांक १,२,६,८, सिंधी हिंदी, गुजराती व उर्दू मुलांची शाळा क्रमांक १,२,६,७,८,९,१०,११,१२, उर्दू कन्या शाळा क्रमांक १,३,४ आणि क्र. ५ यांचा समावेश आहे. या शाळांमध्ये २० लाख रुपयांच्या मनपा निधीतून शाळांच्या इमारती सुसज्य करण्यासह विविध कामे केली जाणार आहे. यामध्ये डिजिटल एलईडी बोर्ड दुरुस्ती करिता कंत्राटदाराकडून प्रस्ताव मागविण्यात येणार असून जिल्हा नियोजन समितीकडे ६० डिजिटल बोर्डची मागणी प्रस्तावित आहे. शाळानिहाय सर्वेक्षण करून टेबल-बेंच उपलब्ध करून देण्यासाठी खरेदीची प्रक्रिया राबविली जाणार आहे. याशिवाय बंद असलेले विद्युत उपकरणे दुरुस्त करण्यासह नव्याने विद्युत उपकरणे खरेदी करण्यासाठी प्रक्रिया पार पाडण्यात येईल. स्वच्छतागृहांची देखभाल व दुरुस्तीसह रंगरंगोटी करण्यासाठी बांधकाम विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. सर्व शाळांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची नियमित व्यवस्था करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे शाळेच्या पटसंख्येप्रमाणे आर. ओ. मशीनची मागणी करण्यात आली आहे.

> महापालिकेच्या शाळा सर्व सुविधांसह सुसज्ज करण्यासाठी आयुक्त यांच्या निर्देशाप्रमाणे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून अंदाजे १५ ते २० लाख रुपयांची मागणी करण्यात येणार आहे. ही सर्व कामे शासन व मनपा निधीतून केली जातील.
>
> - **हरिश्चंद्र इटकर,** शिक्षणाधिकारी, महापालिका

## अकोला जिल्ह्यात 'ओल्या दुष्काळा'ची मागणी; शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ :** अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे शेतकरी व नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. लाखपुरी व परिसरासह पातुर, बालापूर, अकोट तालुका तसेच जिल्ह्यातील विविध भागांमध्ये झालेल्या पावसामुळे कपाशी, तूर, सोयाबीन, मुग, उडीद या पिकांवर पाण्याचा मारा झाला असून मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये पाणी शिरल्याने घरे कोसळली, अन्नधान्य व घरगुती साहित्य वाहून गेले असून शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे प्रदेश संगटक सचिव जावेद ज़करिया यांनी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी मार्फत निवेदन सादर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी केली आहे. निवेदनात पिक विमा कंपनीकडून कापणी प्रयोग न करता सरसकट पिक विमा देण्यात यावा, प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत द्यावी, शेतकरी व गावकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व जीवनावश्यक वस्तू पुरवाव्यात, राज्यात झालेल्या प्रचंड पावसामुळे 'ओला दुष्काळ' जाहीर करावा तसेच शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे दोन दिवसांचे विशेष अधिवेशन तातडीने बोलवावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

> या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. शशिकांत शिंदे यांनीही शासनाने या मागण्या तातडीने मान्य करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या निवेदनामुळे अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या सरकारच्या निदर्शनास आल्या असून शासनाने तातडीने निर्णय घेऊन मदतकार्य सुरू करावे, अशी सर्व स्तरांतून मागणी होत आहे.

## पातूर तालुक्यात झालेल्या ढगफुटीमुळे निर्गुणा नदीला मोठा पूर!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बाळापूर, दि. १८ :** गेल्या दोन दिवसा पासून दमदार पाऊस सुरु असल्याने तालुक्यात निर्गुणा व मन नदीला मोठा पुर आल्याने गावाचे संपर्क तुटले व काही ठिकाणी कामा निमित्य घराबाहेर पडलेले नागरीकांना मध्ये तारांबळ उडाली होती तर झाल्याले पाउसाने व पुराने तालुक्यातील अनेक गावातिल शेती मधील पिके उध्वस्त झाल्याचे शेतकरी वर्गाकडून सांगण्यात येत आहे तसेच गावा मध्ये पुरा पाणी शिरले तर काही भागात जनावरे वाहून गेल्याचे समजते तर निर्गुणा नदीपुलावरून पाणी वाहत असल्याने अनेक वाहन चालक पाण्यामधून आपला मार्ग काढत आहेत तर वाडेगावातिल नाल्याकाठील घरामध्ये पुराचे पाणी शिरल्यामुळे आपले जिवन उपयोगी वस्तू व लहाण मुलाना घरा बाहेर घेऊन जाताना नागरीक दिसत आहेत.

तर बाळापूर शहरातील दोन्ही कडील नदी च्या पुलावरून पुराचे पाणी वाढत असल्याने बाळापूर शहारचे संपर्क तुटला व शहरात जाणारी बसेस तसेच शाळेकरी विद्यार्थी काही ठिकाणी घरापासून संपर्क तुटल्याने ते जाग्यावरच आहेत आणि शेतीमध्ये पाणी गेल्याने अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे व तसेच फळ बागाचे मोठ्या प्रमणात नुकसान झाल्याचे आढळून येत आहे तर पुराचे पाणी पातळी वाढत असताना वाडेगाव मधील तलाठी शैलेश इंगळे यानी पुर ग्रस्तांची व पुराची पहानी करुण सर्वे केला.

## रक्तदान शिबिरात १२१ रक्तदात्यांचा सहभाग

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर , दि. १८:**भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त मुर्तिजापूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ ब्लड डोनर्स अँड हेल्पर्स ग्रुपच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल १२१ रक्तदात्यांनी रक्तदान करून स्वातंत्र्यदिन साजरा केला.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, एखाद्या आजारी किंवा गरजू बांधवाचे प्राण वाचविण्यासाठी रक्तदानाची महती अधोरेखित करण्यात आली. शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या शिबिरासाठी ग्रुपचे रवी माडकर व सहकारी यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी अनेकानी भेट देऊन रक्तदात्यांचे मनोबल वाढविले तसेच या उपक्रमाचे कौतुक केले.

## नि:स्वार्थ रुग्णसेवा परिवाराकडून सूर्योदय बालगृहात रक्षाबंधन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १८:** समाजसेवेसाठी सदैव तत्पर असलेला निस्वार्थ रुग्णसेवा परिवार महाराष्ट्र राज्य विविध उपक्रम राबवित असतो. रक्तदान, अन्नदान, वस्त्रदान तसेच शासकीय रुग्णालये व बालिकाश्रमांमध्ये विविध सेवा देत हा परिवार समाजकार्यात अग्रेसर आहे. याच परंपरेत १६ ऑगस्ट २०२५ रोजी सूर्योदय बालगृह, मलकापूर येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचा उद्देश बालगृहातील मुलांना भावंडाचे प्रेम अनुभवता यावे, रक्षाबंधनाचे बंधन त्यांच्याही आयुष्यात घट्ट व्हावे हा होता. बालगृहातील मुलींनी मुलांना राख्या बांधल्या तर निस्वार्थ परिवाराने शालेय साहित्य व नाश्त्याचे वाटप केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सौ. अर्चना भाभी शर्मा यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. चंदाताई शर्मा (माजी महिला मोर्चा महानगराध्यक्ष व भाजपा महानगर उपाध्यक्ष), सौ. वैशाली शेळके (महिला मोर्चा महानगराध्यक्ष भाजपा), माजी महापौर सौ. सुमन गावंडे, सौ. प्रणिता समरीतकर (खडकी मंडळाध्यक्ष) तसेच सौ. अस्मिता वगारे, सौ. उज्वला भरणे, सौ. अश्विनी महानकार, सौ. माया मेंढे, सौ. शिका तायडे, सौ. लीना चिम, सौ. सुषमा जावंदिया, सौ. सपना मगर, गौरी सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक विनोद मापारी, राजु वगारे, सचिन देशमुख, विजय टोळे, अमोल क्षिरसागर, रविंद्र येवतकर, अभिजित मुळे, संग्राम इंगळे, विशाल गुंजाळे, जाधव सर, यश गिरे, सचिन सातपुते आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता शेळके यांनी केले तर आभार प्रदर्शन निस्वार्थ रुग्णसेवा परिवाराचे संस्थापक सचिव अतुल भांगे यांनी केले.

## स्वातंत्र्यदिनी वृक्षप्रेमी सुनील गोहर यांचा महापालिकेतर्फे सन्मान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. १८:** स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने अकोला महानगरपालिकेच्या वतीने पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वृक्षप्रेमींचा सन्मान करण्यात आला. यामध्ये मनपा कर्मचारी व पर्यावरणप्रेमी सुनिल मधू गोहर यांना मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या ''हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र'' या अभियानाच्या चौकटीत अकोला महापालिकेने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन या उपक्रमाला गती दिली आहे. या उपक्रमात गोहर यांनी स्वतः सक्रिय सहभाग नोंदवूनच थांबले नाहीत, तर नागरिकांनाही मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेतले. शहरातील शासकीय जागा, शाळा परिसर तसेच रस्त्यालगत वृक्षलागवडीसाठी त्यांनी केलेले प्रबोधन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी विशेष उल्लेखनीय ठरले.

पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, याची जाणीव गोहर यांनी आपल्या कामातून करून दिली. मनपाकडून त्यांचा गौरव केल्याने पर्यावरणप्रेमी नागरिकांचा उत्साह दुणावला आहे. प्रशस्तीपत्र देताना आयुक्त डॉ. लहाने यांनी सांगितले की, हरित आणि प्रदूषणमुक्त अकोल्याच्या निर्मितीसाठी अशा कार्यकर्त्यांची नितांत गरज आहे. शहरातील प्रत्येकाने वृक्षलागवड आणि त्याचे संवर्धन हे आपले सामाजिक दायित्व मानले पाहिजे. या सन्मानामुळे शहरातील इतर नागरिक व मनपा कर्मचारी वृक्षलागवडीसाठी पुढे येतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या औचित्यावर झालेल्या या उपक्रमाने शहरात पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक संदेश पसरला आहे.

## डॉ. बोर्डे हे संघटनेचे विनम्र आणि संयमी नेतृत्व - डॉ.रघुवंशी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. १८:** संघटनेच्या योगदानातून शिक्षकांचे व्यावसायिक जीवन समृद्ध करतानाच विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून शिक्षण वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी संघटनेच्या नेतृत्वाचा कस लागत आहे, निरपेक्ष भावनेतून संघटनांचे कार्य होणे आवश्यक झाले आहे, त्यासाठी डॉ. अविनाश बोर्डे यांचे सारखे विनम्र आणि संयमी नेतृत्व गरजेचे आहे. विज्युक्टाची ही जमेची बाजू आहे असे प्रतिपादन नुटाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी केले. मराठा मंडळ मंगल कार्यालय अकोला येथे डॉ. बोर्डे यांच्या सेवा गौरव समारंभाचे मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन खा. अनुप धोत्रे यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोक गव्हाणकर होते. मुख्य अतिथी म्हणुन आ. सुधाकर अडबाले, आ. धीरज लिंगाडे ऊपस्थित होते.

व्यासपिठावर महादेवराव भुईभार, डॉ. गजानन नारे,सैय्यद ईसहाक सैय्यद नबी, अनिल कोल्हे, प्रा. शिवराम बावस्कर, प्रा. रमेश खाडे,सौ.हर्षा बोर्डे, जयदीप सोनखासकर, प्रा नरेंद्र लखाडे, विजय ठोकळ, प्रा. डी.एस. राठोड, प्रदीप थोरात , प्रा.संतोष वाघ , प्रा. प्रवीण ढोणे ,प्रा. श्रीराम पालकर, प्रा. प्रकाश डवले,डॉ.साबिर कलाम आदी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देतांना डॉ. अविनाश बोर्डे यांनी शिक्षणातील आव्हाने चळवळीच्या एकसंघतेनेच पेलता येतील असे मत व्यक्त करतांनाच सर्वाप्रती आभार व आदरभाव व्यक्त केला.प्रास्ताविक विज्युक्टाचे अकोला जिल्हा अध्यक्ष प्रा. संतोष अहिर यांनी केले. आभार प्रदर्शन जिल्हा सचिव प्रा. पंकज वाकोडे यांनी केले . संचालन डॉ. अस्मिता बढे यांनी केले. यावेळी सेवापूर्ती बद्दल मान्यवरांच्या हस्ते विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे यांचा सपत्नीक सत्कार स्मृतीचिन्ह,साडीचोळी, शाल श्रीफळ देऊन करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

**उत्साह** | स्वातंत्र्यदिनी नवसाक्षरांचा सन्मान

# नवसाक्षर परीक्षेत जिल्ह्याने मारली बाजी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. १८:** उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम संपूर्ण देशासह अकोला जिल्ह्यामध्ये उत्साहात राबविण्यात येत आहे. २३ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या असाक्षरांच्या चाचणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या निवडक नवसाक्षरांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी संजयकुमार झापे, जिल्हा परिषद अकोला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सहाय्यक योजना अधिकारी प्रमोद टेकाडे, मुख्याध्यापक राजीव भिरड, मनपा शाळा मराठी क्रमांक ९ काळा मारोती, मुख्याध्यापक मोहम्मद अब्दुल अजीज, मनपा उर्दू मुलांची शाळा क्रमांक ६ अकोट फाईल, सहाय्यक शिक्षिका फरुख कौसर, कुबरा परवीन याची उपस्थिती होती. अकोला जिल्ह्यामध्ये २३ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या असाक्षरांच्या परीक्षेमध्ये एकूण ८५७८ परीक्षार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ८४३९ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण टक्केवारी ९८% आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ही निकालाची टक्केवारी चांगली असल्याने शिक्षण संचालक योजना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी अकोला जिल्ह्याचे कौतुक सुद्धा केले आहे. या नवसाक्षरांना केंद्रशासनाद्वारे प्रमाणपत्र देण्यात आले असून या प्रमाणपत्राचे वितरण स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद अकोला कार्यालय मार्फत करण्यात आले. सर्वप्रथम सर्व नवसाक्षर यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. नवभारत साक्षरता कार्यक्रम अकोला जिल्ह्यात यशस्वी राबविण्यासाठी उपशिक्षणाधिकारी गजानन पारधी,सहायक योजना अधिकारी प्रमोद टेकाडे कार्यालयीन कर्मचारी गजानन येवले,सतीश देवकर,अनिल वडुरकर परिश्रम घेत असून सन २०२५ मध्ये सुद्धा नवभारत साक्षरता कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्याचे आवाहन संजयकुमार झापे शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद अकोला यांनी केले आहे.

### जिल्ह्यात अकोला महापालिका प्रथम

सन २०२५-२६ मध्ये असाक्षरांच्या नोंदणीमध्ये अकोला महानगरपालिका जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असून अकोला जिल्ह्यातील नवसाक्षरांची उत्तीर्ण टक्केवारी ९८% आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ही निकालाची टक्केवारी चांगली असल्याने शिक्षण संचालक योजना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी अकोला जिल्ह्याचे कौतुक सुद्धा केले आहे.

## वंचित बहुजन आघाडी कडून अकोला शहरामध्ये कावड भक्तांचे स्वागत

**अकोला:** अकोला शहरामध्ये अनेक वर्षापासून श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी गांधीग्राम येथील पूर्णा नदीवरून जल घेऊन अनेक कावड भक्त अकोल्यातील प्रसिद्ध असलेल्या राजराजेश्वर मंदिरामध्ये जल अभिषेक करतात गांधीग्राम वरून जल घेऊन राज राजेश्वर मंदिरात येणाऱ्या कावड भक्तांचे वंचित बहुजन आघाडी कडून जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे व गजानन गवई यांनी स्वागत केले कावळ भक्तांचे स्वागत करण्याकरिता वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते महेंद्र डोंगरे यांनी स्टेज उभारून येणाऱ्या कावड भक्तांचा स्वागत कार्यक्रम आयोजित केला होता .

## महत्त्वाचे

### तेजस्वी यादव यांच्यासोबत राहुल गांधींची सूर्य मंदिरात भेट



**बिहार :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या तयारीत सर्व राजकीय पक्ष व्यस्त आहेत. या पार्श्वभूमीवर, काँग्रेसने कालपासून सासाराम येथून राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील मतदार हक्क यात्रा सुरू केली. त्यातच काँग्रेसने निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला. या दरम्यान राष्ट्रीय जनता दल (राजद) नेते तेजस्वी यादव हे देखील त्यांच्यासोबत उपस्थित होते.बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी सोमवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह सूर्य मंदिराला भेट दिली आणि प्रार्थना केली. तेजस्वी यादव यांनी याचे अनेक फोटो सोशल मीडियावर शेअर केले. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ,''त्यांनी बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्यातील देव याठिकाणी असलेल्या सूर्यदेवाला समर्पित सूर्यमंदिराला भेट देऊन बिहारच्या प्रगती, समृद्धी आणि आनंदासाठी प्रार्थना केली'' असे म्हटले आहे.

### मुंबईतील पावसाचा विमान वाहतुकीलाही तडाखा

**मुंबई :** मुंबईत सुरू असेलल्या मुसळधार पावसाचा फटका रेल्वे आणि रस्त्यावरील वाहतुकीला बसला आहेच. शिवाय आता हवाई वाहतूकही पावसामुळे बाधित झाली आहे. रात्रीपासून पडत असलेला मुसळधार पाऊस आणि वातावरण खराब झाल्यामुळे मुंबईत विमान उतरण्यात अडचणी येत आहेत. सकाळपासून नऊ विमानांचे लँडिंग रद्द करण्यात आले आहे. तर काही विमानांना गो-अराऊंड करण्यात आले आहे. तर खराब हवामानामुळे एक विमानाला दुसरीकडे वळविण्यात आले आहे. हा एव्हिएशनमधला एक तांत्रिक शब्द आहे. विमान धावपट्टीवर लँडिंगसाठी खाली येत असताना काही कारणामुळे (जसे की, हवामान खराब होणे, धावपट्टीवर अडथळा असणे, योग्य अलाइनमेंट नसणे) पायलट लँडिंग न करता विमान पुन्हा हवेत नेतो आणि दुसऱ्या प्रयत्नात लँडिंगचा पुन्हा प्रयत्न करतो.मुंबईतून विमानाने प्रवास करणाऱ्यांसाठी आता महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे. प्रवाशांना विमानतळावर पोहोचण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्यास विमान कंपन्यांना सांगण्यात आले आहे.

### पवना धरणातून ८०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग

**पिंपरी- चिंचवड:** पिंपरी- चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातून दुपारी दोनच्या नंतर ८०० क्युसेकने पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. गेल्या काही दिवसांपासून पिंपरी- चिंचवडसह पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरण परिसरात संततधार पाऊस सुरू आहे. पवना धरण ९७ टक्क्यांपेक्षा अधिक भरल्याने हा विसर्ग करण्यात येणार आहे.पिंपरी- चिंचवड शहरासह मावळमधील काही भागांमध्ये पाणीपुरवठा करणारे पवना धरण ओव्हरफ्लो झाले आहे. सकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे धरण शंभर टक्के भरण्याची शक्यता आहे.
यामुळेच दुपारी दोन नंतर पवना धरणातून ८०० क्युसेकने पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. पिंपरी- चिंचवडकरांचा पुढील वर्षभराचा पाणी प्रश्न मिटलेला आहे. तरीही महानगर पालिकेकडून पिंपरी- चिंचवडकरांना दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून नागरिकांमध्ये नाराजी आहे.सध्या महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस कोसळत असून पुणे जिल्ह्यात देखील घाटमाथ्यांवर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. पवना धरणातून ८०० क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात येणार असल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## पुन्हा हल्ला केल्यास विनाश

# इराणची पुन्हा अमेरिका, इस्त्रायलला चेतावणी

**तेहरान : दि.१८ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराणमध्ये पुन्हा संबंध बिघडण्याची शक्यता आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांनी पुन्हा एकदा अमेरिका आणि इस्त्रायलला चेतावणी दिली आहे. खामेनींनी इराणवर पुन्हा हल्ला केल्यास याचे विनाशकारी परिणाम भोगावे लागतील असे म्हटले आहे. यामुळे अमेरिका आणि इस्त्रायलसोबत पुन्हा एकदा तणाव बिघडण्याची शक्यता आहे.
इराणच्या वरिष्ठ कार्यालयाने या संबंधी एक निवेदन जारी केले आहे. या निवेदनात सांगण्यात आले आहे की, 'अमेरिका इराणवर हल्ला करण्यास सक्षम नाही. यामागचे कारण म्हणजे इराणची वाढती लष्करी ताकद आणि वाढत्या कच्च्या तेलाच्या किमती. इराणने होर्मूज सामुद्रधानी बंद करण्याची धमकीही इस्त्रायल आणि अमेरिकेला दिला आहे. यामुळे अमेरिकेला इराणपुढे झुकावेचट लागेल नाहीतर, पुन्हा युद्ध सुरु होईल अशी चर्चा सुरु झाल्या आहेत.
इराणने देखील शत्रू आता त्यांच्यावर हल्ला करु शकत नाही, असे म्हटले आहे. इराणने तेल मार्ग बंद केल्यास अमेरिकेला १५० डॉलर्स प्रति बॅरल तेलाचे



भाव वाढण्याची भिती निर्माण झाली आहे. हे भरण्यास अमेरिका सक्षम नसल्याचे इराणने म्हटले आहे.
दोन महिन्यांपूर्वी इराण आणि इस्त्रायलमध्ये तीव्र संघर्ष सुरु होता. १३ जून रोजी इस्त्रायलने ऑपरेशन राझिंग लायन सुरु करत इराणवर हल्ला केला होता. इराणच्या वरिष्ठ लष्करी आणि अणु अधिकाऱ्यांना इस्त्रायलने ठार केले होते. तसेच अमेरिकेने इराणच्या फोर्डो, नतान्झ आणि इस्फाहन या अणु तळांवर हल्ला केला होता.
यावेळी इराणने संतप्त होत 'स्ट्रेट ऑफ होर्मूज' बंद करण्याची धमकी दिली होती. हा तेल वाहतूकीचा जल मार्ग आहे. येथून जगभरातून २०% तेल आयात केले जाते. हा मार्ग बंद झाल्यास जागतिक पातळीवर तेलाच्या किमतीत वाढ होण्याची शक्याता आहे. यामुळे पुन्हा युद्ध झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेवर याचा परिणाम होईल, अशा भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.
याच वेळी इराणचे सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी यांनी देखील खळबळजनक विधान केले आहे. एका मुलाखतीदरम्यान त्यांनी, ''अमेरिका इराणला हरवू शकता नाही, हे त्यांच्या लक्षात आले आहे. यामुळे आता त्यांनी चर्चा सुरु केली आहे. यासाठी इराण सकारात्मक प्रतिसाद देईल. पण ही चर्चा पुढील युद्धाची तयारी असेल तर , याचे अमेरिकेला गंभीर परिणाम भोगावे लागतील,'' असे म्हटले आहे.

### अणु कार्यक्रम सुरुच ठेवणार

**इराणने आपला अणु कार्यक्रम सुरुच ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच याचा हेतू केवळ त्यांच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी असल्याचेही इराणने म्हटले आहे. पण अमेरिका आणि इस्त्रायलने, तसेच युरोपिय देश फ्रान्स, ब्रिटन आणि जर्मनीने याला विरोध केला आहे. ऑगस्टच्या अखेरपर्यंत अणु करारावरील चर्चा सुर करण्यास चेतावणी दिली आहे. चर्चा न झाल्यास इराणवर कठोर निर्बंध लादण्याचाही इशारा देण्यात आहे.**

## भारत-पाक संघर्षविराम कधीही तुटू शकतो: अमेरिकेचा इशारा

**वॉशिंग्टन : दि.१८ वृत्तसंस्था**



भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षविराम कधीही संपुष्टात येऊ शकतो, त्यामुळे अमेरिका दररोज दोन्ही देशांतील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे, असे खळबळजनक वक्तव्य अमेरिकेचे ज्येष्ठ खासदार मार्को रुबिओ यांनी केले आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी ही भीती व्यक्त केली. त्यांच्या या विधानामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात पुन्हा एकदा भारत-पाक संबंधांवर चर्चा सुरू झाली आहे.
एका मुलाखतीदरम्यान बोलताना रुबिओ म्हणाले, ''जेव्हा दोन्ही बाजू थांबायला तयार होतात, तेव्हाच शस्त्रसंधी शक्य होते. मात्र, ती टिकवून ठेवणे अत्यंत कठीण असते. युक्रेन युद्धाप्रमाणेच शस्त्रसंधी कधीही मोडली जाऊ शकते. आम्ही केवळ भारत-पाकिस्तानच नव्हे, तर कंबोडिया-थायलंडसारख्या देशांतील परिस्थितीवरही दररोज लक्ष ठेवून असतो. आमचे ध्येय केवळ तात्पुरती शांतता नाही, तर भविष्यात युद्ध टाळण्यासाठी एक स्थायी शांतता करार घडवून आणणे आहे.''दुसऱ्या एका मुलाखतीत रुबिओ यांनी भारत-पाकिस्तान तणाव कमी करण्यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेचे कौतुक केले. ते म्हणाले, ''ट्रम्प यांनी आपल्या कार्यकाळात जागतिक शांततेला प्राधान्य दिले होते.

## पुतीन यांनी अलास्का शिखर परिषदेत सोबत नेली होती मलमूत्र सुटकेस



**अलास्का : दि.१८ वृत्तसंस्था**

येथे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यातील उच्चस्तरीय शिखर परिषद नुकतीच पार पडली. जगभराचे लक्ष या महत्त्वाच्या भेटीकडे लागले होते. परंतु, या चर्चेच्या मागे एक अनोखी गोष्ट घडत होती. पुतिन यांच्या सुरक्षारक्षकांनी त्यांच्यासोबत एक विशेष सुटकेस बाळगले होते. ही सुटकेस ना कागदपत्रांसाठी होती, ना शस्त्रास्त्रांसाठी. तर ती सुटकेस होती पुतीन यांच्या मलमुत्रासाठी. पुतिन यांच्या मलमूत्राचे नमुने जमा करून ते रशियात परत नेण्यासाठी या सुटकेसचा वापर होतो. म्हणूनच या सुटकेसला पूप सुटकेस असे म्हणतात. या वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, पुतिन यांच्या वैयक्तिक सुरक्षेचा हा भाग असून, हा सवयीतला भाग त्यांच्या अनेक आंतरराष्ट्रीय दौऱ्यांमध्ये दिसून आलेला आहे. त्यामागील कारण स्पष्ट आहे पुतिन यांना भीती आहे की परदेशी गुप्तचर यंत्रणा त्यांच्या शारिरीक स्थितीबद्दल माहिती मिळवण्यासाठी त्यांच्या शरीरातील जैविक स्त्राव (जसे की मल व मूत्र) वापरू शकतात. आणि तेच कुणाच्याही हाती लागू नये, त्यातून स्वतःला धोका निर्माण होऊ नये, म्हणून पुतीन प्रत्येक परदेश दौऱ्यात ही पूप सुटकेस सोबत बाळगतात.या प्रक्रियेनुसार, रशियाचे सदस्य या मलमूत्राचे नमुने विशेष पॅकेट्समध्ये गोळा करतात आणि हे पॅकेट्स एका खास सुटकेसमध्ये ठेवून ती पुन्हा मास्कोला नेली जाते.

## ९ कोंबड्यांच्या वाटणीवरून वाद कोर्टात

**हाँगकाँग : दि.१८ वृत्तसंस्था**

घटस्फोटाच्या प्रकरणात मालमत्ता, पैसे किंवा मुलांच्या ताब्यावरून होणारे वाद सामान्य आहेत. पण चीनच्या सिचुआन प्रांतात एका जोडप्याचा घटस्फोट २९ कोंबड्यांमुळे अडला होता. हा अजब खटला केवळ कोर्टातच नाही, तर न्यायाधीशांनी दिलेल्या अनोख्या सल्ल्यामुळे सोशल मीडियावरही प्रचंड व्हायरल झाला आहे.मा आणि झांग या जोडप्याने परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला होता.
त्यांच्यातील इतर मालमत्तेची वाटणी सहज झाली; पण वाद अडला तो त्यांनी एकत्र वाढवलेल्या २९ कोंबड्यांवर. दोघेही कोंबड्यांवर समान हक्क सांगत होते आणि कोणीही माघार घ्यायला तयार नव्हते. २९ ही विषम संख्या असल्याने कोंबड्यांची समान वाटणी करणे अशक्य होते.हे प्रकरण न्यायाधीशांसमोर आले असता त्यांनी यावर एक अतिशय भावनिक आणि व्यावहारिक तोडगा काढला. त्यांनी जोडप्याला सल्ला दिला की, त्यांनी २९ पैकी एक कोंबडी कापावी. दोघांनी मिळून 'फेअरवेल चिकन डिनर' (निरोपाचे जेवण) करावे. उरलेल्या २८ कोंबड्या प्रत्येकी १४-१४ अशा समान वाटून घ्याव्यात.

## सीताकुंड ते महेशखली 'आयएसआय'चा बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर 'घातक डाव'

**ढाका : दि.१८वृत्तसंस्था**

### चंद्रनाथ धामवर मशीद बांधण्याचा कट?



बांगलादेशातील हिंदू मंदिरे आणि पवित्र तीर्थक्षेत्रांवर पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयने थेट युद्ध पुकारल्याचे धक्कादायक दावे समोर आले आहेत. अंतरिम युनूस सरकारच्या काळात आयएसआयला बांगलादेशात मोकळीक मिळाली आणि त्याचा फायदा घेत लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनेमार्फत हिंदूंवर नियोजित हल्ल्यांची मालिका सुरू करण्यात आली आहे. प्रसिद्ध पत्रकार सलाहुद्दीन शोएब चौधरी यांनी उघड केले की, पाकिस्तान आयएसआयने बांगलादेशाला आपला 'प्रयोगशाळा' बनवले असून भारत आणि हिंदू समाजाला लक्ष्य करण्याचा कट रचला जात आहे.
बांगलादेशातील हिंदू लोकसंख्या आणि त्यांच्या परंपरांवर धोक्याची घंटा वाजली आहे. चौधरी यांच्या मते, ११ व्या शतकातील चंद्रनाथ धाम (सीताकुंड) हे पहिले मोठे लक्ष्य ठरले आहे. हिंदू श्रद्धेनुसार, येथे सतीदेवीचा उजवा हात पडला होता. दरवर्षी लाखो भक्त शिवचतुर्दशीला या टेकडीवर येतात. पण अलीकडेच कट्टरपंथी गटांनी येथे मशीद बांधण्याचा कट रचल्याचे समोर आले आहे. यामागे लष्कर-ए-तैयबा आणि हरकत-उल-जिहाद अल-इस्लामीशी संबंधित दहशतवादी हारुन इझहार याचा थेट हात असल्याचे सांगितले जाते.
फक्त चंद्रनाथ धामच नाही तर, चितगावमधील मेधास मुनी आश्रम, बंदरबन जिल्ह्यातील सुवर्ण मंदिर आणि कॉक्स बाजारजवळील महेशखलीचे आदिनाथ मंदिर हीही आयएसआयच्या निशाण्यावर आहेत. ही सर्व मंदिरे दक्षिण आशियाच्या आध्यात्मिक वारशाचे केंद्र असून त्यावर होणारे हल्ले म्हणजे हिंदू संस्कृतीवर थेट आघात आहे.
युनूस राजवटीत वाढलेली दहशतवादी हालचाल
गेल्या वर्षी युनूस यांच्या अंतरिम राजवटीदरम्यान आयएसआयला शस्त्रसाठा आणि अमली पदार्थ तस्करीसाठी मोकळीक देण्यात आल्याचा आरोप आहे. या माध्यमातून निर्माण होणारा पैसा पुन्हा दहशतवादी कारवायांसाठी वापरला जात आहे.

**❑ पाकिस्तानचा अंतहीन युद्धाचा डाव**
**हिंदू धर्म, भारतीय संस्कृती आणि भारताच्या सीमावर्ती सुरक्षेला हादरे देणे हे पाकिस्तानच्या 'अंतहीन युद्धा'चा भाग असल्याचे या घडामोडींवरून स्पष्ट होते. बांगलादेशातील मंदिरे आणि हिंदू समाजाला लक्ष्य करणे म्हणजे दक्षिण आशियाच्या सामूहिक सांस्कृतिक वारशावर आघात आहे. भारत आणि आंतरराष्ट्रीय समुदायाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर बांगलादेश कट्टरपंथी आणि दहशतवाद्यांचे 'लॉन्चपॅड' बनू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.**

## गुजरातमधील गावात स्वातंत्र्यानंतर ७८ वर्षांनी दलितांना सलूनमध्ये प्रवेश; पहिल्यांदाच अनुभवला हेअरकट

**अहमदाबाद : दि.१८वृत्तसंस्था**

गुजरातमधील बनासकांठा जिल्ह्यातील अलवाडा गावात ७ ऑगस्ट रोजी एक ऐतिहासिक घटना घडली. २४ वर्षीय कीर्ती चौहान या दलित युवकाला गावातील सलूनमध्ये केस कापण्याची सेवा मिळाली. हे केवळ वैयक्तिक स्वातंत्र्याचे नव्हे, तर सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे.
अलवाडा गावाची लोकसंख्या सुमारे ६५०० असून त्यात सुमारे २५० दलित कुटुंबे आहेत. अनेक पिढ्यांपासून दलित समाजाला गावातील न्हाव्यांकडून सेवा नाकारली जात होती. त्यामुळे त्यांना शेजारच्या गावांमध्ये जाऊन, आपली जात लपवून केस



कापावे लागत होते.५८ वर्षीय छोगाजी चौहान यांनी आपल्या भावना मांडताना सांगितले, ''आमचे पूर्वज स्वातंत्र्यपूर्व काळातसुद्धा हा अपमान सहन करत होते आणि आमच्या पोरांनीही तो ७८ वर्षे सहन केला.ही बदलाची प्रक्रिया सहज घडलेली नाही. सामाजिक कार्यकर्ते चेतन दाभी यांनी गावातील उच्चवर्णीय आणि न्हावी समाजाशी चर्चा करून, त्यांना सामाजिक अस्पृश्यता नाकारण्याबाबत जागरूक केले.परंतु संवाद निष्फळ ठरल्यावर पोलिस आणि जिल्हा प्रशासनाने हस्तक्षेप केला. मामलतदार जनक मेहता यांनी गावातील नेतृत्वाशी मध्यस्थी करत सकारात्मक तोडगा काढला.कीर्ती चौहान यांनी सांगितले की, ''२४ वर्षांत पहिल्यांदाच मी माझ्या गावात न्हाव्याच्या खुर्चीत बसलो. त्या दिवशी मला माझ्या गावात खरं स्वातंत्र्य वाटलं. याआधी आम्हाला कायम बाहेर जावे लागे.''
गावातील सर्व पाच न्हाव्यांच्या दुकानांमध्ये आता दलित ग्राहकांचे स्वागत होते. पिंटू (वय २१) या तरुण सलून व्यावसायिकाने कीर्ती याचे केस कापले. त्याने स्पष्ट सांगितले की, ''आधी परंपरा पाळत होतो, पण आता मोठ्यांनी मान्यता दिल्यावर आम्हाला काही अडचण नाही.



## इस्त्रायलची गाझा बळकाविण्यासाठी नवी खेळी: हजारो जीव धोक्यात

**तेल अवीव : दि.१८ वृत्तसंस्था**

गाझा पट्टीतील रक्तरंजित संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. इस्त्रायलच्या लष्करप्रमुख एयाल झमीर यांनी जाहीर केलेल्या नव्या मोहिमेमुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. गाझा शहर काबीज करण्यासाठी ''ऑपरेशन गिडिओन्स चॅरियट्स'' चा पुढील टप्पा लवकरच सुरू होणार आहे. या कारवाईत हमासवर जमीन, हवाई आणि समुद्रमार्गे हल्ले अधिक वेगाने व आक्रमकतेने चालू ठेवले जातील.
गाझा हे या पट्टीतील सर्वात मोठे आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर असल्याने या कारवाईचे परिणाम अत्यंत विनाशकारी ठरू शकतात. आंतरराष्ट्रीय समुदायाने आधीच या मोहिमेवर गंभीर इशारे दिले आहेत. युद्धबंदी व कैद्यांच्या सुटकेबाबतची चर्चा थांबल्यानंतरच इस्त्रायलने ही घोषणा केली आहे.
गाझा दौऱ्यावर असताना लष्करप्रमुख झमीर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत स्पष्ट केले की हमास आत्मसमर्पण करत नाही तोपर्यंत लष्करी कारवाई सुरू राहील. तसेच, गाझामध्ये बंदिवान असलेल्या इस्त्रायली नागरिकांना सुरक्षित परत आणणे हे लष्कराचे ''नैतिक कर्तव्य'' असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.
तथापि, प्रत्यक्षात या संघर्षामुळे सर्वाधिक फटका सामान्य पॅलेस्टिनी नागरिकांना बसत आहे.इस्त्रायलने गाझा शहरातील रहिवाशांना दक्षिणेकडे हलवण्याची योजना आखली आहे. संरक्षण मंत्रालयाची संस्था यांनी जाहीर केले की येत्या रविवारपासून नागरिकांना तंबू वाटले जातील आणि त्यांना सुरक्षित भागात नेले जाईल. मात्र, हमासने या हालचालीचा तीव्र विरोध केला आहे. ''ही एक नवीन नरसंहाराची व विस्थापनाची पायरी आहे,'' असे हमासने म्हटले आहे. ७ ऑक्टोबर २०२३ पासून गाझावर इस्त्रायली हल्ल्यांमध्ये ६१,९४४ हून अधिक पॅलेस्टिनी मृत्युमुखी पडले आहेत.

**हिंसाचार** | **इराकमधील नरसंहाराचे काळेकुट्ट पान!**

## अल-खफसा येथे एकाच कबरीत दफन ४ हजारांहून अधिक मृतदेह

**मोसुल : दि.१८ वृत्तसंस्था**

इराकच्या मोसुल शहराजवळील अल-खफसा परिसरात जगाला हादरवणारा सत्याचा काळा अध्याय पुन्हा समोर आला आहे. इराकी अधिकाऱ्यांनी येथे एक प्रचंड सामूहिक कबर खोदण्यास सुरुवात केली आहे. प्राथमिक अंदाजानुसार या कबरीमध्ये ४ ते ५ हजार मानवी अवशेष पुरलेले असावेत. २०१४ ते २०१७ या काळात आयसिस या दहशतवादी संघटनेने घडवून आणलेल्या रक्तरंजित नरसंहाराचे हे ठोस पुरावे असल्याचे मानले जात आहे. ही सामूहिक कबर इराकच्या आधुनिक इतिहासातील सर्वात मोठी कबर मानली जाऊ शकते. स्थानिक प्रशासन, न्यायव्यवस्था, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि इराकी शहीद फाउंडेशन यांच्या संयुक्त सहकार्याने या कबरींचे उत्खनन सुरू आहे.
२०१४ मध्ये आयसिसने इराकचा मोठा भूभाग आपल्या ताब्यात घेतला. त्या काळात मोसुल हे



त्यांचे महत्त्वाचे गढ बनले होते. हजारो नागरिकांना ठार मारण्यात आले, तर अनेकांना बेपत्ता करण्यात आले. सरकारी आकडेवारीनुसार २०१४ ते २०१८ दरम्यान तब्बल ६८,२६० नागरिकांचा मृत्यू झाला. अनेक निरपराध लोक, महिला व लहान मुलांचेही प्राण निर्दयीपणे घेतले गेले.
प्रत्यक्षदर्शींच्या मते, आयसिसचे दहशतवादी कैद्यांना आणि पोलिसांना बसमध्ये बसवून या भागात आणत आणि त्यानंतर त्यांची हत्या करत. अनेकांचा शिरच्छेद करण्यात आला तर अनेकांना जमिनीत गाडण्यात आले. आज उत्खननाद्वारे उघड होत असलेले अवशेष त्या भयावह काळाच्या साक्ष देत आहेत.इराकी शहीद फाउंडेशनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, उत्खननाच्या पहिल्या टप्प्यात दृश्यमान मानवी अवशेष व पुरावे गोळा केले जातील. नंतर आंतरराष्ट्रीय मदतीच्या साहाय्याने संपूर्ण उत्खनन सुरू होईल. मृतदेहांचे डीएनए नमुने घेऊन पीडितांच्या कुटुंबीयांशी जुळवले जाणार आहेत. यासाठी विशेष डेटाबेस तयार करण्याची प्रक्रिया देखील हाती घेण्यात येणार आहे. तज्ज्ञांच्या मते, सुमारे ७०% मृतदेह हे इराकी सैन्य आणि पोलिसांचे असण्याची शक्यता आहे. परंतु सल्फर वॉटर आणि बॉम्बस्फोटांमुळे अनेक अवशेष नष्ट झाले असल्याने ओळख पटवण्याचे काम कठीण होईल. तरीही, हरवलेल्या व्यक्तींचे कुटुंबीय या प्रक्रियेकडे आशेने पाहत आहेत.२०१७ मध्ये आयसिसने अल-खफसा परिसराचा ताबा घेतला होता.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## भारतावरील टॅरिफचे संकट अधिक गहिरे

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यात नुकतीच चर्चा झाली. मात्र काहीही ठोस परिणाम न निघताच संपलीही, पण यातून एक भारतासाठी चिंता वाढली आहे. कारण या चर्चेतून भारतावरील टॅरिफचे संकट अधिक गहिरे झाले आहे. भारत आमचा मित्र असला तरी... असं म्हणत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला मोठा धक्का दिला आहे. अमेरिकेने भारतावर २५ टक्के आयात शुल्क लागू केले आहे. दोन्ही देशातील व्यापार कराराच्या वाटाघाटी काही मुद्द्यांवर अडकल्याने ट्रम्प यांनी ही घोषणा केली. इतकेच नाही तर रशियाकडून लष्करी साहित्य आणि तेलाची खरेदी यामुळे भारतावर दंडही लावला जाईल अशी भूमिका घेतली. भारत हा रशियाचा खरेदीदार देश आहे हे योग्य नसून भारताला २५ टक्के आयात शुल्क आणि वर तेवढाच दंडही आकारला जाईल, अशी घोषणा ट्रम्प यांनी केली. अमेरिकेच्या या निर्णयामुळे भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूवरील कर वाढणार आहेत. जर भारतातून अमेरिका १०० रुपयांची एखादी वस्तू आयात करत असेल, तर यापुढे त्यावर २५ टक्के आयात शुल्क लावले जाईल. याचा अर्थ अमेरिकन ग्राहकांना ती वस्तू १२५ रुपयांना घ्यावी लागेल. त्यामुळे अमेरिकेत भारतीय वस्तूंच्या किंमती वाढतील आणि त्याचा फटका भारतीय उद्योगांना बसेल. अलास्का येथील एका ठिकाणी दोन्ही जागतिक महासत्तांमध्ये चर्चा झाली आणि ती निष्फळ ठरली ही भारतासाठी दिलासादायक बाब आहे असे काहींनी म्हटले तर काहींनी भारतासाठी आता टॅरिफचा धोका खूप वाढला आहे असे म्हटले. अमेरिकन अर्थमंत्री स्कॉट बेसेट यांनी म्हटले आहे, की जर ही शिखर परिषद परिणामहीन राहिली, तर भारतावर अमेरिकेचे टॅरिफ आणखी वाढू शकेल. अजून याबाबत अंतिम निर्णय झाला नाही. पण तशीही शक्यता आहे. या शिखर परिषदेनंतर दोन्ही नेत्यांनी आमची चर्चा चांगली झाली असे म्हटले असले तरीही त्याच्यातून परिणाम काहीही न निघाल्याने भारताच्या तेलपुरवठ्याबाबत निश्चितच संकटाचे ढग दाटले आहे. कारण अमेरिकेने रशियावर निर्बंध लादले, तर भारताला रशियाकडून तेल खरेदी करणे बंद करावे लागले. त्या परिस्थितीत भारताकडे पर्याय आहेत याचा विचार केला असता मध्य पूर्वेतून तेल आयात करणे हा एक पर्याय आहे. पण तो जास्त महाग आहे. खुद्द अमेरिकेकडून तेल खरेदी करणे हा एक पर्याय आहे पण तो तितका लाभप्रद नाही. आफ्रिकेकडून भारत तेल खरेदी करू शकतो पण तोदेखील पर्याय भारतासाठी महाग आहे. रशियाकडून भारत स्वस्तात तेल आयात करीत होता आणि त्यामुळे भारतातील अर्थव्यवस्थेला चांगला आधार मिळाला होता. पण याचा लाभ सामान्य माणसांपर्यंत पोहोचला नव्हता. तेलाचे दर प्रचंड चढलेले होते. त्यामुळे भारताने जर रशियाकडून तेल खरेदी करणे अमेरिकेच्या दबावाखाली येऊन बंद केले, तर भारतात पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढवावे लागतील. एकूणच ही स्थिती भारतासाठी चिंताजनक आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करीत आहे आणि युक्रेन यांच्या लोकांना ठार मारण्यास सहाय्य करीत आहे असा ट्रम्प यांच्या युक्तीवादामागे अर्थ आहे. अर्थात भारताने ट्रम्प यांचा इशारा दुर्लक्ष करण्यासारखा आहे. पुतीन यांच्यावर पाश्चात्य देशांनी प्रतिबंध लावले आहेत आणि जागतिक न्यायालयाने त्यांना अटक करण्याचे वॉरंट बजावले आहे. पण अमेरिकेच्या टॅरिफच्या धोक्यातच भारतासाठी एक अत्यंत महत्त्वाचा संदेश आहे तो म्हणजे चीनला ट्रम्प धमकावू शकत नाही. म्हणून त्यांचा डाव आहे, की भारताला रशियापासून अलग करणे. रशिया भारतासोबत मैत्रीला सातत्याने जागत आला आहे. अगदी अमेरिकेने भारतीय समुद्रात सारे आरमार आणून ठेवले होते तेव्हाही रशियानेच त्यांच्या फ्लीटच्या युद्धनौका अरबी समुद्रात आणल्या होत्या आणि त्यामुळे अमेरिकेचे आरमार जसे आले तसे गूपचूप गेले. त्यामुळे ट्रम्प यांनी कितीही प्रयत्न केले तरीही भारत हा रशियाच्या मैत्रीला जागणारा देश आहे. भारताने ट्रम्प आणि पुतिन यांच्यातील भेटीचे स्वागत केले आहे, पण त्यामुळे ट्रम्प भारतावर टॅरिफ लादणार की नाही याबाबत अद्याप संदिग्धता कायम आहे. कारण अजूनही ट्रम्प यांनी भारताकडून आयात केल्या जाणाऱ्या मालावर सरसकट २५ टक्के आयात कर लावण्याची घोषणा केली आहे. आणखी ती २५ टक्के वाढविण्याचा प्रस्ताव होता. जर अमेरिकेने तसा निर्णय घेतलाच, तर भारतासाठी ही चांगली बातमी नसेल. कारण मग भारतावर एकूण टॅरिफ ५० टक्के होईल आणि भारताची अर्थव्यवस्था आज चांगल्या अवस्थेत आहे ती गटांगळ्या खाईल. अमेरिकन अर्थमंत्र्यांनी ट्रम्प सेकंडरी टॅरिफ म्हणजे दुय्यम कर लागू करू शकतात असे म्हटले होते, पण भारताने या म्हणण्याला किरकोळ म्हणून निकालात काढले होते. पण या समीटचे परिणाम भारतावर जास्त होणार आहेत, कारण प्रश्न तेलाचा आहे. भारत तेलाच्या बाबतीत अजूनही दुर्दैवाने स्वयंपूर्ण नाही आणि त्यामुळे त्याला इतरांवर तेलासाठी अवलंबून राहावे लागते. ट्रम्प यांची भारतावरील नाराजी यासाठी आहे कारण ते रशियाकडून तेल खरेदी करून रशियाच्या अर्थव्यवस्थेला आधार देत आहे. पण कोणताही देश आपला फायदा आधी पाहणार हे ट्रम्प यांना लक्षात यायला हवे. ट्रम्प यांच्या टॅरिफ युद्धात भारतासारखा विकसनशील देश भरडला जात आहे. भारतावर ट्रम्प यांचा आरोप आहे की भारत रशियाकडून तेल खरेदी करून त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देत आहे. पण रशिया आणि अमेरिका या जागतिक ताकदवान देश राहिलेल्या देशांच्या युद्धात भारतासारखा देश भरडला जात आहे हे वास्तव आहे. ट्रम्प यानी भारतावर टॅरिफ लादल्याने भारतापुढे अवघड पर्याय आहे. भारताकडे आता फारसे पर्याय नाहीत, एक तर प्रत्युत्तर देणे आणि रशियन तेल आयात थांबली तर काही दिलासा देणे हे ते पर्याय आहेत. एकूणच ट्रम्प आणि पुतिन यांच्यातील चर्चेचे फलित काहीच निघाले नसले तरीही भारतासाठी ही बातमी चिंता वाढवणारी आहे, एवढे मात्र निश्चित.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### ढगफुटी



असा बरसला पाऊस
हे राज्य जलमय झाले
बळीच्या डोळी टिपूस
ते अश्रू खरंच आटले

लाखो हेक्टर क्षेत्रात
झाली पहा ढगफुटी
पुन्हा बळीच्या ताटात
बघा आली सागरगोटी

ह्या अस्मानी सुलतानीचा
सामना करतो बळीराजा
फुटो कधी बांध संयमाचा
तेव्हाच जागा होईल राजा

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

अमीर फकीर
स्मशानात जाती ।
शेवटाला होती
अहं शुन्य ॥

माणसात जेव्हा
माणूस दिसतो
समूळ नष्टतो
अहं शुण्य

मोह जन्म घेतो
अहंकारातून ।
करूणेमधून
प्रेम जन्मे ॥

अहंकार येतो
शिक्षकाला जेव्हा ।
शिष्य जातो तेव्हा
वाया मित्रा ॥

# पानगळीतून अंकुरलेली वाट...



## सप्तरंग

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९



**काळाच्या तंतुवर नाजूक स्वर वाजतो,**
**गळतीच्या मागे उगमाचा धागा लपतो.**
**जुन्या पानांतून नवे गीत उमलते,**
**वसंत म्हणजे मृत्यूच्या काठावर जीवन फुलते.**
**वसंत एकटा कधीच येत नाही.**

त्याच्या पायवाटेवरून चालत येताना कुणीतरी थंडगार सावली घेऊन त्याच्या शेजारी येतो, तर कुणीतरी जाळणाऱ्या उन्हाची धग अंगावर ओततो. हिवाळा अजून कुठेतरी ओढणी सांभाळून बसलेला असतो, तर उन्हाळ्याची उष्णता आधीच डोळ्यांत झळकू लागलेली असते. वसंत म्हणजे या दोन्ही टोकांच्या मध्ये उभा असलेला एक मधला क्षण, जणू काळाच्या वाद्यावरील एक नाजूक स्वर.... झाडांच्या फांद्यांवरून गळून पडणारी पानं आपल्याला एक शिकवण देतात "मृत्यू हा कधी एकटाच नसतो, त्याच्या पोटात जन्म दडलेला असतो." जणू नष्ट होणं म्हणजे रिकामेपण नाही, तर नव्याला जागा करून देणं आहे. म्हणूनच वसंत हा फक्त नव्या पालवीचा उत्सव नाही, तर मृत्यूच्या काठावर उभा राहूनही जीवनाच्या कळ्या उमलण्याचा उत्सव आहे.

धरित्रीच्या अंगावर हिरवी शाल चढू लागते, पिवळ्या मोगऱ्याच्या कळ्या डोळ्यांना हसू देतात, फुलझाडं बाळांसारखी गोजिरी दिसू लागतात. एखाद्या शेतकऱ्याच्या हातातल्या पिकासारखं, वसंताचं आकाशही आशेने पिकतं. निळाईत भिजलेलं आकाश म्हणजे जणू देवळातल्या घंटांचा गजर शांत, तरीही घुमणारा....

आणि सूर्याची किरणं...? ती तर सोन्याच्या दोऱ्यांनी धरित्रीला विणून काढतात. पण या उजळलेल्या धरित्रीला पूर्णत्व देतो तो चंद्र. दिवसाच्या गडबडीत तो लुप्त झाल्यासारखा वाटतो. पण संध्याकाळी आकाशाच्या काळ्या पाटीवर पांढऱ्या खडूची रेषा काढावी तसा तो उगवतो आणि सोबत असंख्य चांदण्यांची शाळा घेऊन येतो. जणू रात्र ही त्याची शाळा, आकाश त्याचा फळा, आणि तारे म्हणजे त्याने शिकवलेली अक्षरं. वसंत म्हणजे असाच एकाचवेळी नाश आणि उगम, शेवट आणि प्रारंभ, रात्र आणि पहाट, मृत्यू आणि जीवन या सगळ्यांचा संगम.... तो आपल्याला शिकवतो की जीवन कधीच एकरेषीय नसतं. त्यात विरोधाभासांची छटा असते. आपण जर थंडीच्या काट्यात उभं राहू शकलो, तरच उन्हाची ऊब जाणवते. आपण जर पानगळ स्वीकारली, तरच हिरवाईची किमया कळते. माणसाचं आयुष्यही काही वेगळं नाही.

आपल्या प्रत्येक क्षणात वसंत लपलेला असतो. हसण्यात कुठेतरी एक लहानसं दुःख दडलेलं असतं, आणि अश्रूंमध्येही कधीकधी हास्याची पालवी उमलत असते. आपण जे हरवतो, त्यातूनच कधीतरी नवीन नातं जन्म घेतं. आपण गाळतो ती पानं, कधीकधी आपल्या अंत:रंगाला नवी ऊर्जा देतात. वसंत आपल्याला सांगतो "जीवनाचा खेळ हा केवळ मिळवण्याचा नसतो, तो सोडून देण्याचाही असतो. आणि प्रत्येक सोडून देणं म्हणजे नव्या भेटीची तयारी असते." आजच्या धावपळीच्या, थकव्याच्या जगात वसंत म्हणजे श्वासांचा विराम आहे. पानांच्या सळसळीतला संगीत सूर आहे. आकाशातल्या ढगांची चित्रकला आहे. त्याचं आगमन आपल्याला स्मरण करून देतं की निसर्गाच्या घड्याळात कुठेही थांबा नाही

थंडी संपली की उन्हाळा येणार, आणि त्यांच्यामध्ये वसंत थोडावेळ हसून जाणार. खरं तर वसंत हा ऋतू नसून जीवनाचा दृष्टिकोन आहे. आपण नाशात उगम शोधू शकतो का...? आपण अंधारात प्रकाशाची रेघ ओळखू शकतो का...?

आपण गळलेल्या पानांच्या ढिगाऱ्यात लपलेला अंकुर ओळखू शकतो का...? जर होय, तर वसंत आपल्या मनात जन्म घेतो. म्हणूनच वसंत एकटा नसतो.

तो नेहमी सोबत आणतो काळाच्या, जीवनाच्या, आशेच्या, आणि स्मृतींच्या छटा....

तो ऋतूंच्या संगमावर उभा असलेला एक गंध आहे, एक नाद आहे, एक अनामिक हसू आहे. आणि शेवटी जेव्हा आपण चांदण्यांच्या प्रकाशात झोपतो, तेव्हा वसंत आपल्याला हळूच सांगतो उद्याचं आकाश पुन्हा नवं असेल, कारण प्रत्येक रात्र नव्या पहाटेची आई असते...

काळाच्या तंतुवर नाजूक स्वर वाजतो,
गळतीच्या मागे उगमाचा धागा लपतो....
जुन्या पानांतून नवे गीत उमलते, वसंत म्हणजे मृत्यूच्या काठावर जीवन फुलते .

# कृषीप्रधान देशात शेतकऱ्याची शेतीवरील निष्ठा का हरवली?

## कृषिजगत

अशोक वानखेडे
९४०३४९३१००



कोणतेही काम न करता कमी वेळात जास्त पैसा मिळवणे ही मानसिकता भूमीहीन समाजापुढे राजकारणी धोरणातून सत्ता प्राप्तीसाठी मते मिळवण्याचे मुख्य नियोजन सध्याच्या काळात होत असल्याचे दिसते. प्रशासन सत्ता ही शेतकरी हिताची असणे गरजेचे असते. कारण शेतीच्या आधारावरच देशाचा विकास अवलंबून आहे. ही वास्तविकता नाकारता येत नाही परंतु हे सर्व सत्तापीपासू प्रवृत्तीकडे गेलेले आहेत. विकास होत असताना तो सर्वांगीण विकास आहे का हा प्रश्नच आहे? कारंजा देशात शेतीला प्राधान्य पाहिजे त्या देशात शेतकरी अजून परतंत्र्यात जगतोय. शासनाच्या नियोजित तालावर त्याला सदा सर्वदा नाचावं लागतं. राज्य काही बिनकामी योजनामुळे आर्थिक संकटाकडे वेगाने वाटचाल करीत आहे. कोणतेही लक्षवेधी कामाला फक्त टाईमपास करणे व लोकांना आपल्या मतासाठी राखून ठेवणे याकरता विविध घोषणा व भ्रम लोक जनसमुदायात निर्माण करून सत्तेचे सिंहासन प्राप्त करणे हाच मुख्य उद्देश सत्ताधाऱ्या किंवा विरोधक समोर आहे. यामुळे कृषी प्रधान देशातील शेतकऱ्याचा लोकशाही वरील प्रचंड विश्वास नाहीसा होताना दिसत आहे.

याला कारणीभूत सत्ताधारी व विरोधक पण आहेत. पैशाच्या जोरावर आमदार करून कोणतेही सरकार पाडणे लोकशाही मार्गाने निवडून आलेले सरकार उद्ध्वस्त करणे ही तर राष्ट्रहिताला विशेष करून शेतकऱ्याच्या दृष्टीने अत्यंत बाधक घटना घडत आहे. जोपर्यंत या लोकांच्या डोक्यात शेतकरी हिताचा विचार येत नाही. तोपर्यंत या राज्याची वाटचाल विनाशाकडे अशीच निश्चितच चालतच राहील. उच्चपदस्थ अधिकाऱ्याला हातात धरून हे लोकप्रतिनिधीशेतकरी हिताचा खेळखंडोबा करणे त्यांच्या हाताने करीत आहेत. त्याला कृषी प्रधान देशाच्या लोकशाहीची काय देणे घेणे शिल्लक दिसत नाही.*या श्रमशक्तीचा नाश करणाऱ्या व्यवस्थेवर राज्य चालवणे म्हणजे संपूर्ण शेती व्यवस्था नष्ट करणे होय. या सत्तापीपासू धोरणाच्या प्रवृत्तीने श्रमशक्तीचा नाश केल्याने शेतकरी त्रस्त आहेत. राज्याची व ग्रामीण व्यवस्था विनाशाकडे वाटचाल करताना दिसत आहे. अशी मी मांडणी केली तर काहीही वाव ठरणार नाही.

आज शेतीला मजूर मिळणे ही एक बिकट समस्या या राजकीय धोरणामुळेच निर्माण झाली आहे. राज्यातील शेती धंदा मोडीत निघतोय त्यामुळे ज्याला शेती व्यवसायातील तीळ मात्र श्रम करण्याची नवरात्र शेतीसाठी कष्ट करण्याचा अनुभव नाही. असे व्यापारी, कर्मचारी, उद्योजक, शेतीच्या सातबारा मालक होऊन शेती त्यांच्या कार्यप्रणाली पूरक उद्योग म्हणून सांगड घालत आहेत. त्यामुळे त्यांना शेती उत्पन्न होवो किंवा नाही याचे तीळ मात्र नियोजन नसताना ते शेती करीत आहेत तेही कोणते राष्ट्रहित जनहित न जोपासता.



रोहयोच्या पण योजना कष्टाचे क्षेत्रात कामावर कोणीच इच्छित नाहीत. शेतीवर मजूर मिळत नाहीत, गाय गोर राखायला कोणी व म्हणत नाही, सत्ताधारी तर गायीची पूजा करण्याची उपदेश करतात. शेतीची राखण करणारे गायब झाले.*शेतात वन पशु जनावराचे साम्राज्य वाढत आहे.*. रात्री शेतावर तर मुक्कामाला मुळीच कोणी तयार होत नाही. अडाणी अशिक्षित कामगार सुद्धा शेतात शेतकऱ्याला विचारतात *शेतात काय काम आहे?. टाईम सकाळी सहा ते अकरा नाहीतर सात ते बारा किंवा दहा ते तीन ही पहिली त्यांची अट असते. वावर लांब असेल तर येण्या जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांनीच करावी लागेल ही दुसरी अट असते.

पाच तासाच्या कालावधीत किंवा एक ते दीड तास वैयक्तिक लघुकार्यासाठी आणि उरलेले साडेतीन तास शेती कामासाठी आणि त्यातही निसर्गाने निर्माण केलेल्या अडचणी मुळे जाणारी व्यस्त वेळ हे त्यांच्यासाठी राखीव असते. सकाळी उशिरात उशिरा शेतावर येणे व सुटण्याचे वेळी लवकरात लवकर शेत सोडणे हे शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ टाकलं तरी शेतकऱ्यांनी रडायचं नसतं. फक्त एक दिवस कामाला जाऊन नवरा बायको मुलगा मुलगी असल्यास हजार बाराशे हे भूमीहीन कमवतात. म्हणजे वर्षाकाठी चार लाखापर्यंत त्यांचे आर्थिक उत्पन्न असते. तरीही महिन्याला लागणारे गहू १५ किलो किंमत तीस रुपये तांदूळ पाच किलो किंमत वीस रुपये सणासुदीला *आनंदाचा शिधा* *ही सारी सुविधा या राज्यात शेतकऱ्याला किंवा शासकीय कर्मचाऱ्यांना सुद्धा उपलब्ध नाही परंतु या भूमिहीन समाजाला या साऱ्या गोष्टी शासन उपलब्ध करून देत आहे.

या भूमिहीनाच्या मागे कोणतेही राष्ट्रीय हिताची जबाबदारी नाही. त्यांना कोणत्या ईडीची किंवा अँटी ब्युरोची भीती नाही. कोणता शासकीय कर किंवा कोणाचे कर्जबाजारी होण्याची गरज नाही. त्यांच्यासाठी घरकुल, आरोग्य सेवा, मुलांचे राखीव शिक्षण, जीवन जगण्यासाठी अन्नधान्य पुरवठा साऱ्या योजनेचा वर्षाव फक्त सत्ता प्राप्तीसाठी होत आहे. हे आपल्या लोकशाहीची खरी शोकांतिका म्हणावी लागेल.

सध्याच्या घडीला ह्या साऱ्या बाबी शेतीवरचे निष्ठा कमी होण्याचे कारणे आहेत. योजना राबवताना शेतकरी हित व राज्यहिताची जबाबदारी या लाभार्थ्यावर लादल्या गेली नाही तर भविष्यात राज निष्ठेसह शेतीनिष्ठा सुद्धा डगमगल्या जाईल. या कालावधीला उशीर लागणार नाही. **(क्रमशः)**

# भारताचे सरन्यायाधीश घडले मराठी शाळेतून!

## व्यक्ती विशेष

मुकेश चौधरी
पुणे



गडेघाट म्हणजे मोकाट जनावरांचा कोंडवाडा. त्यामध्ये रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट जनावरांना कोंडल्या जाते, याच फ्रेजरपुरा भागातील मराठी शाळेमधून भूषण गवई यांनी शिक्षण घेतले. "माझ्या मुलाने भूषणने खेड्यातून शिक्षण घेत सरन्यायाधीश पदापर्यंतचा प्रवास केला. पण हा प्रवास त्याचा एकटा नव्हता. त्यामागे त्याची जिद्द, अफाट परिश्रम, कठोर अभ्यास, सातत्य, प्रामाणिकपणा, चिकाटी आणि अनेक अडचणींवर मात करण्याची हिंमत होती. तीच हिंमत तुमच्यातही आहे. तुमच्याही डोळ्यांत सर्वोच्च पदांची स्वप्नं असू शकतातआणि ती पूर्ण होऊ शकतात," जर स्लम भागातील एक भूषण गवई सरन्यायाधीश होऊ शकतो, तर तुम्ही का मोठ्या पदावर जाऊ शकत नाही. सर्वच मुली सरन्यायाधीश होणार नाहीत, पण तुम्ही जिद्दीने अभ्यास केला तर खूप मोठ्या पदावर जाऊ शकता, याचा मला विश्वास आहे. त्यामुळे मराठी शाळांना कमी लेखू नये, मराठी शाळेतून देखील भारताचे सरन्यायाधीश घडू शकतात. अशा शब्दांत सरन्यायाधीशांच्या मातोश्रींनी अनाथ मुलींच्या मनात आशेचा किरण जागवला.

पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन (बालगृह) कुंभारवळण या संस्थेत आयोजित "माय लेकींचा हृदयस्पर्शी संवाद" कार्यक्रमात "आपले सुपुत्र भारताचे सरन्यायाधीश आहेत, त्यांना घडविण्यात आपला मोठा वाटा आहे. सरन्यायाधीशांची आई म्हणून आपली काय भावना आहे?" या मुलींच्या प्रश्नाला उत्तर देताना त्या मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी मंचावर संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड, ममता सपकाळ,




पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव सोनल पाटील, आनंदीकाकी जगताप, अधिक्षिका स्मिता पानसरे, विनय सपकाळ, सार्थक सेवा संघचे अनिल कुडिया उपस्थित होते. मुलींनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी मनमोकळे पणाने उत्तर दिले. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, १९७१ दरम्यान भारत बांगलादेश युद्ध सुरू होते. आम्ही फ्रेजरपुरा भागात राहायचो, तेंव्हा सैनिकांसाठी सेन्डॉप म्हणून पिठलं - भाकरी भोजनाची व्यवस्था आम्ही केली होती. मला भाकरी बनवायला भूषणची मदत झाली. मी भांडी घासायची, आणि भूषण भांडी धुवायचा. मी स्वैपाक करायचे, भूषण वाढणं करायचा. तिन्ही मुलांमध्ये दोघे भावंड लहान तर भूषण सर्वात मोठा मुलगा. लहानपणी गरजूंना मदत करण्याची आवड त्याच्यामध्ये निर्माण झाली, त्याला वेदनांची किंमत कळते. अशा जबाबदारीमुळे भूषण लहान वयातच परिपक्व झाला. त्याला सामाजिक भान आले. आज मी देशासाठी भूषणला अर्पण केले आहे, तो न्याय दानाचे पवित्र कार्य अतिशय प्रामाणिकपणे पार पाडत असल्याचे बघून माझं मन भरून येत. हे सांगत त्यांनी अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. नेता होण्यापेक्षा तुम्ही एक आदर्श माता, आई होण्याचा प्रयत्न करा, आज मी माईंच्या संस्थेला भेट देऊन धन्य झाले, माईंनी अनाथ मुलांना संस्कार दिले आहेत, ही



संस्था म्हणजे पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांची मायेची सावली, ज्यात अनाथ मुलींनी आपले स्वप्नं रुजवली आहेत. कमलताईंनी या मुलींशी अगदी आईसारखा हळुवार संवाद साधत त्यांचं मन जाणून घेतलं. पण केवळ मायेपुरताच हा संवाद मर्यादित नव्हता तो प्रेरणादायीही ठरला. या संवादाने अनेक मुली भावनाविवश झाल्या. त्यांनी आपल्या मनातील इच्छा, भीती आणि स्वप्नं कमलताईंशी शेअर केली. त्या प्रत्येक शब्दात एक आस होती, कुणीतरी आपलं ऐकावं, समजावं, आणि हातात हात देऊन म्हणावं, "तू एकटी नाहीस" डॉ. कमलताई गवई यांची ही भेट केवळ एक औपचारिक दौरा नव्हता, ती मायेची आणि प्रेरणेची ओल घेऊन आलेली आईच होती, जिने मुलींच्या डोळ्यांत आत्मविश्वासाचे अश्रू दिले. संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि उपस्थित पाहुणे यांच्यासाठीही हा क्षण अविस्मरणीय ठरला. या भेटीदरम्यान डॉ. कमलताईंनी माईंच्या लेकींशी अत्यंत हृदयस्पर्शी संवाद साधत त्यांचे मनोबल वाढवले. संस्थेतील मुलींशी संवाद साधताना त्यांच्या डोळ्यात आपुलकी आणि प्रेम ओसंडून वाहत होते. मुलींनीही आपले अनुभव आणि स्वप्ने उघड्या मनाने मांडले, त्याला कमलताईंनी आईच्या काळजातून समर्पक प्रतिसाद दिला. आजच्या या भेटीमुळे माईंच्या लेकींच्या स्वप्नांना नवे पंख लाभले. मायेची भाषा शब्दांची मोहताज नसते. ती नजरेतून, स्पर्शातून, आणि हृदयातून व्यक्त होते. अशाच एका हृदयस्पर्शी क्षणाला आज ममता बाल सदन साक्षीदार ठरले. आज तुमच्या एका मिठीत एका हास्यात माईंच अस्तित्व पुन्हा जाणवलं... आई कधीच जात नाही... ती दुसऱ्या रूपात परत येते. आज आम्हाला कमलताईंमध्ये आम्हाला आमच्या माई पुन्हा एकदा भेटल्या, अशी भावना ममता सपकाळ यांनी व्यक्त केली. समाजातील वंचित निराधार निराश्रीत लाभार्थी पर्यंत पोहचून त्यांना शासकीय योजनांचा फायदा मिळवून देण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण शिबिराच्या माध्यमातून वेळोवेळी कार्यरत राहील असा विश्वास सचिव सोनल पाटील यांनी व्यक्त केला. संस्थेतर्फे डॉ. कमलताई गवई आणि विधी सेवा प्राधिकरणच्या सोनल पाटील यांचा तिरंगा ध्वज, सन्मानचिन्ह, तुळशीचे रोप भेट देऊन स्वागत केले. चिमुकल्या मुलींनी स्वागत गीत आणि ऐतिहासिक पोवाडा सादर करून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचलन मुकेश चौधरी आणि सारिका कुंजीर यांनी केले. समाजातील अनाथ मुलांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्यामुळे त्यांना त्यांच्याकडे आधार कार्ड उपलब्ध नसतात किंवा ते आधार कार्ड काढण्यासाठी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो याबाबत पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत ज्या अनाथ मुलांकडे आधार कार्ड नाही अशा मुलांना आधार कार्ड मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत त्याचाच एक भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या साथी कार्यक्रम अंतर्गत ममता बाल सदन संस्थेत विधी सेवा प्राधिकरण तर्फे आधार कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन माझी लेडी गवर्नर डॉक्टर गवई यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात प्राथमिक स्वरूपात १५ अनाथ मुलांची आधार नोंदणी करण्यात आली आहे. विधी सेवा प्राधिकरण शिबिराच्या माध्यमातून ही अडचण दूर करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे नजिकच्या काळात अनाथ मुलांना देखील आधार कार्ड सोप्पे होईल.

# दीपिका पादुकोणच्या एक्स बॉयफ्रेंडने 'बिग बॉस १९'ची ऑफर नाकारली



'बिग बॉस १९'ची चाहत्यांना खूप उत्सुकता आहे. या वादग्रस्त शोबद्दल सतत नवीन अपडेट्स येत आहेत. यावेळी शोमध्ये बरेच बदल होणार आहेत. आतापर्यंत 'बिग बॉस १९'मध्ये सहभागी होण्यासाठी अनेक स्टार्सची नावेही समोर येत आहेत. अनेक स्टार्सची नावेही निश्चित केली जात आहेत. अशा परिस्थितीत या शोसाठी चर्चेत आलेले नाव ऐकून तुम्हालाही धक्का बसेल. हे नाव दुसरे-तिसरे कोणी नसून दीपिका पादुकोणच्या एक्स बॉयफ्रेंडचे आहे. 'बिग बॉस १९'चा स्पर्धक दुसरा तिसरा कोणी नसून दीपिका पादुकोणचा एक्स बॉयफ्रेंड अभिनेता मुझम्मिल इब्राहिम आहे. मुझम्मिलने अलीकडेच 'फिल्मीबीट'ला मुलाखत दिली. त्यादरम्यान मुझम्मिलने सांगितले की त्याला 'बिग बॉस १९'ची ऑफर मिळाली होती; पण त्याने ती नाकारली. मुझम्मिल म्हणाला, 'बिग बॉस हा एक रिॲलिटीवर आधारित शो आहे; टॅलेंट शो नाही. त्यात टॅलेंट नाही; मग मी तिथे जाऊन काय करू. हा माझ्या शैलीचा शो नाही.

यादरम्यान, जेव्हा अँकरने मुजम्मिल इब्राहिमला विचारले, 'तुम्हाला भविष्यात कधी जायचे आहे का?', तेव्हा अभिनेता म्हणाला, ''ज्यांनी माझ्याकडे अप्रोच करण्याचा प्रयत्न केला, मी त्यांना एकेक करून ब्लॉक केले आहे.'' त्यानंतर अँकरने विचारले, ''तुम्हाला कधी 'खतरों के खिलाडी' शोमध्ये जायचे आहे का?'' त्यावर अभिनेत्याने उत्तर दिले, ''हो, किमान त्या शोमध्ये प्रतिभा आहे, जी पाहता येते; पण बिग बॉसमध्ये नाही.''

दीपिकाच्या मॉडेलिंगच्या सुरुवातीच्या काळात म्हणजे २००२ मध्ये ती मुंबईत आल्यानंतर दीपिका पदुकोण व मुझम्मिल इब्राहिम दोन वर्षे रिलेशनशिपमध्ये होते, असे वृत्त आहे. नंतर त्यांनी हे नाते संपवले. दीपिकाचे रणवीर सिंहशी लग्न होईपर्यंत दोघेही मित्र राहिले. ब्रेकअपनंतर ते संपर्कात होते; परंतु दीपिकाच्या लग्नानंतर त्यांनी बोलणे बंद केले, असेही त्याने उघड केले.बिग बॉसशी संबंधित अपडेट्स देणाऱ्या . ने त्यांच्या इन्स्टाग्रामवर एक लेटेस्ट पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये असे सांगण्यात आले आहे की, यावेळी 'बिग बॉस १९'च्या घरात जेल राहणार नाही.

# वाढत्या वयात सारकोपेनिया होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी?

६८ वर्षांच्या आजी आमच्या बाह्यरुग्ण विभागात आल्या होत्या, त्यांना चालताना पाय उचलणं कठीण वाटत होतं, अचानक आपला तोल जाईल अशी भीती वाटत होती, खुर्चीवरून उठताना आधार घ्यावा लागत होता, वस्तू उचलताना हातात अशक्तपणा जाणवत होता, थकवा जाणवत होता आणि सामाजिक सहभाग अगदी कमी झाला होता. रक्ताच्या तपासण्या करुन झाल्या, एक्स-रे आणि एमआरआय देखील झाले त्यामधे विशेष असं काही आलेलं नव्हतं , पण आजींचा त्रास काही कमी होत नव्हता. आमच्याकडे आल्यानंतर आम्ही आजींना आवश्यक असे आणि सहज जमतील असे व्यायाम शिकवले, महिनाभर त्यांनी आमच्या फिजिओथेरेपी विभागात येऊन आमच्या मार्गदर्शनाखाली हे व्यायाम



केले. एक महिन्यानंतर आजींचा आत्मविश्वास तर वाढलाच आणि त्यांच्या हालचालींमधे सुसूत्रता देखील आली. आजींना जी लक्षण जाणवत होती ती 'सारकोपेनिया'शी संबंधित होती.

वय वाढलं की स्नायूंचा आकार आणि कार्यक्षमता कमी होते. सामान्यपणे ही प्रक्रिया ५०, ६० व्या वर्षानंतर सुरू होते आणि वाढत्या वयासोबत वेगाने वाढते. हे साहजिकच नैसर्गिक आहे पण यामुळे हालचालींचा वेग, हालचालींसाठी लागणार जोर म्हणजे फोर्स आणि हालचालींमधील सुसूत्रता कमी होते. त्यामुळे यावर उपाय करणे आवश्यक आहे.

सारकोपेनियाची लक्षणं काय?

१.चालताना पाय उचलणं कठीण वाटणं

२. जड वस्तू उचलताना किंवा दैनंदिन काम करताना हात-पायातील शक्ती कमी झाली आहे, असं वाटणं

३.अचानक तोल जाणं, पाय घसरून पडणं

४. उठताना आधाराची गरज भासणं

५. वजन कमी होणं, थकवा वाटणं

६. आत्मविश्वास आणि

वाढतं वय हे सारकोपेनिया होण्याचं प्रमुख कारण असलं तरीही त्यासोबत काही इतर घटकही यासाठी कारणीभूत असतात. जसं व्यायामाचा अभाव, आहारामध्ये प्रथिनांचा अभाव, अपुरी झोप, दीर्घकालीन आजार (जसे मधुमेह, रक्तदाब), वाढत्या वयाबरोबर बदलणारे हार्मोन्स आणि मानसिक तणाव.

# अश्विनी भावेंनी परदेशात केलेल्या आदरातिथ्याने भारावली सोनाली कुलकर्णी



आपल्या अभिनयाने आणि मनमोहक सौंदर्याने हिंदीसह मराठी प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या अभिनेत्री म्हणजे अश्विनी भावे. आपल्या अभिनयाने चर्चेत असणाऱ्या अश्विनी भावे सोशल मीडियावरही तितक्याच सक्रीय असतात. सोशल मीडियावर त्या काही फोटो-व्हिडीओ शेअर करत असतात. अशातच त्यांनी काही दिवसांपूर्वी एक खास व्हिडीओ शेअर केला होता. अश्विनी भावेंच्या परदेशातील घरात मराठी इंडस्ट्रीमधील अनेक तारेतारकांनी उपस्थिती लावली होती. यावेळी अश्विनी भावेंनी सर्वांचं अगदी प्रेमाने आदरातिथ्य केलं. याचाच व्हिडीओ त्यांनी आपल्या सोशल मीडियावर शेअर केला होता. त्यांच्या या व्हिडीओ अनेकांच्या पसंतीस उतरला. अनेक चाहत्यांनी या व्हिडीओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला. अश्विनी भावेंनी केलेल्या या आदरातिथ्याबद्दल अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी त्यांचे आभार मानले आहेत. सोनाली कुलकर्णीने सोशल मीडियावर खास फोटो शेअर केले आहेत आणि या पोस्टमध्ये ती म्हणते, ''खुद्द अश्विनी मला म्हणाली होती, 'तू ये ना' याआधी जेव्हा जेव्हा मी गेले होते, तेव्हा आमची चुकामूक झाली होती; पण नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशनचा 'नाफा मराठी चित्रपट महोत्सवा'च्या सांगता समारंभाची पार्टी अश्विनी होस्ट करणार, हे कळल्यावर भारी वाटलं.'' पुढे सोनाली म्हणते, ''तिथे जाईपर्यंत अंदाज नव्हता, पण एवढंच सांगते. अश्विनी आणि किशोरचं प्रेमळ साम्राज्य बघून मन अभिमानानं भरून आलं आणि दणदणीत मेजवानीनं पोटही गच्च भरलं.. किती गोड कपल आहे. अमेरिकेत इतकी सुंदर, इतकी पॅशनेट बागाईतदार बघायला मिळणं फारच विरळ. तिचं संपूर्ण कुटुंबाबरोबर, 'नाफा'च्या टीमबरोबर मिळून मिसळून असणं, आमच्याशी एवढ्या जिव्हाळ्यानं वागणं हे बघताना मी हरखून गेले.''

## राशी-भविष्य

**मेष :** नवीन योजनांचा फायदा होईल. घाईघाईत घेतलेल्या निर्णयांमुळे नुकसान होऊ शकते. कुटुंबात वाद होण्याची शक्यता आहे.

**वृषभ:** नोकरीत परिस्थिती चांगली राहणार नाही. घर आणि कुटुंबाशी संबंधित समस्याही असतील. विद्यार्थ्यांना चांगले यश मिळू शकते.

**मिथुन :** मालमत्तेशी संबंधित कामाचा फायदा होईल. विद्यार्थ्यांसाठी वेळ चांगला राहील. मानसिक ताण येऊ शकतो.

**कर्क :** जोडीदाराच्या मदतीने तुम्हाला पैसे मिळू शकतात. नोकरी करणाऱ्यांना विरोधकांचा त्रास होईल. विद्यार्थ्यांसाठी वेळ चांगला राहील. आरोग्यही थोडे चांगले राहील.

**सिंह :** तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. कुटुंबाचे वातावरण आनंददायी असेल. रागावर नियंत्रण ठेवा आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**कन्या :** कोणाशीही अनावश्यक वाद घालू नका, अन्यथा तुम्ही वादात अडकू शकता. कुटुंबातील वातावरण चांगले राहील.

**तुळ :** खूप राग येईल. तुम्हाला जुने मित्र भेटू शकतात. तुम्ही कुटुंबासोबत फिरण्यात वेळ घालवू शकता. विद्यार्थ्यांसाठी हा चांगला काळ आहे.

**वृश्चिक :**तुम्हाला वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आरोग्य थोडे खराब असू शकते. तुमचे बोलणे, स्वभाव आणि चिडचिडेपणा नियंत्रित करा.

**धनु :** तुम्ही धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकता. व्यवसाय किंवा कार्यालयाशी संबंधित कामासाठी तुम्ही सहलीला जाऊ शकता.

**मकर :** अनावश्यक खर्च वाढू शकतात, ज्यामुळे आर्थिक स्थिती कमकुवत होण्याची शक्यता असते. तुम्ही जितके जास्त कष्ट कराल तितके तुम्हाला बक्षीस मिळेल.

**कुंभ :** मालमत्तेत गुंतवणूक करणे फायदेशीर ठरेल. जर तुम्हाला लहान समस्या आल्या तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. प्रवास यशस्वी होईल. विद्यार्थ्यांचा वेळ चांगला जाईल.

**मीन :** काही कामावर अनावश्यक पैसे खर्च होऊ शकतात. जास्त राग तुम्हाला अडचणीत आणू शकतो. काही कामावर अनावश्यक पैसे खर्च होऊ शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 135



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
अंक, अज, अक्ष, कीम, केस, गण, जग, जाई, तडा, तवा, तेढ, दंश, नव, नोट, पण, भय, मत, मस, माया, मावा, यश, रग, रद्दी, रम, रवा, रस, राम, लव, लाटी, वाम, वास, शशी, सण, साल, हर्ष, हुत

**तीन अक्षरी**
अमात्य, अक्षर, कवच, कसर, गरज, घासणे, चाटण, चातक, जागृती, ढवळा, तनस, तक्षक, तिरळा, नजर, नवस, नक्षत्र, पळस, पंकज, भगवा, रकम, वलय, बुद्रुक, मालकी, रवाळ, यादवी, लावणी, वशीला, वकील, वरदा, विजन, शतक, शारदा, सवय, सावज, सुघट

**चार अक्षरी**
अकारण, कुळाचार, तजवीज, फुशारकी, भरधाव, मतलब, मनोगत, मुबलक, मुक्तिमार्ग, रमणीय, राहुकेतु, लपंडाव, वनराज, वीरासन, सरगम, सरपण, हयगय

**पाच अक्षरी**
अजरामर, अतिशयोक्ती, कुतुबुद्दीन, मन मारणे, मार्गदर्शन, मेघपटल, रसमलाई, विजयघाट

**सहा अक्षरी**
समयसुचक

**अन्य अक्षरी**
सत्यमेव जयते

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 516



**आडवी विधाने :–** 1) मयूर पंख 4) वेडा, भ्रमिष्ट 6) विरुद्ध पक्षाच्या वकिलाने प्रतिप्रश्न विचारणे 10) मनाची अस्थिरता 12) सेकंद (हिं) 13) बुद्धिबळाच्या खेळात शत्रूच्या राजाचा हत्ती, घोडा इ. नी प्रतिबंध केला असता होणारा डाव 15) देणारा, देण्यासारखा 17) दरारा, धास्ती 18) उत्तर प्रदेशातील वाराणसी जवळ आणि गंगा व गोमतीच्या संगमावर असलेले एक ऐतिहासिक तीर्थक्षेत्र 20) पक्ष्यांची किलबिल 22) एक विदेशी मद्य प्रकार 23) वणवा, दावानल 24) त्याप्रमाणे, त्या सारखा 26) चांगली उपजाऊ जमीन 28) पैसा, संपत्ती 30) उपकाराची पूर्तता करणे 33) पर्ण, तांबुल 35) वाईट सवय 36) उच्च मर्यादा पार करणे 38) श्रीगणेश, गणपती 39) मुख्य, श्रेष्ठ (उर्दू ) 41) एक वेद, गोड बोलणे 42) ढीग, श्रीकृष्णाने गोपिकांसवे केलेले नृत्य 44) थंड, शीतल 46) चांदी 48) झुंज, डोक्याला डोके भिडणे 50) रात्री प्रकाशणारा एक किडा 52) प्रकाशणे चकाकणे 54) दुष्ट, वाईट प्रवृत्तीचा 56) पाहुणा, अभ्यागत 57) दिव्याची ज्योत 58) आश्चर्यचकित होणे 59) कमळातून उत्पन्न झालेली, लक्ष्मी 62) पराभव 63) जोराचा आवाज, गडबड 65) टिकाव, निभाव 66) शांत, धैर्यवान 68) एकात एक गुंतलेले केस 69) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा 71) मुंबईतील एक उपनगर 73) बारा वर्षांची मुदत 75) दुष्ट हेतुने एखाद्याला पळवून नेणे 76) गर्दभ, गाढव 77) लहान, छोटा 79) प्रख्यात नाटककार वि. वा. शिरवाडकर यांनी लिहिलेले एक प्रसिद्ध नाटक 80) अल्प, कमी 81) लहानपणीच बालकांवर केलेले संस्कार 83) कलेची जाण असणारा 86) साखळी 87) इमारतीची किंवा सर्पणाची लाकडे मिळण्याचे दुकान 88) विध्वंस 89) गणपती 90) आजारी, व्याधीने ग्रस्त 91) चाकरी, शुश्रुषा

**उभी विधाने :–** 1) घोडशाळेतील घोड्यांचा सांभाळ करणारा 2) पाचांचा समुदाय 3) मसलत, दुष्ट मनुष्य 4) लाकूड चिरण्यासाठी मारलेली खुंटी 5) लहान जहाज 6) वैराग्य, पश्चाताप 7) सुंदर स्त्री 8) काळजी, फिकीर 9) पाप, दुष्कर्म 11) दुसऱ्यांदा लग्न करणारा 14) दक्ष, जागृत 16) साहित्यातील एक शब्दालंकार 19) थकलेले, येणे असलेली राशी 21) विवाह 23) उणीव, कमतरता 25) साधना करणारा 27) अनेक दिवस पोटात राहिलेला गर्भ 29) डंका, नौबत 30) कमी, वजा करणे 34) क्रोध, संताप 32) एकच गोष्ट क्रमाने तीन वेळा घडणे 33) पानाला पीठ लावून निखाऱ्यावर भाजलेली भाकरी 34) म्हातारपण, वार्धक्य 36) दिसणे, स्पष्ट होणे 37) खोकला, ढास 40) न्यायाधीश (इं) 43) द्वेष, मत्सर 45) गुप्त गोष्ट, गूढ 47) समशेर, खड्ग 49) राखण करणारा 51) रामायणात सीतेचा पिता 53) सापाने टाकलेली त्वचा 55) दैव, नशीब 56) हळूच, इकडे तिकडे स्पर्श न होता 58) चढाओढ, स्पर्धा 60) निवडणुकीत आपले मत नोंदविणारा 61) गीताला चढविलेला वाद्यांचा साज 62) बाजारपेठ, मंडई 64) हाकेस उत्तर 67) चापट किंवा मऊ पदार्थांचा आघात 68) राणीवसा 70) युद्धभूमी 72) रसभरीत, चवदार 74) नवऱ्याचा मोठा भाऊ 75) गुंतून किंवा अडकून पडणे 76) जोराचे भांडण 78) अपुऱ्या किंवा चपटया नाकाचा 81) लहान मुलांचा नामकरणविधी 82) बसल्या बसल्या येणारा झोपेचा झटका 84) मृतदेह (हिंदी) 85) दही घुसळण्याचे काष्ठयंत्र

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महत्वाचे

### अपघातात वृद्ध जागीच ठार

**नागपूर :** अज्ञात आरोपी महिला चालकाने ज्येष्ठ नागरिकाला धडक देवून त्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याने तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे बेलतरोडी पोलिस पुढील तपास करत आहे. पोलिसांनुसार, फिर्यादी चंद्रकुमार महेश वर्मा यांचे वडील महेश बिसाहू वर्मा दुधाचा व्यवसाय करत असून, ते १६ ऑगस्ट रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास त्यांच्या गायीचा शोध घेत होते. सोमवारी बाजारकडून ते जिजामाता चौकाकडे जात असताना न्यू मनीष नगर, डीपी रोड, बेलतरोडी येथे अज्ञात मोपेड चालकाने बेदरकारपणे आणि धोकादायक वेगाने वाहन चालवून महेश वर्मा यांना धडक दिली.

यावेळी ते गंभीर जखमी झाले.

मात्र, आरोपी महिलाने त्यांना वैद्यकीय मदत करण्याऐवजी त्यांना तिथेच सोडून पळून गेली. यानंतर महेश यांना जखमी अवस्थेत शताब्दी चौकातील तायवाडे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

### गांजा जप्त ; आरोपीला अटक

**नागपूरः** गुन्हे शाखा युनिट क्रमांक पाचच्या पथकाने गांजा बाळगणाऱ्या आरोपीला अटक केली. शेख शोएब शेख जमीर (वय २२ वर्षे, भगवाडा, अकोला) असे त्याचे नाव आहे.

माहितीनुसार, सदर पथक रविवारी रात्री साडेनऊ ते पावणे अकराच्यादरम्यान सीताबर्डी ठाण्याच्या हद्दीत मॉरेस टी-पॉईंट, फ्रीडम पार्क ते इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कॉलेज, डी.पी. रोडवरील नाल्याजवळ संशयास्पद शेख शोएब शेख जमीर याला थांबवून त्याची चौकशी केली असता झडतीत त्याच्याकडील ट्रॉली सूटकेसमध्ये २ किलो ४० ग्रॅम वजनाचा गांजा (अंदाजे ५१ हजार किंमत) मिळून आला.

आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) आणि २०(ब)(२)(ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याला अटक करून पुढील तपासासाठी सीताबर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# अधिकृत वीजजोडणीची मागणी करा

## गणेशोत्सव मंडळांना महावितरणचे आवाहन, बाप्पाच्या उत्सवासोबतच सुरक्षा राखण्याचे आर्जव

नागपूर, दि. १८ प्रतिनिधी

**महाराष्ट्राचे आराध्य दैवत गणपती बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा होणाऱ्या उत्सवामध्ये कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी महावितरणने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना वीज सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत अधिकृत वीजजोडणी घेण्याचे आवाहन केले आहे. आनंदात कुठलेही विघ्न येऊ नये, यासाठी अधिकृत आणि सुरक्षित वीज जोडणी महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले आहे.**


संग्रहित

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला महाराष्ट्राचा राज्य उत्सव म्हणून घोषित केले आहे. सार्वजनिक उत्सव आनंददायी आणि सुरक्षित करण्यासाठी, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सार्वजनिक उत्सवांसाठी तात्पुरत्या वीज जोडणीसाठी घरगुती दराचे वीजदर निश्चित केले आहेत. मंडळांनी अनधिकृत जोडण्या टाळाव्यात आणि अधिकृत वीजपुरवठा घेवून संभाव्य अपघातांचा धोका टाळावा. मंडप, रोषणाई, देखावे, महाप्रसाद आणि इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था केवळ अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घेण्याची सूचनाही महावितरणने दिली आहे.

**महत्त्वाची खबरदारी**

रोषणाई आणि देखावे उभारताना परिसरातील वीज वाहिन्या, खांब किंवा वितरण रोहित्रांपासून सुरक्षित अंतर ठेवावे. वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घ्या. यामुळे जनरेटरमधील वीज लघुदाब वाहिनीत प्रवाहित होऊन होणारे संभाव्य अपघात टाळता येतात. जवळच्या वीज खांबांवर किंवा वाहिन्यांवर 'हुकम टाकून वीज घेऊ नका. यामुळे जीवित आणि वित्तहानीचा मोठा धोका असतो. वीज जोडणीसाठी वापरण्यात येणारी तार किंवा केबल विजेचा भार पेलण्यास सक्षम असल्याची खात्री करा. जुनी किंवा तुटलेली तार वापरू नका. सर्व विद्युत उपकरणांचे योग्य अर्थिंग असल्याची खात्री करा आणि वेळोवेळी त्याची चाचणी घ्या. एकाच मल्टी प्लगवर अनेक उपकरणे जोडण्याचा अट्टहास करू नये.

**आपत्कालिन स्थिती...**

**आणिबाणीच्या परिस्थितीत मदतीसाठी मंडळांनी २४ तास सुरू असलेल्या १९१२, १९१२०, १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.याशिवाय, संबंधित भागातील महावितरणच्या अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावेत. बाप्पाचा उत्सव साजरा करताना सुरक्षेला प्राधान्य देत एका जबाबदार मंडळाची ओळख निर्माण करूया.**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Company Limited

## पालकमंत्र्यांनी विविध विषयांवरील २८० निवेदने स्वीकारली

### जनसंवादद्वारे जनतेच्या समस्या जाणून घेतल्या



नागपूर, दि. १८ प्रतिनिधी

महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जनसंवाद कार्यक्रमात वृद्ध, महिला, विद्यार्थी, दिव्यांग, तृतीयपंथी अशा समाजाच्या सर्व थरातील जनतेच्या समस्या जाणून घेतल्या सर्वांची निवेदने स्वीकारून त्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी आश्वस्त केले.

नियोजन भवन येथे आयोजित जनसंवाद कार्यक्रमात नागपूरसह वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली व अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी महसूल मंत्री बावनकुळे यांची भेट घेतली. यावेळी २८० लेखी निवेदने स्वीकारण्यात आली. नागरिकांनी व्यक्तिशः भेट घेत संवाद साधत आपल्या समस्या, अडचणी आणि मागण्या लेखी स्वरुपात सादर केल्या. विविध शिष्टमंडळांनीही महसूल मंत्री बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदने सादर केली. जनतेच्या समस्या, मागण्या समजून घेत यावर उचित कार्यवाही करण्यासंदर्भात त्यांनी उपस्थित विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच, शासनाच्या संबंधित विभागाकडे कार्यवाहीसाठी पाठविण्याचे निर्देशही दिले.

## 'कृष्णरंग'




**नागपूर : नुपूर कत्थक केंद्रातर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने 'कृष्णरंग' हा विशेष कत्थक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. केंद्राच्या गुरु रुही मासोदकर आणि विद्यार्थिनींनी शास्त्रीय नृत्यकलेतील आपली निपुणता आणि समर्पण सादर करत रसिकांची वाहवा मिळवली.**

### अज्ञात वाहनाची धडक

**नागपूर, दि. १८:** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एकजण गंभीर जखमी झाला अपघातास कारणीभूत ठरलेल्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.माहितीनुसार, फियार्दी मनोजकुमार राजकुमार वर्मा यांचा साळा अनिल रामप्रसाद सूर्यवंशी (वय ३३, सिल्लेवाडा, नागपूर) १४ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी साडेचार वाजताच्या सुमारास आपल्या दुचाकीने खापरखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत सिल्लेवाडा काटा रोडने जात होते. मार्गात अचानक एका अज्ञात चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे आणि धोकादायकपणे चालवून दुचाकी धडक दिली आणि पळून गेला. या अपघातात अनिल खाली पडल्याने गंभीर दुखापत झाली, त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले. मनोजकुमार राजकुमार वर्मा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## स्वातंत्र्यदिनी पत्रकार कुटुंबियांचा रंगला स्नेहसोहळा

नागपूर, दि. १८ प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनी नागपूर श्रमिक पत्रकार संघ, टिळक पत्रकार भवन ट्रस्ट व प्रेस क्लब ऑफ नागपूरच्या संयुक्त विद्यमाने प्रेस क्लब येथे पत्रकारांचा कौटुंबिक स्नेहसोहळा आयोजित करण्यात आला. सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रपतीपदक विजेते पोलिस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. सोहळ्याच्या प्रारंभी नागपुरातील पुरस्कारप्राप्त पत्रकारांना गौरवान्वित करण्यात आले. यात हुमेरा मरियम (हितवाद), सतीश राऊत (हितवाद), डॉ. योगेश पांडे (लोकमत), योगेंद्र तिवारी (इंडिया टीव्ही), राखी चव्हाण (लोकसत्ता), नरेश शेळके (सकाळ), सुरेश उर्फ छोटू वैतागे (दै. भास्कर), राम भाकरे (लोकसत्ता), श्रीमंत माने (लोकमत), विवेक देशपांडे (इंडियन एक्सप्रेस), रामू भगत (टाईम्स ऑफ इंडिया), ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर दुपारे यांचा समावेश होता. पुरस्कारविजेत्यांना पोलिस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**गुणवंत पाल्यांचा सत्कार**




**पाल्याचा सन्मान**

सोहळ्यात पत्रकारांच्या इयत्ता दहावी व बारावीतील यशस्वी गुणवंताचा सत्कार करण्यात आला. त्यात कस्तुरी राम भाकरे, तनुषा परितोष प्रामाणिक, तन्मयी बिपेंद्र सिंग, देवांग बिपेंद्र सिंग, आदिती आनंद शर्मा, देवांग राजेश रामपूरकर, अमोघ हेमंत सालोडकर, गार्गी सुनिल सोनी, रौनक आकाश दुपारे, रिहान दुपारे यांचा समावेश आहे.सत्कार सोहळ्यानंतर राजेश समर्थ व त्यांच्या वाद्यवृंदाने देशभक्तीपर गीतांसह अन्य श्रवणीय गीते सादर केली. गायिका स्वस्तिका ठाकूर यांनीही समधुर गीतांनी श्रोत्यांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन नरेश डोंगरे यांनी केले. याप्रसंगी प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीपकुमार मैत्र, पत्रकारसंघाचे अध्यक्ष ब्रह्मशंकर त्रिपाठी, शिरीष बोरकर व अन्य ज्येष्ठ पत्रकार उपस्थित होते.

## नागपूर परिमंडल कार्यालय राज्यात अव्वल

### १०० दिवसांच्या मोहिमेत मोठी कामगिरी, पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

नागपूर, दि. १८ प्रतिनिधी

सरकारी कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या शंभर दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेने मोठे यश मिळवले आहे. या मोहिमेत राज्यातील साडेबारा हजार कार्यालयांनी सहभाग घेतला होता. या यशस्वी मोहिमेत, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) च्या नागपूर परिमंडल कार्यालयाने विभागस्तरीय कार्यालयांच्या गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, नागपूर प्रादेशिक संचालक कार्यालयालाही या मोहिमेत तृतीय क्रमांक मिळाला आहे.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित एका विशेष कार्यक्रमात महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांना महसूल मंत्री तसेच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले. खासदार श्यामकुमार बर्वे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, अतिरिक्त आयुक्त माधवी चवरे खोडे, पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलिस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, स्वातंत्र्यसैनिक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नेत्रदीपक यशाबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आणि संचालक मंडळाने प्रादेशिक संचालक परेश भागवत आणि नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांचे विशेष अभिनंदन केले आहे. या कामगिरीचे श्रेय सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नां ना असल्याचे नमूद करत परेश भागवत आणि दिलीप दोडके यांनी सर्वांचे आभार मानले.



## बौद्ध समाजासाठी हवी आर्थिक स्वायत्तता

### डॉ.राजरत्न आंबेडकर यांचे प्रतिपादन

नागपूर, दि. १८ प्रतिनिधी

बौद्ध समाजाच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीसाठी स्वतंत्र व्यवस्था हवी, असे प्रतिपादन दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी केले. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया नागपूर शाखेच्या वतीने सुरेशभट सभागृहात आयोजित डॉ. भिमराव रामजी आंबेडकर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या नागपूर शाखेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

भिक्कुनी भंते सुनिती, भंते सुमेधा, भंते निम्मलमेत्ता, राष्ट्रीय महासचिव राहुल शेंडे, राज्य अध्यक्ष रविंद्र गुरचळ, उपाध्यक्ष विजय वासे, सचिव विजय बनसोड, संघटक बुधाजी वाढविंदे, रविकांत जाधव, नीरज ताकसांडे, अशोक गडकरी, मध्य प्रदेश अध्यक्ष सदाशिव सोनटक्के, छत्तीसगडचे अध्यक्ष डॉ. एमडीवालदे प्रामुख्याने उपस्थित होते.डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी प्रथम राज्यघटनेतील प्रास्ताविकेचे वाचन करून संबोधित केले ते म्हणाले, की बौद्धांची स्वतंत्र आर्थिक व्यवस्था निर्माण व्हावी या करिता डॉ. भिमराव रामजी आंबेडकर मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी (बँकिंग)ची स्थापना करण्यात आली आहे. या सोसायटीचे पुढील दोन वर्षांत बँकेत रुपांतर करण्यासाठी १० लाख शेअर भागधारकांची गरज आहे. बँकेच्या व्यवस्थापनात बौद्धांची सत्ता कायम राहण्यासाठी बौद्धांनी भागधारक बनण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रारंभी जिल्हा शाखा अध्यक्ष राजेश (बौद्ध) दहिवले यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन अजय पात्रे यांनी, प्रास्ताविक मीडिया समन्वयक डी.डी.गजभिये यांनी केले प्रा. प्रीती तिरपुडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिव आकाश चवरे, नरेंद्र चहांदे, सरोज मेश्राम, अशोक रामटेके, प्रमोद श्रीरामे, अविनाश मेश्राम, अमन ठवरे, विलास झाडे, रंजीत राऊत, शांता डोंगरे, शीला रंगारी, किरण राऊत, अशोक सोनटक्के, देविदास राऊत, राजेश रामटेके, विनय वाघमारे, संजीवन वालदे, योगेंद्र भालाधरे, राजेश रंगारी, ज्योती बागडे, बेबी वानखेडे यांच्यासह समता सैनिक दलाचे प्रतिनिधींनी विशेष सहकार्य केले.




**ध्वजारोहण.... देशभक्तीपर गाण्यांचे सादरीकरण**

# गीताई कॉलेज ऑफ वुमेनमध्ये स्वातंत्र्यदिन सोहळा

नागपूर, दि. १८ प्रतिनिधी

**श्रीमती नातीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ संलग्न उमंग गीताई कॉलेज ऑफ वुमेन्स एज्युकेशन कोराडी रोड येथे भारतीय स्वातंत्र्यदिन सोहळा देशभक्तीपूर्ण वातावरणात पार पडला. पत्रकार दिलीप येवले यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. उमंग गीताई कॉलेज ऑफ वुमेन्स एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. दुर्गेश वासनिक, अश्विन अंजीकर मंचावर उपस्थित होते.**



प्रमुख पाहुणे दिलीप येवले यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत स्वातंत्र्यकाळातील माहिती सादर केली आपल्या वीर जवानांचा त्याग विसरता कामा नये त्यांच्या आहुतीतूनच आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, असे सांगितले.

प्राचार्य डॉ. दुर्गेश वासनिक यांनी विद्यार्थिनींना स्वातंत्र्य दिनाचा महत्त्व समजावून दिले. कार्यक्रमात देशभक्तीपर गीत, भाषणे सादर करण्यात आली संचालन काजल मारापे, प्रेरणा सूर्यवंशी, आरती मज्जी यांनी केले. सीमा टेकाम यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संचालिका वैशाली फुले, प्रा. प्रीती मानकर, प्रा. प्राची रंगारी, प्रा. मोनाली रामधाम, प्रा. पूनम सोनवने, प्रा. मोहिता जैतवार, प्रा. नेहा तेलमोरे, प्रा, साक्षी जैस, सा. प्रा मृण्मयी जोगळेकर, सा.प्रा ज्योती चंद्रवंशी, प्रा. ऋणाली ढबाले, सा.प्रा. शिल्पा कावळे, सा.प्रा. प्रियंका धोके, निलेश मेश्राम, पवन करमेले, गौरव गावंडे, कु.पायल, प्राची टेंबरे, कीर्ती भोरकर, मधुकर डांगे आदींनी सहकार्य केले.

**समाज कल्याण विभाग**

दीक्षाभूमी परिसरातील समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग, नागपूर यांच्या विद्यमाने ७९ वा स्वातंत्र्य वर्धापन दिन साजरा करण्यात आला. समता प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. वरिष्ठ अधिकारी विजय वाकुडकर, प्रल्हाद कुळकर्णी, मंगेश वानखेडे, सुकेशनी तेलगोटे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाला फेस्कॉमचे प्रादेशिक सचिव डॉ. दीपक शेंडेकर, डॉ. मिलिंद वाचनेकर, देवराव सवाईथूल, काशिनाथ धांडे, श्रीराम बांधे, सुरेश भुजाडे, अरविंद तायडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**हनुमाननगर सार्वजनिक वाचनालय**

हनुमाननगर सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. सेवानिवृत्त पोलिस महा निरीक्षक डी. जे. उईके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रा. सतीश दंडे, डॉ. प्रदीप पहाडे, श्री गिरीश हरकरे, डॉ. यशवंत देशपांडे, नीलिमा टेंभेकर यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती अमित खळतकर यांनी प्रतिज्ञा वाचन केले.कार्यक्रमाचे संचालन विकास खळतकर यांनी केले.

## शालार्थ आयडी घोटाळाप्रकरणी सख्ख्या भावांना अटक

### एकूण आरोपींची संख्या २० वर पोहोचली

नागपूर, दि. १८ प्रतिनिधी

बनावट शालार्थ ओळखपत्राच्या आधारे नियुक्ती झालेल्या नागपुरातील दोन लिपिकांना रविवारी विशेष तपास पथकाने अटक केली. सदर आरोपी सख्खे भाऊ असून, आता या घोटाळ्यातील आरोपींची संख्या आता २० वर पोहोचली आहे. या दोघांच्या चौकशीतून आता आणखी नावे समोर येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

संबंधित घोटाळ्यातील प्रमुख 'सूत्रधार' निलेश वाघमारे हातात येताच विशेष तपास पथक आणि सायबर सेलने कसून चौकशी सुरू केली आहे. तपासादरम्यान हुडकेश्वर येथील श्रावणजी वाटकर उच्च प्राथमिक शाळेतील कनिष्ठ लिपीक मंगेश केशव निनावे (३५) आणि नंदनवनमधील केशवनगर उच्च प्राथमिक शाळेतील कनिष्ठ लिपिक मनिषकुमार केशव निनावे (३२) यांची नावे समोर आली. दोघेही सख्खे भाऊ असून ते ओंकारनगर येथील प्रज्योती कोर्ट अपार्टमेंट येथे राहतात.

**व्याप्ती वाढणार**

आरोपी मंगेशची नियुक्ती मार्च २०२३ मध्ये झाली होती. तर, मनिषकुमार हा जुलै २०१९ पासून नोकरीत रुजू झाला. या दोघांनीही त्यांच्या नोकरीच्या कार्यकाळात ४१ लाख ४९ हजार रुपयांचे वेतन घेतले. त्यांनी अधिकारी व दलालांच्या माध्यमातून बनावट शालार्थ ओळखपत्र तयार करवून घेतले. त्यानंतर वेतन मंजुरीसाठी ते विभागाकडे पाठविण्यात आले. चौकशीतून ही बाब स्पष्ट होताच तपास पथकाने दोघांनाही रविवारी अटक केली.

# मेस्सीचा ८७५ गोलांचा टप्पा पार!



मियामी : दि.१८ प्रतिनिधी

आधुनिक फुटबॉलचा अनभिषिक्त सम्राट लायोनेल मेस्सीने इंटर मियामी क्लबकडून खेळताना त्याने आपल्या व्यावसायिक कारकिर्दीतील ८७५ वा गोल नोंदवत एक ऐतिहासिक टप्पा गाठला. विशेष म्हणजे, हा पराक्रम करणारा तो जगातील सर्वात तरुण आणि सर्वात कमी सामने खेळलेला खेळाडू ठरला आहे.

इंटर मियामीने लॉस एंजेलिस गॅलेक्सी संघावर ३-१ ने मिळवलेल्या विजयात मेस्सीने हा मैलाचा दगड पार केला. दुखापतीमुळे काही काळ मैदानाबाहेर राहिल्यानंतर पुनरागमन करताना मेस्सीने केवळ ४५ मिनिटांच्या खेळातच आपली जादू दाखवली. त्याने प्रतिस्पर्धी संघाच्या बचावफळीला भेदत मारलेला अप्रतिम गोल डोळ्यांचे पारणे फेडणारा होता. हा त्याचा केवळ ११९६ सामन्यांमधील ८७५ वा गोल ठरला, जो एक विश्वविक्रम आहे.मेस्सीच्या या सोनेरी कारकिर्दीची सुरुवात १ मे २००५ रोजी झाली होती, जेव्हा त्याने बार्सिलोनासाठी वयाच्या १७ व्या वर्षी आपला पहिला व्यावसायिक गोल केला होता. तेव्हापासून सुरू झालेला हा प्रवास अर्जेंटिना, पीएसजी आणि आता इंटर मियामी असा सुरू आहे.सर्वाधिक गोल करण्याच्या यादीत मेस्सी आता ख्रिस्तियानो रोनाल्डोपेक्षा (९३८ गोल) केवळ ६३ गोलांनी मागे आहे.मेस्सीने केवळ गोलच केले नाहीत, तर आपल्या कारकिर्दीत तब्बल ३८९ असिस्ट्स् (गोल करण्यासाठी मदत) देखील केले आहेत.मेस्सीची सातत्यपूर्ण कामगिरी पाहता, तो लवकरच १००० गोलांचा अविश्वसनीय टप्पा गाठेल, अशी आशा जगभरातील फुटबॉल चाहते व्यक्त करत आहेत.

## महत्त्वाचे

### बॅडमिंटन विश्वात 'शटलकॉक'ची टंचाई



**बीजिंग:** जगभरात बॅडमिंटनचा चाहतावर्ग कोट्यवधींच्या घरात पोहोचला असताना, या खेळाच्या मूळ घटकावरच आता मोठे संकट ओढवले आहे. बॅडमिंटनचा आत्मा मानल्या जाणाऱ्या नैसर्गिक पंखांच्या शटलकॉकची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, त्यांच्या किमती अक्षरशः गगनाला भिडल्या आहेत. या 'शटल संकटा'मुळे आंतरराष्ट्रीय स्तरापासून ते स्थानिक क्लबपर्यंत खेळाडू, प्रशिक्षक आणि संघटनांमध्ये चिंतेचे ढग दाटले आहेत.

बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनने काही वर्षांपूर्वी कृत्रिम पंखांच्या शटलचा प्रयोग केला होता. मात्र, खेळाडूंना अचूक फटके मारण्यात येणाऱ्या अडचणी आणि शटलचा मोठा आवाज यामुळे तो अयशस्वी ठरला होता.

### लिव्हिंगस्टोन-बेथेलची तुफानी खेळी

आयपीएल २०२५ मध्ये आरसीबी संघाने जेतेपद जिंकले. यावर्षी आरसीबी संघाचा सगळीकडे बोलबाला दिसत आहे. त्याचे कारण आता पहिले आयपीएलचे विजेतपद जिंकणाऱ्या आरसीबी संघातील खेळाडू इतर स्पर्धांमध्ये आपला डंका वाजवत आहेत. द हंड्रेडमध्ये हे खेळाडू आपले वर्चस्व गाजवतान दिसत आहे. या स्पर्धेमध्ये लियाम लिव्हिंगस्टोन आणि २१ वर्षीय जेकब बेथेल यांनी धुमाकूळ घातला आहे. या दोघांनी मिळून १३ चेंडूचा सामना करत विजयासाठी आवश्यक असणाऱ्या ५० धावा काढल्या आहेत. या खेळीने १३६ वर्षांचा विक्रम मोडीत काढत जेकब बेथेलने इंग्लंडचा सर्वात तरुण कर्णधार बनला आहे.आयपीएल २०२५ मध्ये आरसीबी संघाने आपले पहिले आयपीएलचे विजेतपद पटकावले. आरसीबीच्या विजयात चमकदार कामगिरी करणारे खेळाडू आता इतर स्पर्धांमध्ये देखील चमकत आहेत. लियाम लिव्हिंगस्टोन द हंड्रेडच्या चालू हंगामात सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला आहे.

## 'दुलीप ट्रॉफी'मध्ये ईशान-आकाश संघातून बाहेर





मुंबई : दि.१८ प्रतिनिधी

भारतीय संघात पुनरागमनाच्या प्रतीक्षेत असलेल्या यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशनला आणखी एक धक्का बसला आहे. दुखापतीमुळे तो दुलीप ट्रॉफी २०२५ च्या पहिल्या सामन्यातून बाहेर झाला आहे. त्याच्यासोबतच, इंग्लंड दौऱ्यात प्रभावी कामगिरी करणारा वेगवान गोलंदाज आकाश दीप यालाही विश्रांती देण्यात आली आहे. या दोन प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे पूर्व विभागाच्या संघात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. ईशान किशन पूर्व विभागाकडून दुलीप ट्रॉफीमध्ये सहभागी होणार होता, परंतु इंग्लंडमध्ये नॉटिंगहॅमशायरसाठी कौंटी क्रिकेट खेळताना झालेल्या दुखापतीतून तो अद्याप पूर्णपणे सावरलेला नाही. याच दुखापतीमुळे इंग्लंड दौऱ्यादरम्यान यष्टीरक्षक ऋषभ पंत जखमी झाल्यानंतरही त्याला बदली खेळाडू म्हणून भारतीय कसोटी संघात स्थान मिळू शकले नव्हते. 'ईएसपीएनक्रिकइन्फो'च्या वृत्तानुसार, ई-बाईकवरून पडल्यामुळे किशनला अनेक टाके पडले होते. सध्या त्याची दुखापत गंभीर नसली तरी, आगामी काळात त्याला भारत अ संघाकडून दोन महत्त्वाचे सामने खेळायचे आहेत. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून त्याला दुलीप ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यातून वगळण्यात आले आहे. त्याच्या जागी पूर्व विभागाच्या संघात ओडिशाचा यष्टीरक्षक आशीर्वाद स्वेन याला संधी देण्यात आली आहे.

## विराट-अनुष्काचा लंडनच्या रस्त्यावरील व्हिडिओ व्हायरल

नवी दिल्ली : दि.१८ प्रतिनिधी

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या आपली पत्नी आणि बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा तसेच दोन्ही मुलांसह लंडनमध्ये वास्तव्यास आहे. हे जोडपे नेहमीच प्रसिद्धीपासून दूर राहण्याला प्राधान्य देते. नुकतेच दोघेही विम्बल्डन टेनिस स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित होते. आता लंडनच्या रस्त्यांवर फिरतानाचा त्यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.या व्हिडीओमध्ये विराट आणि अनुष्का कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहेत. विराटने काळी शॉर्ट्स आणि तपकिरी टी-शर्ट परिधान केला होता, तर अनुष्काने पांढरी जॅकेट घातली होती. व्हिडीओमध्ये दोघेही स्थानिक लोकांशी बोलताना आणि हसताना दिसत आहेत. विराटच्या हातात काळी छत्री आणि पाण्याची बाटली दिसत होती. भारतात सामान्य नागरिकांप्रमाणे रस्त्यावर फिरणे या जोडप्यासाठी कठीण आहे, परंतु लंडनमध्ये ते या स्वातंत्र्याचा आनंद घेताना दिसत आहेत.

## ऑस्ट्रेलियाचा संघ जाहीर




मुंबई : दि.१८ प्रतिनिधी

ऑस्ट्रेलिया संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्धची तीन सामन्यांची टी २० मालिका जिंकल्यानंतर ऑस्ट्रेलिया आता एकदिवसीय मालिका खेळणार आहे. यासाठी ऑस्ट्रेलिया क्रिकेटकडून दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी संघ जाहीर करण्यात आला आहे. या संघातून स्टीव्ह स्मिथला वगळण्यात आले आहे. तो पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याची शक्यता आहे.

त्याच वेळी, कसोटी संघाबाहेर असलेल्या मार्नस लाबुशेन पुनरागमन करणार आहे. ऑस्ट्रेलियाआधी दक्षिण आफ्रिकेने आपला संघ जाहीर केला आहे.मिशेल मार्श ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व करणार आहे तर दक्षिण आफ्रिकेच्या संघाची धुरा टेंबा बवूमा सांभाळणार आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेसाठी पॅट कमिन्स आणि मिशेल स्टार्कला विश्रांती देण्यात आली आहे. त्याच वेळी, कॅमेरॉन ग्रीन देखील या मालिकेत पुनरागमन करणार आहे. या मालिकेतून अनुभवी ऑस्ट्रेलियन खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे.ऑस्ट्रेलियाच्या काही खेळाडूंनी अलीकडेच एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ग्लेन मॅक्सवेलने एकदिवसीय क्रिकेटला रामराम केला आहे. त्यापूर्वी मार्कस स्टोइनिसने देखील या स्वरूपातून निवृत्ती जाहीर केली होती. ऑस्ट्रेलियन संघ एकदिवसीय क्रिकेटमध्ये स्वतःला पुन्हा स्थापित करण्यासाठी प्रयत्न करत आहे.

## 'आशिया चषक' संघातून गिल-सिराजला डच्चू?



मुंबई : दि.१८ प्रतिनिधी

आशिया चषक २०२५ साठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा १९ ऑगस्ट रोजी होण्याची दाट शक्यता आहे. यंदा ही स्पर्धा टी-२० स्वरूपात खेळवली जाणार असल्याने, संघाची निवड करताना भारतीय निवड समितीसमोर मोठे आव्हान असणार आहे. अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती शुभमन गिल, मोहम्मद सिराज आणि यशस्वी जैस्वाल यांसारख्या खेळाडूंना संघात कसे स्थान द्यावे, यावर विचारमंथन करत आहे. दरम्यान, आशिया चषक संघाबाबत एक महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे, त्यानुसार गिल आणि जैस्वाल या दोघांनाही संघातून वगळले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.'

क्रिकबझ'ने दिलेल्या वृत्तानुसार, निवड समिती आशिया चषकासाठी संघ निवडताना एक मोठा आणि धाडसी निर्णय घेऊ शकते, ज्यामध्ये गिल आणि जैस्वाल या दोघांनाही बाहेर ठेवले जाण्याची शक्यता आहे. मुख्य निवडकर्ते अजित आगरकर त्या खेळाडूंचा गट कायम ठेवण्यास उत्सुक आहेत, ज्यांनी अलीकडच्या काळात टी-२० प्रकारात सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी केली आहे. सलामीवीरांच्या भूमिकेसाठी निवड समिती अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांच्या नावांना प्राधान्य देण्याच्या विचारात आहे.अहवालात पुढे असेही नमूद केले आहे की, संघात तिसऱ्या सलामीवीरासाठी नेहमीच एक जागा राखीव असते आणि त्या जागेसाठी गिल व जैस्वाल यांच्या नावांचा विचार केला जाऊ शकतो. तथापि, या शर्यतीत जैस्वाल सध्या आघाडीवर असल्याचे म्हटले जात आहे. असे असले तरी, या दोघांपैकी कोणालाही संधी न मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. याव्यतिरिक्त, संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून शिवम दुबे आणि वॉशिंग्टन सुंदर यांपैकी एकाला संधी मिळण्याची दाट शक्यता आहे.श्रेयस अय्यरला आशिया चषक संघात स्थान मिळण्याची शक्यता कमी आहे. त्याच्या नेतृत्वाखाली आयपीएल २०२५ मध्ये पंजाब किंग्सने अंतिम फेरी गाठली असली तरी, आशिया चषकासाठी तो संघाचा भाग असणार नाही. दुसरीकडे, यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून जितेश शर्माचा संघात समावेश होण्याची शक्यता आहे. आयपीएल २०२५ मध्ये, जितेश शर्माने रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु () कडून खेळताना आपल्या आक्रमक फटकेबाजीने सर्वांना प्रभावित केले होते.इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मोहम्मद सिराजची निवडही कठीण मानली जात आहे. जसप्रीत बुमराह भारतीय गोलंदाजीच्या आक्रमणाचे नेतृत्व करताना दिसेल, तर त्याच्या साथीला अर्शदीप सिंग आणि प्रसिद्ध कृष्णा हे वेगवान गोलंदाजीच्या ताफ्याचा भाग असू शकतात. त्याचबरोबर, हार्दिक पंड्या अष्टपैलू खेळाडूची महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसेल.

## टाटांच्या आवडत्या कंपनीला फटका; ५.६६ लाख कोटी पाण्यात




टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएस ही टाटा समूहातील सर्वात मूल्यवान कंपनी आहे. टीसीएसच्या बाजारभांडवलात सध्या मोठी घसरण झाली आहे. वर्ष २००८ च्या जागतिक आर्थिक संकटानंतरच्या सर्वात काळ्या टप्प्यात प्रवेश केला आहे. टाटा समूहातील या रत्नाचे बाजारमूल्य जवळपास ५.६६ लाख कोटी रुपयांनी घसरले आहे. टीसीएसचा समभाग त्याच्या ४,५८५.९० सर्वोच्च शिखरावरून ३४ टक्क्यांनी घसरला आहे. याआधी २०१८ मध्ये म्हणजेच १७ वर्षांपूर्वी ५५ टक्के घसरण त्यात झाली होती. त्यामुळे २००८ च्या जागतिक आर्थिक संकटातनंतर २०२५ हे वर्ष टीसीएससाठी सर्वात वाईट वर्ष बनले आहे. विद्यमान वर्ष २०२५ मध्येच या शेअरमध्ये २६ टक्के घट झाली आहे, ज्यामुळे त्याचे बाजारमूल्य १६.५९ लाख कोटी रुपयांच्या शिखरावरून १०.८९ लाख कोटी रुपयांवर आले आहे.

मागणीतील कमकुवत परिस्थिती, जनरेटिव्ह एआयचा प्रतिकूल परिणाम आणि पहिल्या तिमाहीतील संमिश्र कामगिरी या सर्वांमुळे परदेशी गुंतवणूकदारांचे (एफआयआय) पलायन सुरू झाले आहे.

## २५ टक्के अतिरिक्त शुल्क लागू होणार?

### भारत आणि अमेरिकेतील व्यापार चर्चा पुढे ढकलली

नवी दिल्ली : दि.१८ प्रतिनिधी

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार चर्चेचा सहावा टप्पा पुढे ढकलण्यात आला आहे. तो २५ ऑगस्ट रोजी होणार होता. आता तो नंतर नवीन तारखेला होईल. त्यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार कराराला विलंब होण्याची शक्यता आहे ,सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिका २७ ऑगस्टपासून भारतीय उत्पादनांवर अतिरिक्त २५ टक्के कर लादण्याची योजना आखत आहे.

जर हे लागू झाले तर भारतावरील एकूण कर ५० टक्क्यांपर्यंत पोहोचेल. याचा परिणाम भारतातील निर्यातदार कंपन्या आणि व्यवसाय परिस्थितीवर होऊ शकतो.अमेरिका, रशिया आणि युक्रेन यांच्यात अद्याप कोणताही करार झालेला नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात अलिकडेच झालेल्या अलास्का शिखर परिषदेचाही कोणताही निर्णायक निकाल लागला नाही. त्यामुळे अमेरिकन प्रशासनाच्या व्यापार धोरणावर परिणाम होत आहे. या परिस्थितीमुळे अमेरिकेची भारताबाबतची भूमिका अजूनही कडक आहे.तथापि, भारत आणि अमेरिका दोन्ही देशांचे अधिकारी अजूनही २५ टक्के अतिरिक्त कर टाळता येईल का याचा विचार करत आहेत. तसेच, दोन्ही देश एका व्यापक द्विपक्षीय व्यापार करारावर () चर्चा सुरू ठेवत आहेत, जो कर तणाव असूनही प्रस्तावित आहे.अलास्का शिखर परिषदेनंतर, अमेरिकेच्या विधानांमधून असे सूचित झाले की अमेरिका भारतावरील अतिरिक्त कर सध्या तरी पुढे ढकलू शकते. परंतु, अमेरिकेने भारतावर अतिरिक्त कर लादण्याचा निर्णय अद्याप मागे घेतलेला नाही. तसेच त्यांनी याबद्दल काहीही ठोस सांगितलेले नाही.

ही परिस्थिती लक्षात घेऊन, भारतीय व्यापारी समुदाय आणि निर्यात कंपन्या अजूनही सावध आहेत कारण पुढील पावले आणि तारखांचा बाजार आणि व्यवसाय धोरणांवर थेट परिणाम होईल.ऑगस्टच्या सुरुवातीला, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर अतिरिक्त २५ टक्के कर लादला होता, असा दावा करत की ही भारताच्या रशियासोबतच्या सततच्या व्यापार संबंधांची "शिक्षा" आहे. त्यांनी पुढे म्हटले होते की भारत रशियन तेल खरेदी करत आहे, हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या युक्रेनमधील हल्ल्याला हातभार लावत आहे.२७ ऑगस्टपासून लागू होणाऱ्या या नवीन आयात करामुळे काही भारतीय निर्यातीवरील शुल्क ५० टक्क्यांपर्यंत वाढेल ज्यामुळे भारत अमेरिकेच्या सर्वाधिक दंड आकारणाऱ्या व्यापारी भागीदारांमध्ये सामील होईल.डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्क वाढवल्यानंतर, पाच फ ेऱ्यांच्या वाटाघाटी होऊनही भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार चर्चा थांबली. भारतातील विशाल शेती आणि दुग्धजन्य क्षेत्रे उघडण्याबाबत आणि रशियन तेल खरेदी थांबवण्याबाबत मतभेद हाच मुख्य मुद्दा आहे.

## आयबीएमचे मुंबईत नवीन इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर

मुंबई : दि.१८ प्रतिनिधी

आयबीएम (आयबीएमः एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील. या सेंटरचे उद्घाटन करताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एआय, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्सच्या मदतीने आम्ही विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत निर्माण करीत आहोत. हे तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वतता आणि कार्यक्षमता वाढवू शकते, वाढ आणि प्रगतीसाठी नवीन संधी निर्माण करू शकते. आयबीएमसोबतच्या आमच्या सहकार्याद्वारे, आम्ही क्वांटम इनोव्हेशनचा वापर जीवन परिवर्तनासाठी करू, त्याच वेळी त्याचे फायदे लोकशाहीकृत करण्यासाठी आणि राज्यातील प्रत्येक नागरिकासाठी ते उपलब्ध करून देण्यासाठी कुशल प्रतिभा समूह तयार करू. हॅन्स डेकर्स, जनरल मॅनेजर, आयबीएम एशिया पॅसिफिक म्हणाले, आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर भारतातील एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग क्षेत्रातील प्रगतीस मदत करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकट करते. महाराष्ट्र सरकारला त्यांचा स्वतःचा सक्षम आणि प्रगत क्वांटम इकोसिस्टम तयार करण्यास मदत करण्याची आमची इच्छा हे आमच्या वचनबद्धतेचे उदाहरण आहे. संदीप पटेल, मॅनेजिंग डायरेक्टर, आयबीएम इंडिया आणि साऊथ एशिया म्हणाले, देशाच्या राष्ट्रीय क्वांटम मिशन आणि 'विकसित भारत'च्या उद्दिष्टांनुसार, राज्यात क्वांटम कम्प्युटिंग कौशल्ये वाढवण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा आयबीएमला आनंद आहे.

## गुंतवणूक | गुणवत्ता, वाढ आणि मूल्यमापनावर भर

## व्यवसायाच्या शाश्वततेवर भर देणारा फ्लेक्सी-कॅप पोर्टफोलिओ

मुंबई : दि.१८ प्रतिनिधी



यशस्वी गुंतवणुकीसाठी कोणत्याही गुंतवणूकदारासाठी वास्तविक आर्थिक उद्दिष्ट ठरवणे हा पहिला टप्पा आहे. सतत परतावा देऊ शकणाऱ्या गुंतवणूक पर्यायाचा विचार करणे महत्त्वाचे असले तरी, त्यासोबत जोखीम (रिस्क) समजून घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे, जेणेकरून दीर्घकालीन परिणामासाठी उत्तम निष्पन्न साधता येईल. आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी, अल्पकालीन ते दीर्घकालीन, विविध म्युच्युअल फंड पर्यायांचा विचार करता येतो, ज्यामध्ये गुंतवणूकदारांना संपत्ती निर्मितीसाठी वेगवेगळ्या मालमत्ता वर्गातील उत्पादनांमधून गुंतवणूक करण्याची मुभा असते. फ्लेक्सी-कॅप फंड हे ओपन एन्डेड इक्विटी फंड आहेत, ज्यामध्ये किमान ६५ टक्के एकूण मालमत्तेचा भाग विविध बाजार भांडवलांतील कंपन्यांच्या इक्विटीमध्ये गुंतवला जातो, जसे की लार्ज-कॅप, मिड-कॅप किंवा स्मॉल-कॅप फंड. युटीआय फ्लेक्सी कॅप फंड ही या श्रेणीतील एक जुनी फंड योजना आहे (लॉंच १९९२ मध्ये) आणि या योजनेचा दीर्घकालीन, सातत्यपूर्ण कामगिरीचा चांगला ट्रॅक रेकॉर्ड आहे. या फंडाचे कोर्पस ३१ जुलै, २०२५ रोजी २५,६०० कोटींपेक्षा जास्त आहे. युटीआय म्युच्युअल फंडकडून दिला जाणारा हा पर्याय दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे, जे अशा गुणवत्तापूर्ण व्यवसायांमध्ये गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या फंडमध्ये गुंतवणूक करू इच्छितात, जे गुंतवणूकदारांसाठी आर्थिक मूल्य निर्माण करण्याची क्षमता ठेवतात. युटीआय फ्लेक्सी कॅप फंडची गुंतवणूक तत्त्वज्ञान 'गुणवत्ता', 'वाढ' आणि 'मूल्यमापन' या तीन स्तंभांवर आधारित आहे. या पोर्टफोलिओ धोरणाचा उद्देश अशा व्यवसायांवर लक्ष केंद्रित करणे आहे, जे दीर्घकाळासाठी मजबूत वाढ दाखविण्याची क्षमता ठेवतात आणि ज्यांचे व्यवस्थापन अनुभवी हातात आहे. हा फंड बाजारातील विविध भांडवल आकाराच्या कंपन्यांमध्ये 'वाढ' शैलीच्या गुंतवणुकीनुसार गुंतवणूक करतो. या योजनेतील टॉप टेन होल्डिंगमध्ये आयसीआयसीआय बँक लिमिटेड, एचडीएफसी बँक लिमिटेड, बजाज फायनान्स लिमिटेड, एटर्नल लिमिटेड, इन्फो-एज (इंडिया) लिमिटेड, अव्हेन्यू सुपरमार्ट्स लिमिटेड, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड, एलटीआय माइंड्ट्री लिमिटेड, डिक्सन टेक्नॉलॉजीज (इंडिया) लिमिटेड आणि कोफोर्ज लिमिटेड यांचा समावेश आहे, जे ३१ जुलै, २०२५ रोजी पोर्टफोलिओच्या एकूण कोर्पसच्या सुमारे ४५ टक्के मूल्याचे प्रतिनिधित्व करतात.

# 'दिवा' सतत तेवत राहो..!



प्रत्येक गावातल्या मंदिरात एक दिवा असतो. तो कितीही वारा सुटला, पाऊस पडला, तरी मंद उजेड देत राहतो. आणि त्या उजेडानेच लोकांना दिशा मिळते. वाशिमच्या मातीतला तसाच एक दिवा म्हणजे अनंतराव देशमुख.

पदं, मान-सन्मान, सत्ता हे सगळं अत्यंत कमी वयात त्यांच्या पायाशी आलं नि निघूनही गेलं; पण कार्यकर्त्यांच्या हृदयातला दिवा कधीच विझला नाही. तीस वर्षांपासून कोणतंही पद नाही, तरी त्यांच्या दारात कार्यकर्त्यांची गर्दी तशीच आहे. का नसेल ही गर्दी? कारण त्यांनी कार्यकर्त्यांना आपले मानले. फक्त हात धरला नाही, तर त्या हातात दगड देण्याऐवजी आपल्या स्वप्नांना आकार देण्यासाठी त्या हातांना अधिक मजबूत केले.

तीन दशकांपूर्वीचे करडा (ता. रिसोड) गाव अजूनही आठवते. गावाकडे जाणारा दगड धोंड्याचा कच्चा रस्ता, उन्हाळ्यात धुळीचे लोळ, तर पावसाळ्यात चिखलाचे डोह. बेरोजगार तरुण गाव सोडून बाहेर चालले होते. डोळ्यांत हताशा होती. त्यावेळी तत्कालीन सरपंच अशोकराव देशमुख यांनी मागणी केली 'गाव वाचवा'. आणि अनंतरावांनी पुढाकार घेतला. पाझर तलाव मंजूर झाला. पावसाचं पाणी डोळ्यांत साठवून बसलेली शेती पुन्हा हिरवीगार झाली. शेती बहरली. आज शेतकरी सधन झाले. बैलजोडी हाकत, ट्रॅक्टरवर गाणं ऐकत शेतात मातीचा गंध अनुभवत आहेत. गावातला आत्मविश्वास जागा झाला. ते इथवरच थांबले नाहीत; कृषी विज्ञान केंद्र गावात आलं. शेतकरी तिथे गेले, ऐकले, शिकले आणि उभे राहिले. अवघ्या जिल्ह्याला फायदा झाला. हा एक नेता नाही, तर जनतेच्या आयुष्यातला सोबती आहे. आज राजकारणात विखारी बोलणं सहज आहे. जाती-धर्मांच्या नावाने समाजात भिंती उभ्या करणं सोपं आहे; पण भाऊंनी कधी ते केलं नाही. त्यांनी सगळ्यांना सोबत ठेवलं. त्यांचं वागणंच हे जणू सांगतं, नेतृत्व हे लोकांना विभागण्यात नाही, तर एकत्र आणण्यात असतं. म्हणूनच ते फक्त नेते नाहीत, तर लोकांच्या आयुष्याचा आधार आहेत. पदं निघून गेली, सत्ता सरली; पण कार्यकर्त्यांचं प्रेम, पाठबळ तसंच आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त एकच प्रार्थना, हा दिवा असाच पेटलेला राहो; कारण याच दिव्याच्या उजेडात आम्ही शिकलो की, 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे'. हा दिवा म्हणजेच अनंतराव देशमुख.

ॲड. गजानन देशमुख

(लेखक करडा गावचे उपसरपंच आहेत.)















Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 10th NEET /JEE /MHT- CET STATE BOARD
8th, 9th, 10th STATE BOARD / CBSE FOUNDATION
•SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर,कौलखेड अकोला.
•चैतन्य कॉलनी,एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड,अकोला

अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,



# शेकडो कावड, पालख्यांद्वारे श्री राजराजेश्वराला जलाभिषेक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १९ : श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी ८१ वर्षांच्या परंपरेनुसार अकोला शहरात कावड-पालखी मोठ्या उत्सवाने साजरा करण्यात आला. 'हर्ऽऽ बोला महादेव'च्या गजरात आराध्य दैवत श्री राजराजेश्वराला पालखी व कावडधारी मंडळांसह शिवभक्तांनी जलाभिषेक केला. पालखी-कावड उत्सव पाहण्यासाठी शिवभक्तांची मोठी गर्दी उसळली होती. कावड यात्रा मार्गाला यात्रेचे स्वरूप आले होते. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या मिरवणुकीत १५० पालख्या व ६० कावड मंडळांचा सहभाग होता.**

कावड-पालखी मिरवणुकीत शहरातील शेकडो शिवभक्त मंडळांनी सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात 'हर्ऽऽ बोला महादेव' चा जयघोष निनादला. कावड यात्रेतील शिवभक्तांचे व पालखीचे शहरातील ४३ सामाजिक, धार्मिक व राजकीय संघटनांच्यावतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. या मिरवणुकीत शिवभक्त मंडळाच्यावतीने धार्मिक व सामाजिक संदेश देणारे देखावे साकारण्यात आले होते. कावड महोत्सव पाहण्यासाठी हजारो शिवभक्तांनी गर्दी केली.

## हर्ऽऽ बोला महादेव



## पालकमंत्री आकाश फुंडकर यांचे श्री राजराजेश्वर मंदिरात दर्शन

अकोला : पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी श्रावण सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिरात दर्शन घेऊन जलाभिषेक केला. त्यांनी कावड–पालखी उत्सवात सहभागी होत मानाच्या पालखीचे पूजन केले. यावेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व मान्यवर उपस्थित होते. ८० वर्षांपासून सुरू असलेला हा उत्सव अकोल्याच्या सांस्कृतिक ऐक्याचे प्रतीक मानला जातो.

## हरिहरपेठची कावड लक्ष्यवेधी

पालखी–कावड महोत्सवात सर्वाधिक भरण्यांची कावड ही हरिहरपेठ शिवभक्त मंडळाची होती. यामध्ये लक्ष्यवेधी भरण्यांची ही कावड ४०१ फूट लांब होती. सदर कावडमध्ये ४ हजाराच्या वर शिवभक्त सहभागी झाले होते. दुपारच्या सुमारास या पालखीचे आगमन श्रीराजराजेश्वर मंदिरात झाले व अभिषेक श्री राजराजेश्वराला केला.



## तिक्ष्णगत संस्थेच्यावतीने शिवभक्तांचे स्वागत

**यंदाच्या कावड महोत्सवात तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी व दैनिक अजिंक्य भारत समूह यांच्यावतीने गांधी चौक येथे मिरवणुकीत सहभागी झालेल्या शेकडो पालखी व कावड मंडळातील शिवभक्तांचे स्वागत करण्यात आले.**



## महिलांची पालखी ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

अकोला : श्रावण सोमवारी पार पडलेल्या कावड–पालखी उत्सवात महिलांच्या विशेष पालखीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. उत्साहात सहभागी झालेल्या महिलांनी भक्तिमय वातावरणात पालखी उचलून मिरवणूक काढली. पारंपरिक वेशभूषा आणि सामूहिक सहभागामुळे महिलांची ही पालखी उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरली.




## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचे प्रत्यक्ष निरीक्षण

अकोला : कावड–पालखी सोहळा शांततेत पार पडावा, यासाठी प्रशासनाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला. अकोट स्टॅन्ड चौकातील विशेष टॉवरवरून जिल्हाधिकारी अजित कुंभार व पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले.















## छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांची झाँकी



जय बाभळेश्वर कावड मंडळाने मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्याची झाँकी साकारली. मंडळाच्या २६ व्या वर्षाच्या निमित्ताने, छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांची प्रतिकृती साकारण्यात आली, ज्यांचा महाराष्ट्र सरकारच्या प्रयत्नांनी नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. जय बाभळेश्वर कावड मंडळाची १०१ भरण्यांची कावड व २१०० सदस्यांनी श्री राजराजेश्वराला जलाभिषेक केला.

## शिवजींच्या पेहरावातील चिमुकला ठरला आकर्षण

कावड–पालखी सोहळ्यात चिमुकल्याने शिवजींचा पेहराव करून उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. लहानग्यांच्या या निरागस रूपाने भक्तांचे लक्ष वेधले. चिमुकल्यांसह मोठ्यांनीही शिवजींचा पेहराव करून सोहळ्यात सहभाग घेतला. भाविकांनी या आकर्षक रुपांसोबत उत्साहात सेल्फी काढत अविस्मरणीय क्षण कैद केला.

उत्तर प्रदेशातील कानपूर येथून आलेल्या प्रसिद्ध बंटी बावरा यांच्या १९ जणांच्या टीमने प्रथमच विदर्भात अकोल्यात हजेरी लावली. शिव-पार्वतीचा पेहराव करून त्यांनी शिवतांडव, भस्म आरती, भोले की बारात असे थरारक व भक्तिमय सादरीकरण केले.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला / वाशिम
२
अकोला, मंगळवार, दि.१९ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

## महत्त्वाचे

### प्रा.दीपाली चिरंगे यांना आचार्य पदवी प्राप्त



**अकोला :** स्थानिक श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रा. कु. दिपाली बापूराव चिरंगे यांनी पश्चिम विदर्भातील आदिवासी महिलांच्या आर्थिक विकासात बचत गटाचे योगदान - एक विश्लेषणात्मक अध्ययन' या विषयावर संशोधनात्मक प्रबंध श्रीमती आर डी जी महिला महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ.ए.बी. पांडे यांच्या मार्गदर्शनात सादर केला होता.त्यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने वाणिज्य शाखेची सर्वोच्च पदवी पीएच. डी. बहाल केली. प्रा.दिपाली चिरंगे ह्या मूळच्या चिरंगवाडी ता. उमरखेड येथील रहिवासी असून त्या श्रीमती आर डी जी महाविद्यालयातुन बी.कॉम मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून मेरिट आल्या होत्या तसेच प्राध्यापक पदाची राज्य पात्रता परीक्षा (सेट) व राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) ह्या दोन्ही परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केल्या आहेत. त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये शोधनिबंध प्रसिद्ध आहेत.

### किड्स पॅराडाईजमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात



**पातूर :** येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल येथे जन्माष्टमी निमित्त दहीहंडी उत्साहात पार पडली.गोविंदा गोविंदाचा गजर करत श्रीकृष्ण जन्माष्टमी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्साहात साजरी केली. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाची वेशभूषा तर विद्यार्थिनींनी राधाच्या वेशभूषेत येऊन हा उत्सव साजरा केला. याप्रसंगी दहीहंडीचे पूजन शाळेच्या कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांनी केले. तर हा उपक्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे यांच्या मार्गदर्शनात पार पडला. यावेळी मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, नरेंद्र बोरकर, नितु ढोणे, संकल्प व्यवहारे, हरिष सौंदळे, बजरंग भुजबटराव, अविनाश पाटील, अक्षय तायडे, प्रतीक्षा भारसाकळे, प्रियंका चव्हाण, पूजा खंडारे, रेश्मा शेंडे, इकरा आदिबा खान, साक्षी वानखडे, शुभांगी बोरकर, दिव्या गव्हाळे, नयना पटोणे, प्रिया चक्रे, गौरी अमानकर, रुपाली पोहरे, कल्पना वानेरे, शुभम पोहरे, मधुकर बोदडे आदींनी परिश्रम घेतले.

# सात वर्षीय देवांशीला मिळाला पुनर्जन्म

## यशस्वी शस्त्रक्रिया : मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे वाचले प्राण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी






**वाशिम, दि. १८ :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या मदतीतून वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यात राहणाऱ्या सात वर्षीय देवांशी रवींद्र गावंडे हिच्यावर नुकतीच यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली.

ही महागडी शस्त्रक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने पार पडल्याचे समाधान मुलीच्या पालकांनी व्यक्त केले. रवींद्र गावंडे (रा. वरूड बु.) यांच्या मुलीला जानेवारी २०२५ मध्ये तीव्र पोटदुखीचा त्रास होत होता. मुलीची अकोला आणि त्यानंतर नागपूर येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचे यकृत गंभीर स्वरूपात बाधित झाल्याचे निदान केले. तसेच तिचे यकृत तातडीने प्रत्यारोपण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. शस्त्रक्रियेसाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च सांगण्यात आला.

भाजीपाला विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या देवांशीच्या वडिलांसमोर एवढी मोठी रक्कम गोळा करण्याचा पेच निर्माण झाला होता. दरम्यान, मुलीच्या वडिलांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती मिळताच या कक्षाकडे त्यांनी मदत मागितली. याशिवाय सोशल मीडियावर मदतीकरिता आवाहन केले.

कक्षाच्या पुढाकाराने देवांशीवर पुढील उपचार मुंबईतील वाडिया हॉस्पिटलमध्ये सुरू झाले. या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, टाटा ट्रस्ट, सामाजिक संस्था तसेच गावकऱ्यांच्या वर्गणीतून आर्थिक मदत उपलब्ध झाली.

देवांशीला तिची आई मीनाक्षी गावंडे यांनी यकृताचा भाग दिला. त्यातून मुलीवर ७ जुलै २०२५ रोजी यकृत प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. आता देवांशीची प्रकृती स्थिर असून, तिच्या प्रकृतीत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. नुकताच ३ ऑगस्ट रोजी पालकांनी तिचा वाढदिवस साजरा केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष आणि टाटा ट्रस्टच्या मदतीमुळेच आपल्या मुलीला पुनर्जीवन मिळाल्याचे समाधान देवांशीच्या पालकांनी व्यक्त केले.

> मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून प्रत्येक गरजू, गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी कक्षाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. देवांशी त्याचेच एक उदाहरण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कक्ष काम करीत असून, राज्यातील गरीब व गरजू रुग्णांना मदत करण्यासाठी कक्ष तत्पर आहे. या कक्षाचा फायदा सामान्य रुग्णांना मोठ्या प्रमाणावर होत आहे.
>
> **रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख**
> मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुंबई.

## दहीगाव गावंडे परिसरात ढगफुटीसारखा पाऊस

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**दहीगाव गावंडे, दि. १८ :** अचानक मुसळधार पावसाने ढगफुटीची स्थिती शनिवारी दुपारी केली. काही मिनिटांच्या जोरदार पावसामुळे शेतशिवारात प्रचंड प्रमाणात पाणी साचले. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतीला नदीचे स्वरूप आले. दहीगाव गावंडे, पळसो बढे शेतशिवारात अक्षरशः पाणीच पाणी झाले आहे. या अनपेक्षित पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या संकटामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

दुपारपासून सुरू झालेले पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढत चाललेली होती, अशा परिस्थितीत नदी परिसरातून येणारी नदी तसेच नाले यांना पूर आल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतात पाणी घुसल्याने शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झालेले आहे. पिकांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन शासनाने तात्काळ पंचनामा करून मदत द्यावी, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. या मुसळधार पावसाचा फटका दहिगाव गावंडे पळसो बढे कौलखेड जा रामगाव बाहीरखेड धोतरडी सांगळुद अनेक गावांना बसला असून, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

## एल. एन. पी. कॉन्व्हेंट शिवर येथे स्वातंत्र्य दिन साजरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १८ :** शिवर येथील एल.एन. पी कॉन्व्हेंट मध्ये ''स्वातंत्र्य दिन ''मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या समारोहाची सुरुवात ''प्रभातफेरीने'' करण्यात आली.महापुरुषांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी या प्रभातफेरीमध्ये नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ध्वजारोहण समारंभाच्या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्व. लक्ष्मीबाई ना पिंजरकर बहू उद्देशीय शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई पिंजरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्रीकांत भा. पिंजरकर , संस्थेच्या सदस्या सौं शुभांगी पिंजरकर, संस्थेचे सदस्य प्रशांत पिंजरकर तसेंच शाळेतील पालक रत्ना इंगोले, शरद देशमुख, विकास रंगबाळे हे होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या स्मृतिस अभिवादन करून स्मृतिस उजाळा देतांना मनोगत व्यक्त केले. तर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या समूह



देशभक्ती पर गीतांनी परिसर मंत्रमुक्त झाला.

भारतीय स्वातंत्र्याचा समग्र इतिहास म्हणजे हुतात्म्यानी आपल्यासाठी केलेल्या बलिदानची गाथा आहे. याची उजळणी आपल्यासमोर तयार होत असलेल्या उद्याच्या सक्षम नागरिकांसमोर वारंवार करून आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचे महत्व सतत विषद केले पाहिजे. असे मत या वेळी बोलताना संस्थेचे सचिव श्रीकांत पिंजरकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका कु. प्रणाली हुंडीवाले व शुभांगी घुगरे यांनी केले. तर प्रास्ताविक मुख्याध्यापक नरेंद्र पाटोळे यांनी केले. आणि आभारप्रदर्शन कु. साक्षी उपासे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक निखिलेश ढोरे, सरिता बढे,अपेक्षा बोलवणकर, नीलिमा देशमुख, सोनिया विश्वकर्मा, अंकिता यमगवळी,विशाल, काजल भागवत, माधुरी चंद्रे, सपना राऊत यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला माजी विद्यार्थी, शाळेचे पालक, आणि गावातील अनेक नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## अडगावात ठिकठिकाणी स्वातंत्र्यदिन उत्साहात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अडगाव बु. , दि. १८ :** तेल्हारा तालुक्यातील अडगाव बु व शिवाजी नगर येथे गावातील विविध संस्थांमध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी उर्दू व मराठी शाळेतील विद्यार्थी प्रभातफेरी ने गांधीचौकात जन्मल्यानंतर सरपंच शोभा रमेश खंडारे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर ग्राम पंचायत कार्यालयावर गटनेते संजय राजनकर यांचे हस्ते ध्वजारोहण झाले त्यानंतर प्रभातफेरीने विद्यार्थी शिवाजी नगरातील महात्मा फुले चौकात पोहचल्यावर तेथे शिवाजीनगरच्या सरपंच गायत्री नितीन चीम यांचे हस्ते झेंडावंदन करण्यात आले तर शिवाजीनगर ग्राम पंचायत कार्यालयावर उपसरपंच गुलाम आरीफ यांचे हस्ते झेंडावंदन झाले तर अडगाव पोलिस चौकीत हिवरखेड ठाणेदार गजानन राठोड यांचे हस्ते,जि प मराठी कन्या शाळेत मुख्याध्यापक श्रीराम नाठे यांचे हस्ते,जि प मराठी मुलांच्या शाळेत मुख्याध्यापक बालीनी कोवळे यांचे हस्ते,जि प उर्दू मुलांच्या शाळेत मुख्याध्यापक अतिक अहेमद यांचे हस्ते,जि प उर्दू कन्या शाळेत मुख्याध्यापक शेख मुबीन शेख समी यांचे हस्ते,जि प कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य चारुदत्त मेहरे यांचे हस्ते, मौलाना अबुल कलाम आझाद कनिष्ठ महाविद्यालयात संस्थाअध्यक्ष मुन्नाभाई मिरसाहेब यांचे हस्ते, सेंट्रल कृषक सोसायटी मध्ये अध्यक्ष मनोहरलाल फाफट यांचे हस्ते, आदिवासी आश्रमशाळा परीसरात मुख्याध्यापक संजय निमकर्डे यांचे हस्ते,मोहम्मदिया उर्दू वरिष्ठ प्राथमिक शाळेत संस्थाअध्यक्ष राजिक कुरेशी यांचे हस्ते,सेवादलाचे चैतन्य भवनावर प्रगतीशील शेतकरी अनिल राखोंडे यांचे हस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी डॉ वैष्णवी खेर्डे यांचे हस्ते, पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन विकास अधिकारी डॉ अबोली कथे यांचे हस्ते, मधुबन कॉन्व्हेन्ट मध्ये मुख्याध्यापक डॉ श्याम कोल्हे यांचे हस्ते,३३ केव्ही विद्युत उपकेंद्रात कनिष्ठ अभियंता प्रशांत पाटील यांचे हस्ते तर स्व बाबूराव बाजारे कनिष्ठ महाविद्यालय शिवाजीनगर मध्ये प्राचार्य माया तेजराव मुकुंद यांचे हस्ते झेंडावंदन करण्यात आले ठिकठिकाणी झालेल्या या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात माजी जि प सदस्य, पं स सदस्य, माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य , महसूल मंडळ अधिकारी, तलाठी, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष, पोलिस पाटील व गावातील प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले होते .

## श्री.नागास्वामी महाराज यात्रा महोत्सव

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट , दि. १८ :** तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या ग्राम बोर्डी येथे पुरातन कालीन ऐतिहासिक नागापंथातील संत नागास्वामी महाराजांचे यांचे मंदिर आहे.येथे अंदाजे २२६ वर्षापूर्वी नागास्वामी महाराज श्री.रामगीरी गोसावी म्हणून प्रगट झाले असल्याचे भाविकांकडून सांगण्यात येते.महाराज स्वतःवरांच्या मोहबंधनातून मुक्त असल्यामुळे नागास्वामी म्हणून पंचक्रोशित प्रसिद्ध झाले.श्रावणाच्या तिसरा सोमवार झाल्यानंतर लगेच दुसऱ्या श्री.नागास्वामी महाराज यांची यात्रा महोत्सव असतो. त्यानुसार हा यात्रा महोत्सव संपन्न झाला. ग्रामस्थ सात दिवस अखंड टाळ-मृदंग वाजवत हरिनाम सप्ताह करतात व आठव्या दिवशी महाराजांच्या पादुका रथावर ठेवून भव्य रथ यात्रा मोठ्या उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रम करतात. महाराजांनी संजीवन समाधी घेतली असून तेथेच संत नागास्वामी



महाराजांचे भव्य पुरातनकालीन मंदिर आहे.मंदिराचे प्रवेशद्वारावर पुरातनकालीन कोरीव नक्षीकाम केले आहे. मंदिराच्या गाभाऱ्याचे नूतनीकरण झाले असून,कलशस्थापना सुद्धा झाली आहे.

कावडधारी नागास्वामी महाराज मंदिरातील शिवलिंगावर जलभिषेक करतात.यात्रेनिमित्त मंदिरावर रंगरंगोटी, रोशनाई करून मंदिर सजवले जाते.यात्रेनिमित रथ मिरवणुकीची परंपरा आहे.या रथामध्ये महाराजांचे पादुका ठेवून दोराच्या साहाय्याने रथ ओढून गावातून प्रदक्षिणा पूर्ण करतात. श्रावण महिन्याच्या चारही सोमवारी नागास्वामी महाराज मंदिरात शिवलिंगाला जलभिषेक केला जातो.

## गोगाजी महाराज यांची निघाली निशान यात्रा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १८ :** श्री रतनसिंह चावरीया महाराज संघच्यावतीने गोगाजी महाराज यांच्या विशेष आकर्षित निशान यात्रा महाराष्ट्राचे पंढरीनाथ विठ्ठल यांच्या वारकरी संप्रदायावर आधारीत विजयनगर येथील निशान यात्रा शनिवारी शहरातून काढण्यात आली. या यात्रेचे पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. मानिक टाकीजजवळ स्वागताध्यक्ष गौतम गवई राष्ट्रवादी पक्ष नेता यांच्यासह अनुप खरारे, सचिन चावरे, करण खरारे, गोगाभक्त करण सारवान, दीपक थोनवाल आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रम सचिन चावरे संस्थापक अध्यक्ष रतनसिंह चावरीया महाराज यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. कालु भगत निनोरे यांच्या आखाड्याचेही यावेळी स्वागत करण्यात आले.

## जिल्ह्यात २५ जैविक उत्पादक कंपन्या कार्यान्वित

### सॉर्टिंग पॅकेजिंग युनिटचे उद्घाटन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशिम, दि. १८ :** मानव विकास मिशन तालुका स्पेसिफिक कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), वाशिम यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या कलर सॉर्ट्रेक्स, प्रिंटिंग व पॅकेजिंग युनिटचे बाभूळगाव येथे उद्घाटन तसेच मौजे साखरा (ता. वाशिम) येथील डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत पंढरीनाथ जैविक शेतकरी उत्पादक कंपनी येथे उभारलेल्या माती लॅब सेंटर नैसर्गिक निविष्ठा निर्मिती केंद्र) व सामूहिक सुविधा केंद्राचे लोकार्पण राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांनी केले.



> आज वाशिम जिल्ह्याच्या दौ-यावर असताना एका आगळ्या वेगळ्या व शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या जिल्हा परिषद शाळेला भेट देण्याचा योग आला. मनापासून सांगतो, ही जिल्हा परिषदेची शाळा पाहून खरंच भारावून गेलो. लोकसहभाग, प्रशासनाची साथ आणि शिक्षकांची मेहनत असेल तर जिल्हा परिषदेची शाळा सुद्धा इंटरनॅशनल होऊ शकते, हे आज अनुभवता आले. जिल्हा परिषदेच्या या शाळेत प्रवेश घेण्यासाठी दरवर्षी वेटिंग लिस्ट लागते, हीच या शाळेच्या यशाची पोच पावती होय.

उद्घाटनानंतर पारंपरिक शेती इनपुट निर्मिती, सेंद्रिय खत तयार करण्याच्या पद्धती, नैसर्गिक कीडनियंत्रण उपाय आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शाश्वत शेतीची अंमलबजावणी याबाबतची सविस्तर माहिती पालकमंत्र्यांनी जाणून घेतली.पंढरीनाथ जैविक शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व संचालक मंडळ व सदस्य यांच्या बीआरसी केंद्रात सध्या ४५ पेक्षा अधिक नैसर्गिक निविष्ठा प्रकार तयार केले जात आहेत. यात जीवामृत, गोकृपा अमृत, ह्युमिक ॲसिड, अग्निअस्त्र, ब्रह्मास्त्र, अंडेजनित अमिनो ॲसिड, विविध वनस्पती अर्क व पावडर, ट्रायकोडर्मा, मायकोरायझा, सीपीपी, नाडेप, वर्मीकंपोस्ट, बायोडायनॅमिक कंपोस्ट आदींचा समावेश आहे.संपूर्ण प्रक्रिया नैसर्गिक शेती पद्धतीवर आधारित असून, एकही निविष्ठा किंवा मजूर बाहेरून घेतले जात नाहीत. खरीप हंगामासाठी बीडी कंपोस्ट बेडही तयार करण्यात आले आहेत.

प्रथम टप्प्यातील या कंपन्यांच्या यशस्वी मॉडेलच्या प्रेरणेने वाशिम जिल्ह्यात एकूण २५ जैविक शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात आल्या असल्याची माहिती श्रीमती महाबळे यांनी दिली.यानंतर भरणे यांनी स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, साखरा येथेही सदिच्छा भेट देत संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांची व पायाभूत सुविधांची पाहणी केली. गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, खेळ व सांस्कृतिक उपक्रम यांची माहिती घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला. पालकमंत्र्यांनी शाळेच्या प्रगत सुविधांचे कौतुक करत, ग्रामीण भागात आधुनिक व सर्वांगीण शिक्षण पोहोचविण्यासाठी शिक्षक व व्यवस्थापनाच्या प्रयत्नांचे अभिनंदन केले.

**दखल** तीर्थस्थळ विकास आराखड्याचा पालकमंत्र्यांकडून आढावा

# विकास कामे गतिमान करण्याच्या सूचना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशिम, दि. १८ :** जिल्ह्यातील बंजारा समाजाचे 'काशी' म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध पोहरादेवी तीर्थक्षेत्र पर्यटनदृष्ट्या आकर्षक आणि नागरिकांसाठी सुविधायुक्त करण्यासाठी विकास आराखड्याचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी तीर्थक्षेत्राचा धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपत विकास कामे गतिमान करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीला आमदार बाबूसिंग महाराज राठोड, सई डहाके, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, उप वनसंरक्षक



अभिजित वायकोस, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, कार्यकारी अभियंता शुभम जोशी, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री ना. भरणे म्हणाले की, श्री संत सेवालाल महाराज तीर्थक्षेत्र विकास योजना तसेच उमरी आणि पोहरादेवी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील प्रस्तावित कामे मार्गी लावावीत. निधीअभावी प्रलंबित असलेल्या कामांसाठी शासनस्तरावर बैठक घेऊन निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. ''बंजारा विरासत ही अत्यंत सुंदर व भव्य असून, तिची जपणूक करणे आपली जबाबदारी आहे,'' असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, पार्किंग व्यवस्था, भक्तनिवास, प्रकाशयोजना, हरितकरण व सुरक्षा आदी सुविधांचा आढावा घेण्यात आला. विकास आराखड्यातील कामांची गती वाढवून विभागांमध्ये समन्वय साधावा, निधीचा पारदर्शक व गुणवत्तापूर्ण वापर करावा आणि पोहरा हे राज्यातील आदर्श तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करावे, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या.

बैठकीपूर्वी पालकमंत्री ना. भरणे यांनी जगदंबा माता दर्शन घेतले. त्यानंतर, श्री संत सेवालाल महाराज समाधी व मंदिर पाहणी, रामराव महाराज आश्रम व बाबनलाल महाराज यांचे दर्शन घेतले. आमदार बाबूसिंग महाराज राठोड यांनी पालकमंत्री यांचा सत्कार केला.

## तीज उत्सव साजरा! पारंपरिक नृत्य करीत समाज बांधवांनी व्यक्त केला आनंद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. १८ :** तीज म्हणजे बंजारा समाजाच्या लोक संस्कृतीचे सर्व पदर आणि पैलू उलगडणारा उत्सव. या उत्सवात दहा दिवसांआधी अविवाहित मुली एका टोपलीत गौरी स्वरूप धान गहू पेरतात. रोज त्याला पाणी घालून बोली भाषेत आराध्य देवताची गाणे म्हटली जातात. विसर्जनाच्या दिवशी डोक्यावर गौरी स्वरूप धान तीज घेऊन वाजत गाजत तांड्याला प्रदक्षिणा केली जाते, अकोला जुने शहर येथेही तीज उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करून महिलांनी पारंपरिक नृत्य सादर करीत आपला आनंद व्यक्त केला,



बंजारा परंपरेतील सर्वात महत्त्वाचा असलेला तीज उत्सव अकोला जुने शहर नगरी येथे उत्साहात साजरा करण्यात आला.भारतीय संस्कृती प्रत्येक जाती-धर्मातील विविध उत्सव वेगळ्या ढंगाने व परंपरेने साजरे केले जातात, त्यामुळेच आपल्या देशातील विविधतेत एकता दिसून येते, इसवी ५०० ते ८०० वर्षापासून बंजारा समाजात चालत आलेला. सर्वात महत्त्वाचा तीज उत्सव कधीकाळी डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजात तीज म्हणजे आनंदाची पर्वणीच असते, श्रावण महिन्यात ठिकठिकाणी बंजारा तांड्यावर तीज उत्सव पाहायला मिळतो. सध्या तीज उत्सवाच्या बंजारा लोकगीतांनी तिथल्या लोकांवर चांगलंच गारुड घालत आहे, पारंपरिक वेशभूषेत फेर धरून नाचणाऱ्या महिला मुली सहभागी झाल्या. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजाने आपली वेगळी परंपरा, लोकसंस्कृती आणि वेगळेपण जपल्याचे यानिमित्ताने दिसून आले. तीज उत्सवामध्ये सहभागी घेऊन आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र जाधव, तसेच आभार दिलीप पवार यांनी मानले.

महत्त्वाचे

## उत्सव आझादी का नृत्य स्पर्धेत विद्यार्थी चमकले!



**वाशीम :** भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त लायन्स क्लब वाशिम च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नृत्य स्पर्धेत स्थानिक श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतनने आ गटातुन जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. स्थानिक वाटाणे लॉन येथे लायन्स क्लबच्या वतीने,१५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त 'उत्सव आझादी का' या नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांनी नृत्य सादरीकरण केले. या स्पर्धेत स्थानिक श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतनने 'ऑपरेशन सिंदूर' या विषयावर नृत्य सादर केले.

## जयपूर येथे स्वातंत्र्य दिन साजरा

**वाशिम :** जयपूर येथील ओंकारेश्वर विद्यालय जयपूर ता जी वाशिम या विद्यालयामध्ये १५ ऑगष्ट रोज शुक्रवार ला ७९ व्या स्वांतत्र्य दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक संजय दाजिबाराव शिंदे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून गावतील प्रतिष्ठीत डॉ सरकटे वच्छलाबाई प्रेमराव बर्गी (सरपंच) द्वारकाबाई इंगोले (उपसरपंच) तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य भारत इंगोले उमीलाबाई इंगोले, रत्नदिप इंगोले अनिता राठोड, आदिंची उपस्थित होते.

## ज्ञानज्योती योजनेला २७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**वाशिम :** राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी प्रवेश अर्ज शासनाच्या संकेतस्थाळावर ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत वेळापत्रक निश्चित झालेले आहेत. बी.ए/बी.कॉम/बी.एस.सी अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए/एम.एस.सी. असे पदवी नंतरचे पदव्युतर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) प्रवेशासाठी अर्ज करण्यास दि. २७ ऑगस्ट, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दि. २८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत अर्ज छाननी करण्यात येईल.

# ग्रामीण रुग्णालयात शिरले पावसाचे पाणी

## रुग्णांची गैरसोय: नवीन इमारतीत स्थानांतरण आवश्यक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**अनसिंग, दि. १८ :** गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनसिंग येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीत पावसाचे पाणी शिरले आहे. वॉर्ड, तपासणी कक्ष तसेच प्रसूती विभागातील मजल्यावर पाणी साचल्याने रुग्ण, नातेवाईक आणि आरोग्य कर्मचारी यांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

रुग्णालयातील अनेक खाटांच्या खाली व आजूबाजूला पाणी साचले असून, त्यात चिखल मिसळल्याने डास व दुर्गंधी वाढली आहे. पावसामुळे भिंतींना गळती लागली असून छतावरून टपकणाऱ्या पाण्यामुळे औषधे, फाईल्स व उपकरणांचे नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या परिस्थितीत उपचार घेणाऱ्या रुग्णांची अडचण अधिकच वाढली असून विशेषतः जखमी रुग्ण व प्रसूतामाता यांना या गैरसोयीचा मोठा फटका बसत आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. दरवर्षी पावसाळ्यात रुग्णालयात हीच स्थिती उद्भवते. शासनाकडून मोठा निधी खर्च होतो पण रुग्णालयाच्या गळक्या छताकडे व पाण्याच्या व्यवस्थेकडे कोणी लक्ष देत नाही. यामुळे रुग्णांचे प्राण धोक्यात येतात, असे मत नागरिक माजी सरपंच सिंधुताई सातव यांनी व्यक्त केले. तर नातेवाईक रेखाताई शेळके म्हणाल्या, रुग्णालयात पाणी साचल्याने स्वच्छतागृह वापरणेही कठीण झाले आहे. रुग्णांना सुरक्षित वातावरणाऐवजी अस्वच्छ परिस्थितीत उपचार घ्यावे लागत आहेत. प्रशासनाने तातडीने कारवाई करावी. रुग्णालय प्रशासनाने पंप लावून पाणी काढण्याचे काम सुरू केले असले तरी वारंवार पाऊस सुरू असल्याने परिस्थिती आटोक्यात येण्यास वेळ लागत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी तातडीने दुरुस्ती करून रुग्णालय इमारतीला जलरोधक करण्याची मागणी केली आहे. यासोबतच ग्रामस्थांनी पुढे येऊन आवाज उठवला की, सध्याच्या जिर्ण अवस्थेतील इमारतीऐवजी ग्रामीण रुग्णालयाचे त्वरित नवीन इमारतीत स्थलांतर व्हावे. जुन्या इमारतीचे रादलेले बांधकाम त्वरीत करून रुग्णालय नव्याने उभारले असुन त्या नविन इमारतीचे. बाधकाम त्वरीत करावे असेआदेश कॉन्ट्रॅक्टर याना वरीष्ट अधिकारी यांनी म्हटले आहे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही.

## वारला व पार्डी आसरा मंडळात पावसामुळे मोठे नुकसान

### पंचनामे करून तात्काळ मदत द्यावी: माजी सभापती मस्के



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अनसिंग, दि. १८ :** येथुन जवळ असलेल्या वारला मंडळ परिसरात गेल्या दोन दिवसांत झालेल्या दृष्टी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पिके जमिनीवरच आडवी झाली असून सोयाबीन, तूर, कापूस या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी हवालदिल झालेले असून शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी माजी समाजकल्याण सभापती किसनराव मस्के यांनी केली आहे. वारला मंडळातील अनेक शेतकरी या हंगामात मोठ्या अपेक्षेने पेरणी केलेली होती. मात्र अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकांची वाढ खुंटली आहे. पिके पाण्यात बुडाल्याने मुळास कुज येऊ लागली असून शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. किसनराव मस्के म्हणाले, शेतकरी आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आहे. त्यात आता दृष्टी पावसामुळे झालेल्या या नुकसानीने शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून मदत वाटप करावे. अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल. स्थानिक शेतकऱ्यांनी सुद्धा कृषी व महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी गावोगावी जाऊन प्रत्यक्ष नुकसानीचे सर्वेक्षण करून पंचनामे करावेत, व सोलर चेही झालेल्या नुसकानी चे पंचनामे करावे अशी मागणी केली आहे.

## अनसिंग गावाला पोकरा योजनेत समाविष्ट करा!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**गावकऱ्यांची पालकमंत्र्यांकडे मागणी**

**अनसिंग, दि. १८ :** वाशिम तालुक्यातील अनसिंग गावाची लोकसंख्या सुमारे २५,००० असून येथील बहुतांश लोक शेतीवर अवलंबून आहेत. येथे शेतकऱ्यांना पाण्याची टंचाई, अपुरी सिंचन सुविधा, हवामान बदलामुळे अवेळी पाऊस, गारपीट, दुष्काळ, तसेच वाढते उत्पादन खर्च आणि पिकांना स्थिर भाव न मिळाल्यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याशिवाय पिक विमा नुकसानभरपाई मिळण्यात होणारा विलंब ही देखील गंभीर समस्या आहे.या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्ता मामा भरणे यांच्याकडे अनसिंग गावाचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा योजना) मध्ये तातडीने समावेश करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते यश चव्हाण यांनी केली आहे. ही योजना हवामान बदल, दुष्काळ, अपुरी सिंचन सुविधा आणि कृषी उत्पादन क्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, अनसिंगला या योजनेत समाविष्ट केल्यास शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब होईल.

## काटा परिसरातील नुकसानीचे तातडीने पंचनामे करा - प्रणव पते

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. १८ :** तालुयातील काटा येथे १६ ऑगस्ट रोजी ढगफूटी सदृश्य पाऊस झाला. भूतो न भविष्य काटेपूर्णा नदीला महापूर गेला. नदीकाठच्या शेत जमिनी खरडून गेल्या. सखल भागातील शेतात पाणी साचले. अनेकांच्या घरात पाणी घुसले. शेतर्कयांचे नुकसान झाले. महसूल प्रशासनाने झालेल्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करुन शेतर्कयांना शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रणव पते यांनी केली आहे.

'शेतर्कयाला नाही दिवाळी दसरा, कारण त्याच्या मालाची किंमत करतो दुसरा' शेतकरी हा देशाचा आर्थिक कणा आहे. देशाची अर्थव्यवस्था शेतर्कयांच्या भरोशावर आहे. देशातील प्रत्येक उत्पादक कंपनीनीला त्यांनी उत्पादीत केलेल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार आहे. परंतु, शेतर्कयांनी उत्पादीत केलेल्या मालाची किंमत दुसराच ठरवतो. शेतकरी छातीला माती लावून लाखमोलाचे बियाणे जमीनीत टाकतो. रक्ताचे पाणी करुन त्याचे उत्पादन करतो. मात्र, निसर्ग कोपतो आणि शेतर्कयांचे स्वप्ने धुळीस मिळतात. कधी अतिवृष्टी, कोरडा दुष्काळ तरी कधी अवकाळीचा फटका या निसर्गाच्या प्रकोपातून वाचून जे घरात आले त्याला भाव मिळत नाही. त्यात कुटूंबाची जबाबदारी, पाल्यांचे शिक्षण, मुलीचे लग्न या व्यतिरिक्त इतर खर्च, अशा कात्रीत सापडलेला शेतकरी नाईलाजास्तव आत्महत्येला समोर जात आहे. वाशीम तालुयातील काटा गाव व शिवारात १६ ऑगस्ट रोजी दुपारनंतर ढगसदृश्य पाऊस पडला. अनेकांच्या शेतात व घरात पाणी घुसले. घरातील साहीत्याचे नुकसान झाले. शेतातील सोयाबीन, तूर, हळद पिकासह शेतर्कयांची भविष्यातील स्वप्न वाहुन गेली. खरीप हंगाम निसर्गाच्या अवकृपेने हातून गेला. खरीप हंगामातून हातात काही येणार नाही, त्यामुळे रब्बीचे नियोजन कसे करावे. त्यामुळे शेतर्कयांचे भविष्यातील नियोजन कोलमडले. अशा परिस्थितीत अडकलेल्या शेतर्कयांच्या डोळ्यातून आश्रूंचा पूर वाहत आहे.



**काटा गावात बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. त्यांच्याकडे रब्बी हंगामासाठी सिंचनाची कुठलीही सोय नाही. खरीप हंगामातील पिकावर त्यांचे सर्वकाही अवलंबून आहे. मात्र, मागील काही वर्षापासून कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ या चक्रव्युवहात सापडला आहे. खरीप हंगामातील पिक हाती आले तर रब्बी पिकासाठी सिंचनाची सोय नाही. केवळ एका पिकाच्या भरोशावर शेतकरी आपले भविष्याचे नियोजन करत आहे. ३० ते ३५ वर्षापूर्वी काटा येथे पाझर तलावाची निर्मिती केली. मात्र, त्याचा कुठललाही लाभ शेतर्कयांना होत नाही. त्यामुळे शासनाने पाझर तलावाचे रुपांतर सिंचन तलावात करावे जेणेकरुन खरीप हंगाम गेला तरी रब्बी हंगामात शेतर्कयांना मदत होईल, अशी मागणीही प्रणव पते यांनी केली आहे.**

## श्री संगमेश्वर कावड मंडळाचा संगमेश्वराला जलाभिषेक



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. १८ :** हर हर महादेवाच्या गजरात औंढा नागनाथ ते वारा जहागीर भर पावसात चार दिवस पयदल प्रवाश करीत श्री संगमेश्वर कावड मंडळाची कावड यात्रेचा श्री संगमेश्वर संस्थान वारा जहागीर येथे संगमेश्वराला जलाभिषेक करून कावड यात्रेचा समारोप करण्यात आला आहे,

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री संगमेश्वर कावड मंडळ वारा जहागीरचे अध्यक्ष विलासराव विश्वनाथ ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या मंडळाने दि,१४ ऑगस्ट रोजी औंढा नागनाथाचे दर्शन घेऊन व विधीवत पूजा करून या कार्डची सूरूवात झाली, हिंगोली,कणेरगाव,राजगाव उकळी पेन वार्ला, अनसिंग,वारा जहागीर,या मार्गाने भर पाऊसात पयदल प्रवाश करीत हे कावड मंडळ आज दि १८ रोजी श्री संगमेश्वर संस्थान वारा जहागीर येथे पोहचले,व हभप वसंतराव ढगे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली कावडीचे अध्यक्ष विलासराव ढगे यांनी शकडो कट्टर शिवभक्तांच्या उपस्थित श्री संगमेश्वराला जलाभिषेक केला व गावात मिरवणूक काढून कावडीची भक्ती मय वातावरण सांगता झाली.

## ऐतिहासिक सादरीकरणातून स्वातंत्र्य दिन उत्साहात

**कारंजा (लाड) :** येथील आर.जे. चवरे हायस्कूल व कॉन्व्हेंट शाळेत स्वातंत्र्य दिनाचा सोहळा देशभक्तीच्या जल्लोषात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात कारंजा एज्युकेशन सोसायटीचे सचिव अमल चवरे, जे.सी. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक हरसुले, आर.जे. चवरे प्राथमिक व हायस्कूलच्या मुख्याध्यापिका चोपडे, आर. जे. चवरे कॉन्व्हेंटच्या प्रभारी मुख्याध्यापिका हेडा, पर्यवेक्षक, गंधक, आर. जे. किड्स इंचार्ज खेडकर व समन्वयिका रागिणी चवरे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाने झाला. राष्ट्रगीताने सभागृह देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले.विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते सादर केली तसेच गिटारच्या सुरावटींवर देशभक्तीची भावना जागवली. चोपडे यांनी विद्यार्थ्यांना नकारात्मक विचार टाळून सकारात्मक दृष्टिकोनातून ध्येय साध्य करा असा सल्ला देत सरदार वल्लभभाई पटेल यांची प्रेरणादायी गोष्ट सांगितली.

## जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांना आजपासून प्रारंभ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशीम, दि. १८ :** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत आयुक्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे ,जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांना १९ ऑगस्ट पासून प्रारंभ होत आहे.

याबाबतची माहिती जिल्ह्यातील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या यु-डायस क्रमांकावर वेळापत्रकासह पाठविण्यात आली आहे. क्रीडा स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी खेळिनहाय ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करायची आहे.

तालुकास्तरावर १० क्रीडा स्पर्धांचे आयोजन होणार असून, त्यात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, कॅरम, बुध्दीबळ, कुस्ती, मैदानी स्पर्धा, क्रिकेट आणि योगासन यांचा समावेश आहे. तर जिल्हास्तरावर तब्बल ४९ क्रीडा स्पर्धा होणार आहेत.स्पर्धेत सहभाग नोंदविताना किंवा अन्य कारणास्तव काही अडचण आल्यास स्पर्धा प्रमुख मारोती सोनकांबळे (मो. ९८८१०७१७७०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे यांनी केले आहे.

सांस्कृतिक

### परिपूर्ण अर्ज गणेश चतुर्दशीच्या एक दिवसापूर्वी पाठवा

## सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव स्पर्धा: अधिकाधिक मंडळांनी सहभागी व्हावे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १८ :** सांस्कृतिक कार्य विभागातर्फे, सन २०२५ च्या गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुररस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व मंडळांनी सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेसाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील मंडळांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती गठित करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या ई मेलवर स्पर्धेचे परिपूर्ण अर्ज गणेश चतुर्दशीच्या एका दिवसापूर्वीपर्यंत पाठवावेत, असे आवाहन समितीने केले आहे.

राज्य समितीकडे जिल्हास्तरीय निवड समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ आणि अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशींमधून गुणांकन आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड केली जाणार आहे. तर उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

राज्यातील गडकिल्ले, तसेच राष्ट्रीय, राज्य स्मारक यांच्या जतन, संवर्धनासाठी प्रत्येकी ५ नुसार एकूण १० गुण आहेत. सामाजिक उपक्रमात महिला उपक्रम, पर्यावरण रक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार, व्यसनमुक्ती, ज्येष्ठ नागरिक उपक्रम, शैक्षणिक, कृषी उपक्रम, वंचित घटकांसाठी उपक्रम आदींसाठी प्रत्येकी २ याप्रमाणे २५ गुण आहेत. त्यात आरोग्य सेवा, ग्रंथालय, वृध्दाश्रम, एखादे गाव दत्तक घेणे अशा प्रकारचे कायमस्वरूपी उपक्रम राबवणाऱ्या मंडळांना ५ गुणांचा समावेश आहे.

पर्यावरणपूरक मूर्तीसाठी ५ व पर्यावरणपूरक सजावटीला ५ गुण आहेत. ध्वनीप्रदूषणरहित वातावरण असल्यास ५ गुण व पारंपरिक किंवा देशी खेळांच्या स्पर्धेसाठी १० गुण आहेत. गणेशभक्तांसाठी पेयजल, प्रसाधनगृह, प्रथमोपचार, वाहतूकीत अडथळा येणार नाही असे आयोजन, स्वच्छता यासाठी प्रत्येकी २ असे एकूण १० गुण आहेत. असे जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर यांनी कळिवले आहे.

**या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना सहभागी होता येईल. गुणांकनात गायन, वादन, नृत्य, नाट्य, लोककला, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कला, हस्तकला, चित्रकला, शिल्पकला, माहितीपट/चित्रपट आदींसाठी प्रत्येकी २ नुसार एकूण २० गुण आहेत. संस्कृतीचे जतनअंतर्गत संस्कृती संवर्धन, पारंपरिक भांडी, नाणी, शस्त्र आदी प्रदर्शन, वाङमयीन उपक्रम, लुप्त होणा-या कलाविष्कारांचे संवर्धन आदींसाठी प्रत्येकी २ असे एकूण १० गुण आहेत.**

## शेतकरी बांधवांनो शासन आपल्या पाठीशी आहे – पालकमंत्री भरणे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशीम, दि. १८ :** गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक ठिकाणी घरांचे, रस्त्यांचे व सार्वजनिक मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे चित्र समोर आले आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. दत्तात्रय भरणे यांनी नागरिकांना धीर देत एक महत्त्वाचे आवाहन केले आहे.

पालकमंत्री भरणे म्हणाले की, शेतकरी बांधवांनो घाबरू नका. शासन आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहे. आपत्तीग्रस्तांना मदत व पुनर्वसनासाठी तातडीने उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून शासनाकडे सादर केले जातील. कोणत्याही शेतकऱ्याला वंचित राहू दिले जाणार नाही.

तसेच जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागात मदत कार्य गतीने सुरू असून प्रशासन सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, संयम बाळगावा आणि प्रशासनाशी सहकार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शासनाच्या वतीने तातडीने दिलासा मिळावा यासाठी सर्व विभाग सतर्क असून, नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असा विश्वासही पालकमंत्र्यांनी व्यक्त केला.

**महत्त्वाचे**

## भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**रिसोड :** भरधाव पिकअपने सायकलस्वाराला उडविल्याने सायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना १८ ऑगस्ट रोजी दुपारी ३:३० वाजता च्या दरम्यान रिसोड-मालेगाव मार्गावर ग्राम करडा फाटाजवळ घडली. तुकाराम धोंगडे वय ६५ रा. बिबखेडा, ता. रिसोड असे मृताचे नाव आहे.

या घटनेमध्ये सदर पिकअप डिव्हायडरवरून उसळून पलटी झाला. पिकअपमधील दोघे जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली असून, जखमींची नावे मात्र कळू शकली नाहीत. याबाबत स्थानिक घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, तुकाराम धोंगडे हे आपल्या सायकलने रिसोडवरून मालेगाव मार्गाने आपल्या गावी बिबखेडला जाण्याकरिता निघाले असता, करडा फाटा जवळ मागून पिकअपने त्यांच्या सायकलला जबर धडक दिली. धडक दिल्यानंतर सदर पिकअप हा डिव्हायडरवरून दुसऱ्या दिशेने जाऊन पलटी झाला. जखमींना रिसोड येथील खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले; मात्र या ठिकाणी तुकाराम धोंगडे यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले तर जखमींचा उपचार सुरू आहे. या घटनेमध्ये मृत पावलेले तुकाराम धोंगडे यांचा मृतदेह रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयांमध्ये शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला होता, तर या प्रकरणाबद्दल रिसोड पोलीस पुढील प्रक्रिया करीत आहेत.

# अकोटात कावड शोभायात्रा उत्साहात

## पोलिसांचा तगडा बंदोबस्त: २४ मंडळांचा सहभाग,महिला डीजे ऑपरेटरला मनाई

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट , दि. १८ :** संपूर्ण विदर्भात प्रसिद्ध असलेली कावडयात्रा आज अकोटमध्ये श्रावणातील चौथ्या सोमवारी संपन्न झाली. या कावड शोभायात्रेत एकूण २४ मंडळे सहभागी झाली होती. विशेष म्हणजे कावड यात्रेमध्ये महिला डीजे ऑपरेटरवर बंदी घालण्यात आली होती. अकोट शहरातील सर्वच कावड मंडळे रविवारी दुपारीच पूर्णा नदीचे पवित्र जल कळशीमध्ये आणण्यासाठी अनवाणी पायाने निघाली होती. रात्री उशिरा पुन्हा परतीचा प्रवास सुरू झाला. यावर्षी सोमवारी सकाळीच शहराच्या सीमेवर दाखल होऊन शिवभक्त कावड बांधणीला सुरुवात झाली होती. कावड यात्रा महोत्सवासाठी पोलीस प्रशासनाद्वारे अकोटात तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अकोटात ठिकठिकाणी पालखीच्या स्वागतासह शिवभक्तांसाठी फराळाचे स्टॉल व चहापाण्याची व्यवस्था



देखील करण्यात आली होती. पोलीस प्रशासन संपूर्ण तयारीनिशी सज्ज होते. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून संपूर्ण कावड मार्गावर कडक लक्ष ठेवण्यात आले. निर्धारित वेळेत पालख्या मार्गस्थ झाल्या. शोभायात्रा मिरवणूक दरम्यान चित्रपटाचे अश्लील गित/डायलॉग डी.जे.नारी ऑपरेटर चालणार नाहीत. शिवकावड उत्सव संबंधानेच गिते असून, तेच वाजविले जावे, अशी श्रावण मास कावड उत्सव समितीकडून नियमावली करण्यात आली होती, अशी माहिती अनंत मिसाळ अध्यक्ष कावड शोभायात्रा समिती अकोट यांनी सर्व मंडळांना आधीच दिली होती. सकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत शहरात कावड यात्रा शांततेत निघाली.कावडयात्रा ही अकोला नाका येथून सुरू होऊन पुढे जवाहर मार्ग, सोनू चौक, नरसिंग महाराज रोड, यात्रा चौक, कालंका माता चौक, सोमवार वेस, बळीराम चौक, पान अटाई, आंबोळी वेस, रामटेकपुरा, शौकत अली चौक, जयस्तंभ चौक, सियाराम शोरुमपासून टाकपुरा आणि यानंतर तपेश्वरी महादेव मंदिर येथे महादेवाला जलभिषेक करून कावड महोत्सवाचा समारोप झाला. अकोट कावड यात्रा मार्गावरील अकोला नाका ते तापेश्वरी मंदिरापर्यंत पोलिसांचा मोठा फौजफाटा

## खरिपाच्या पिकांवर संकट, लघु-मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**वाशिम, दि. १८ :** गेल्या तीन दिवसांत (१४ ते १६ ऑगस्ट) झालेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमधील शेतशिवारात पाणीच पाणी साचले आहे. सतत कोसळलेल्या पावसामुळे वाशिम, रिसोड, मालेगाव आणि मंगरूळपीर तालुक्यातील नदी-नाल्यांना मोठा पूर आला. लघु प्रकल्पांसह तिन्ही मध्यम प्रकल्प ओव्हर फ्लो होऊन पाण्याचा प्रवाह थेट शेतात घुसल्याने खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस, हळद यांसह बहुतेक सर्वच पिके पाण्याखाली गेली.

जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांचे हिरवे स्वप्न या अतिवृष्टीमुळे काळवंडले असून, प्राथमिक अंदाजानुसार १० हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, १७ ऑगस्ट रोजी पावसाने उसंत दिल्याने महसूल आणि कृषी विभागाने पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू केली असून, तीन दिवसांच्या मुसळधार पावसामुळे वाशिम तालुक्यातील असंख्य गावे बाधित झाली आहेत.

## जि.प.प्राथमिक शाळा येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**कळंबी महागाव , दि. १८ :** जि. प. शाळा कळंबी महागाव येथे स्वातंत्र्य दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश सावळे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच गावचे सरपंच रत्नप्रभा मुरलीधर ठाकरे, उपसरपंच विजय सावळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पोलीस पाटील चंद्रमणी सावळे, पोलीस पाटील सुधाकर ठाकरे, तंटामुक्ती अध्यक्ष कडू



सावळे, ग्रामपंचायत सदस्य भास्कर ठाकरे, कला सावळे, अरुण सावळे, विनोद सावळे ,ग्रामसेविका शीतल मोरे, अनिता शेंडे, सुषमा पानतावणे, उषा वाकडे, रंजना सावळे, मीना सावळे, हर्षाली सावळे, सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष नानाराव ठाकरे, माजी सरपंच अंकुश ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते रामराव सावळे, भारत सावळे, दशरथ सावळे, दिवाकर सावळे, जुगल सावळे, सुभाष सावळे, उमेश सावळे, मेजर सुधाकर पांडुरंग सावळे, आशीर्वाद सावळे, संकेत सावळे, संजय सावळे, समाधान डाबेराव, हे सर्व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. मुख्याध्यापक गजानन बावस्कर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी भारतीय सैन्यामध्ये कार्यरत असलेले आणि आपल्या देशाची सेवा करणारे नीलेश सावळे उपस्थित होते. जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून कवायती पाहायला मिळाल्या.

## शिवभक्तांसाठी पाच क्विंटल उसळचे वितरण

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मूर्तिजापूर, दि. १८ :** दरवर्षीप्रमाणे सार्वजनिक कावड व ज्येष्ठ नगरसेवक विनायक गुल्हाने यांच्या पुढाकाराने तोलाराम चौक येथे सार्वजनिक कावड मंडळाच्यावतीने शिवभक्तांसाठी पाच क्विंटल उसळचे वितरण करण्यात आले आहे. तालुक्यातून लाखपुरी या भागातून मोठी श्रद्धा घेऊन नदी काठावरचे जल घेऊन महादेवाचे भक्त आपल्या खांद्यावर कावड घेऊन जेव्हा शहरात दाखल होतात तेव्हा माजी नगरसेवक विनायक गुल्हाने यांच्यातर्फे सर्व शिवभक्तांचे स्वागत करून उसळचे वितरण करण्यात येते. या कार्यक्रमाला प्रामुख्याने मार्गदर्शक म्हणून लाभलेले मूर्तिजापूरचे उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, तहसीलदार शिल्पा बोबडे, ठाणेदार अजित जाधव, ठाणेदार श्रीधर गुट्टे प्रामुख्याने उपस्थित होते.

शिवसेना शहरप्रमुख विनायक गुल्हाने यांनी उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, ज्येष्ठ पत्रकार दिलीप देशमुख, माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे ,कैलास महाजन, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संजय गुप्ता, माजी नगरसेवक इब्राहिम घाणीवाला, राष्ट्रवादी काँग्रेस युवक प्रदेश उपाध्यक्ष संदीप जळमकर, निजाम इंजिनियर, तसलीम खान, माजी नगरसेवक सुनील पवार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक गणेश महल्ले, सार्थ तिडके, श्रीकृष्ण बोळे इत्यादींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अन्वर खान यांनी केले. मूर्तिजापूर शहरात शिवभक्त दाखल होताना नाचत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आपली कावळ खांद्यावर घेऊन दाखल झाले. सदर कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता जितू गुल्हाने ,शरद गणोरकर, बाळू टाक, मुन्ना नाईकनवरे ,पवन जोगदंड, पांडुरंग कवडकर, सविनय गुल्हाने, मंगेश गुल्हाने ,दिगंबर गुल्हाने, नंदकिशोर बबानीया ,मनोहर ताकतोडे, दिगंबर गुल्हाने, गजानन गुल्हाने, संजय गुल्हाने, विशाल नाईक, मोहम्मद रिजवान, सिद्दीकी ,तसवर खान, अभिनय गुल्हाने व इतर मित्र परिवारांनी पुढाकार घेतला.




अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा



बुलडाणा, मंगळवार,दि.१९ ऑगस्ट २०२५

**महत्वाचे**

## अनोळखी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

**खामगाव :** टेंभूर्णा फाटा येथे एक अनोळखी व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. नागरिकांच्या माहितीवरून पोलिसांनी तात्काळ त्याला खामगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचाराकरिता अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असतानाच बुधवारी त्याचा मृत्यू झाला. अकोल्यातील सीटी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

## वीज पडल्याने एका महिलेचा मृत्यू; दोघी गंभीर

**खामगाव :** शेतातून घरी येत असलेल्या मजूर महिलांच्या अंगावर वीज पडल्याने एका महिलेचा जागीच मृत्यू झाला तर दोन महिला गंभीररित्या जखमी झाल्याची घटना १६ ऑगस्ट रोजी दुपारी तालुक्यातील पारोड येथे घडली.

या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नेहमी प्रमाणे धारोड बेवील काही महिला १६ ऑगस्ट रोजी सकाळी शिवारातील एका शेतात कामा करिता गेल्या होत्या. दरम्यान दुपारी अचानक बातावरण बदलून विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. यामुळे या मजूर महिला लगबगीने घरी निघाल्वा, महिला गावाजवळ येत असताना अचानक जोरात आवाज होऊन बीज कोसळली. यात कोकिळाचाई प्रकाश अवकाळे (५०) या जागीच मृत्यूमुखी पडल्या तर इतर दोन महिला गंभीररित्या जखमी झाल्या. घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी धावपळ करून या महिलांना तातडीने खामगाव सामान्य रूणालयात उपचारासाठी भरती केले.

## संत निरंकारी मिशनच्या रक्तदान शिबिरामध्ये १६३ जणांचे रक्तदान

**खामगाव :** संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरीटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवार १७ ऑगस्ट रोजी संत निरंकारी सत्संग भवन, खामगांव या ठिकाणी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून १६३ जणांनी रक्तदान केले आहे. या शिबिराचा शुभारंभ खामगांव मुक्तेश्वर आमचे मान्यवर मुक्तेश्वर कुलकर्णी तसेच सोबतच जिल्हा संयोजक संतोष शेगोकार यांनी केले, रक्त संकलन जिल्हा शासकीय रुग्णालय खामगाव ब्लड बैंक, अकोला जिल्हा शासकीय रुग्णालय ब्लड बैंक यांच्या माध्यमातून करण्यात आले. या शिबिरासाठी अजय छतवानी यांच्या देखरेखेखाली सेवादलच्या बुनिट नं. ६८९ चे संचालक, शिक्षक महात्मा तथा बहेनजी सोबतच युवकांचे व अन्य स्थानिक भक्त गणांचे मोलाचे सहकार्य लाभले. खामगांव तसेच आजुबाजूच्या परिसरातील युवकांनी भरभरून रक्तदान करून मानवतेच्या या महान यज्ञरुपी कार्यामध्ये आपले अतुलनीय योगदान दर्शविले.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६८० - २२८५ |
| गहू | २५०० - २६७५ |
| तुर | ४१७५ - ६७२५ |
| हरभरा | ५३५० - ६१२५ |
| सोयाबीन | ४०००- ४८०० |
| भुईमुग | ५३०० - ५३०० |
| उडीद | ५५५१ - ५५५१ |
| धने | ५८०० - ५८०० |
| मुंग | ४८८० - ९९९९.२५ |
| मक्का | १९०० - २०७५ |
| तीळ | ८००० - ८००० |

# जिल्ह्यात सर्वत्र पावसाचा कहर

## मेहकर व चिखली तालुक्यात अतिवृष्टी सदृश पाऊस!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१८ :** जिल्ह्यात सार्वत्रिक पाऊस सुरू आहे. त्यातही मेहकर तालुक्याला तर पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. या ठिकाणी जिल्ह्यात सर्वाधिक ६८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.चिखली तालुक्यात देखील ठीक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सकाळी आलेल्या पावसाने चिखली बुलढाणा रोडवरील हातनी या गावी पुलावरून पाणी गेल्याने महामार्ग बराच काळ बंद राहिला. यामुळे वाहतूक पर्याय मार्गावरून वळवावी लागली.चिखली तालुक्यातील धोडप मंडळामध्ये ढगफुटी सदृश पाऊस झाला असून धोतरा भनगोजी येथे पुलावरून पाणी गेल्याने पेठ मार्गे देखील बराच काळ बंद होता. जिल्ह्यातील मोठा प्रकल्प असणाऱ्या खडकपूर्णा प्रकल्प देखील भरला असून या प्रकल्पाचे ११ दरवाजे उघडले आहे. आगामी दोन दिवस पावसाची शक्यता पाहता प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. जिल्ह्याच्या सर्वच तालुक्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात पाऊस होत आहे. मधल्या काळात पावसाने काहीशी विश्रांती घेतली होती.





कडक ऊन तापले.. मात्र या दोन दिवसांमध्ये पावसाचे जबरदस्त कम बॅक झाले आहे. धो धो म्हणावा असा पाऊस कोसळत आहे. जिल्ह्यातील जवळपास सहा तालुक्यांमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. काल जिल्ह्यात सरासरी २५४.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. खडकपूर्णा ९३% तर पेनटाकळी प्रकल्प ८८%..भरला.

जिल्ह्यातील मोठा प्रकल्प खडकपूर्णा आणि पेनटाकळी प्रकल्पाच्या कॅचमेंट क्षेत्रामध्ये मुसळधार पाऊस झाल्याने आज देऊळगाव राजा खडकपूर्णा प्रकल्प ९३% भरला असून या प्रकल्पाचे ११ वक्र दरवाजे ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले. २६५५९ क्यूसेक इतका पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. तर मेहकर तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्प ८८% भरला असून या प्रकल्पाचे सकाळी ९ वक्र दरवाजे ३० सेंटीमीटरने उघडण्यात आले. त्यातून ६४८२ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना जिल्हा प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**धोडप मंडळात ढगफुटी...**

१८ऑगस्ट रोजी धोडप ता. (चिखली) मंडळातील धोडपसह शेलसूर, करवंड, धोत्रा भनगोजी शेलोडी, पळसखेड सपकाळ, डोंगर शेवली चांधई व आंधई या गावात ढगफुटी सदृश्य पाऊस पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. धोत्रा भनगोजी येथे पुलावरून पाणी वाहत असल्याने काही काळ पेठ मार्गे चिखली यादरम्यान वाहतूक ठप्प झाली होती. सुमारे तासभर चाललेल्या संततधार पावसामुळे नाल्यांना ठिकठिकाणी पूर आले होते. तर शेतात तलाव साचून हजारो हेक्टरवरील पिके धोक्यात आली आहेत.

**खडकपूर्णा ९३% तर पेनटाकळी प्रकल्प ८८%..भरला.**-जिल्ह्यातील मोठा प्रकल्प खडकपूर्णा आणि पेनटाकळी प्रकल्पाच्या कॅचमेंट क्षेत्रामध्ये मुसळधार पाऊस झाल्याने आज देऊळगाव राजा खडकपूर्णा प्रकल्प ९३% भरला असून या प्रकल्पाचे ११ वक्र दरवाजे ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले. २६५५९ क्यूसेक इतका पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. तर मेहकर तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्प ८८% भरला असून या प्रकल्पाचे सकाळी ९ वक्र दरवाजे ३० सेंटीमीटरने उघडण्यात आले. त्यातून ६४८२ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना जिल्हा प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**खा. जाधव यांनी साधला जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क**

हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशाराही दिला आहे. १८ ऑगस्टच्या सकाळपासूनच जिल्ह्यात पाऊस सुरू आहे. सकाळीच केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला व जिल्ह्यातील नुकसान तसेच पाऊस परिस्थितीची माहिती जाणून घेतली. अतिवृष्टीचा हवामान खात्याने दिलेला इशारा लक्षात घेता परिस्थितीनुसार शाळांना सुट्टी द्यावी, विद्यार्थी शाळेत आलेले असतील तर त्यांना सुखरूप घरपोच सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी. या संदर्भात संबंधित विभागातील गटविकास अधिकारी व तहसीलदारांना सूचित करावे. आपत्ती विभागाचे पथक अलर्ट मोडवर ठेवावेत, नदीकाठच्या गावाकडे विशेष लक्ष ठेवाण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनास दिल्या आहे.

## लोणार येथे 'हर घर तिरंगा अभियान' उपक्रम संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.१८ :** अमृत सेवाभावी संस्था परभणी व्दारा कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार व कै.कमलबाई बनमेरू कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयात लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१४ ऑगस्ट २५ रोजी हर घर तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अमृत सेवाभावी संस्था परभणी चे सचिव डॉ संतोष क.बनमेरू यांच्या हस्ते रॅलीस हिरवी झेंडी दाखवून सुरवात करण्यात आली. डॉ संतोष क.बनमेरू यांनी आपल्या मनोगतात सांगितले की देशाप्रती देश भावना आणि विद्यार्थ्यांच्या मनात देशाप्रती एकतेची भावना जागृत व्हावी या दृष्टिकोनातून शासनाने प्रत्येक घरावर झेंडा फडकविण्यासाठी सांगण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनीना



झेंडा वाटप करून सदर झेंडा आपल्या घरावर लावण्याचे आवाहन करण्यात आले. आपल्या मनात त्या झेंड्याला पाहून देशाविषयीची प्रेमभावना आणखीन वाढत जाईल आणि या देशाला आपले काहीतरी देणे आहे हे सातत्याने जाणवत राहील हा उद्देश या उपक्रमामागे असल्याचे मत व्यक्त केले. तिरंगा घेऊन लोणार शहरातून हर घर तिरंगा जन जागृती रॅली काढण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तथा विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## निरंकारी मिशनचे 'वननेस वन' अभियान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.१८ :** १८ ऑगस्ट, २०२५: सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन आशीर्वादाने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन मार्फत 'वननेस वन' परियोजनेचा पाचवा टप्पा रविवार, दि.१७ ऑगस्ट रोजी देशभरातील ६०० ठिकाणी मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने संपन्न झाला.

संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिन्दर सुखीजा यांनी याविषयी माहिती देताना सांगितले, की 'वननेस वन' हे अभियान केवळ हिरवाई किंवा वनराई पसरविण्याचा पुढाकार नसून प्रकृतीशी नाते, मानवी उत्तरदायित्व आणि सह-अस्तित्वाची भावना सदृढ करण्यासाठी समर्पित असा एक प्रयास आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये वननेस वनचा दुसरा कार्यक्रम १७ ऑगस्ट रोजी सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र शेगांव येथे राबविण्यात आला. ज्यामध्ये एकंदर १५० वृक्षांची लागवड करण्यात आली. शेगांव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या आवारात राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा शुभारंभ न्यायाधीश एन.डी.मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी





मिशनचे शेगांव येथील सेक्टर संयोजक संतोष शेगोकार यांच्यासह न्यायालयाचे रजिस्ट्रार ढबाले, आंबेकर, दैनिक देशोन्नतीचे वरिष्ठ पत्रकार अनिल उंबरकर आदि मान्यवर उपस्थित होते. सेक्टर संयोजकांच्या देखरेखीखाली मिशनचे स्थानिक सेवादल युनिट नं.१३०९ च्या अधिकारी व स्वयंसेवकांनी हा उपक्रम राबविण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. मिशनतर्फे सन २०२१ मध्ये देशभर सुरु करण्यात आलेल्या या अभियाना अंतर्गत अनेक ठिकाणी सुंदर वनराई उभी राहिली असून त्याने हरित लघुवनांचे स्वरुप धारण केले आहे. या लघुवनांमध्ये पहायला मिळत असलेले प्रवासी पक्षांचे स्थलांतर तसेच जैव विविधतेचे पुनरुत्थान हे प्रमाणित करते, की हे वृक्षारोपण केवळ पर्यावरणाचे रक्षणच करत नाही तर प्रकृतीच्या पुनरुज्जीवनाचे माध्यम बनत चालले आहे.

## शेवटच्या श्रावण सोमवारी कावडधारी भक्तांचा जल्लोष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१८ :** श्रावण मास आणि महादेवाची आराधना यांचे नाते अतूट आहे. श्रावणातील प्रत्योक सोमवारी शिवभक्त मोठ्या भक्तिभावाने पूजा-अर्चा करतात. मात्र, शेवटच्या श्रावण सोमवारी होणारी पूजा विशेष महत्वाची मानली जाते.

यानिमित्ताने खामगाव शहर व परिसरात सोमवारी कावडधारींचा प्रचंड जल्लोष अनुभवायला मिळाला. पवित्र जल आणण्याची परंपरा पहाटेपासूनच शहरातील तरुण कावडधारींनी नदीकाठावरून पवित्र जल आणण्यासाठी यात्रा काढली. हातात सजवलेली कावड, खांद्यावर गंगाजलाचे कलश आणि ओठावर ''हर हर महादेव'', ''बोल बम'' चा गजर अशा भक्तिभावपूर्ण वातावरणात शेकडो कावडधारी मंडळी महादेवाच्या मंदिरांकडे रवाना झाली. असे मानले जाते की, गंगाजलाने महादेवाला अभिषेक केल्यास सर्व पापे धुतली जातात आणि आयुष्यातील संकटे दूर होतात. त्यामुळे भक्तगण पायी चालत जल आणतात आणि ते थेट शंकराला अर्पण करतात. बेलपानाची धार्मिक आख्यायिका शिवपुराणात असा उल्लेख आहे की समुद्रमंथनाच्या वेळी निघालेल्या विषामुळे संपूर्ण विश्व धोक्यात आले. तेव्हा भगवान शिवाने ते प्रचंड विष प्राशन करून विश्वाचे रक्षण केले. त्यामुळे त्यांना 'नीलकंठ' हे नाव मिळाले. हे विष शमविण्यासाठी देवराज इंद्रांनी बेलवृक्ष निर्माण केला. या वृक्षाची पाने महादेवाला अर्पण केल्यास त्यांच्या कंठातील विष शांत राहते, असे मानले जाते. म्हणूनच बेलपान महादेवाला अत्यंत प्रिय मानले जाते. श्रावण सोमवारी बेलपान अर्पण केल्यास मनोकामना पूर्ण होतात आणि आयुष्य समृद्ध होते, असा भक्तांचा श्रद्धाभाव आहे. खामगावातील धार्मिक वातावरण शहरातील प्रमुख शिवमंदिरांमध्ये दिवसभर अभिषेक, रुद्राभिषेक, भजन, कीर्तन व हरिपाठाचा





कार्यक्रम सुरू होता. मंदिरांत बेलपान, फुलांचा खच पडला होता. दुपारी व संध्याकाळी झालेल्या महाआरतीसाठी भाविकांची गर्दी उसळली होती. महिलांनी ओटी भरण्याची प्रथा पार पाडली, तर उपवासधारी भक्तांनी सामूहिक भजनात सहभाग घेतला. प्रशासन व स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार मोठ्या प्रमाणावर भाविक जमल्यामुळे पोलिस प्रशासनाने सुरक्षा व्यवस्था मजबूत ठेवली होती. स्वयंसेवी संस्थांनी पिण्याचे पाणी, फराळ, लिंबूपाणी व वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करून यात्रेतील भक्तांना दिलासा दिला. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकतेचे दर्शन खामगाव शहरात ''हर हर महादेव'' च्या गजरात झालेली कावड यात्रा, बेलपानाचे महत्व अधोरेखित करणारे पूजन आणि भक्तांच्या प्रचंड उत्साहामुळे संपूर्ण शहर शिवमय झाले होते. या प्रसंगी श्रद्धा, भक्ती व सामाजिक एकतेचे सुंदर दर्शन घडले.

## गो. से. महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.१८ :** स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात आणि देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ८.१५ वाजता विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक तसेच वंचित बहुजन आघाडीचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक शामरावजी सोनोने यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा समारंभ पार पडला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर, विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुभाष बोबडे, सचिव डॉ. प्रशांत नरेंद्र बोबडे, कोषाध्यक्ष अजिंक्य शंकरराव बोबडे, सदस्य डॉ. सुरेंद्र सुरजमल जैन, प्रा. डॉ. नंदकिशोर एस. महल्ले, प्रा. डॉ. हेमंत चांडक, उपप्राचार्य डॉ. प्रफुल उबाळे, प्रा. डॉ. अनुराग बोबडे, यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर लगेच एन.सी.सी. बटालियन तर्फे प्रमुख पाहुणे अशोक सोनोने व प्राचार्य यांना मानवंदना देण्यात आली व परेडद्वारे सलामी देण्यात आली. मान्यवरांनी परेडचे निरीक्षण करून एन.सी.सी. विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालय तसेच बी. कॉम. च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूहगीत सादर केले. राष्ट्रीय एकात्मता, महिलांचा सन्मान व सामाजिक ऐक्य या विषयांवर आधारित नाटिका व सामूहिक नृत्य सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. यावेळी प्रमुख पाहुणे अशोक सोनोने यांनी आपल्या मनोगतात देशभक्तीची जपणूक करण्याचे, महिलांचा सन्मान करण्याचे आणि तरुणांनी समाजघटक म्हणून सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी या सर्वांनी एकत्र येऊन स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा केला.

## मराठा बहुजनांनी संघटनात्मक प्रगतीस प्राधान्य द्यावे- शिखरे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१८ :** शिवनीतीचा अभ्यास केल्यास महाराजांची अर्थ नीती उत्तम दर्जाची होती असे दिसते. आर्थिक नियोजन त्यांनी चांगल्या प्रकारे सांभाळले व सामान्य घटकांच्या विकासासाठी वापरले. आज मराठा बहुजन समाजाने वैयक्तिकरित्या आर्थिक प्रगती साधली असली तरी संघटनात्मक आर्थिक प्रगतीकडे दुर्लक्ष झाले. वैयक्तिक बरोबर संघटनात्मक आर्थिक प्रगती करण्याची गरज आहे. सहकाराच्या माध्यमातून शेतकरी, विद्यार्थी व सामान्य घटकांचा विकास साधण्याला प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन इतिहासकार इंजि. शिवश्री चंद्रशेखर शिखरे यांनी केले. तर संस्थांच्या प्रगत वाटचालीसाठी संचालकांची अर्थसाक्षरता महत्वताची असल्याचे बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक म्हणाले. मराठा सेवा संघाच्या नागरी सहकारी पतसंस्थेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

रविवार दिनांक १७ ऑगस्ट रोजी दुपारी शरद कला महाविद्यालय बुलढाणा या ठिकाणी मराठा सेवा संघ नागरी सहकारी पतसंस्थेचा उद्घाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मराठा सेवा संघाचे राज्य महासचिव इतिहासकार शिवश्री चंद्रशेखर शिखरे होते. तर राधेश्याम चांडक, आमदार धीरज लिंगाडे, डीडीआर महेंद्र चव्हाण, जिल्हा बँकेचे मुख्याधिकारी अशोकराव खरात आदींची उपस्थिती लाभली. जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष शिवमती पुष्पाताई गायकवाड यांच्या जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मराठा सेवा संघ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ.मनोहर तुपकर व संचालक मंडळाने मान्यवरांचा बुक देऊन पुस्तके देऊन सत्कार केला.





पुढे बोलताना चंद्रशेखर शिखरे यांनी शिवरायांच्या अर्थ नीतीवर प्रकाश टाकला. महाराजांनी अर्थकारण केले परंतु हे अर्थकारण समाज हिताशी निगडीत होते. सहकारी संस्थांनी शेतकरी व विद्यार्थी वर्गासाठी काही केल्यास ते समाज हिताचे ठरू शकते असे ते म्हणाले. बुलढाणा अर्बन चे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांनी संस्थेच्या संचालकांनी आचारसंहितेचे पालन केले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. सभासदांनी काही नियम घालून त्याचा अवलंब केल्यास संस्था प्रगतीचे शिखर गाठू शकते याचे मूर्तिमंत उदाहरण बुलढाणा अर्बन असल्याचे सांगितले.विद्यार्थी शिक्षणासाठी संस्थांमध्ये प्राधान्य दिले तर समाज उभारणीच्या कामाला प्रत्यक्ष हातभार लावल्यासारखे होणार असल्याचे भाईजी म्हणाले. आमदार धीरज लिंगाडे यांनी बुलढाणा अर्बन हिच पतसंस्थांचा आधार असल्याचे सांगितले. मुख्याधिकारी डॉक्टर अशोकराव खरात यांनी सहकाराच्या माध्यमातून अर्थक्रांती घडून आणणे शक्य असल्याचे सांगितले. तर डीडीआर महेंद्र चव्हाण यांनी शिस्त व पारदर्शीपणा आवश्यक असल्याचे सांगून सहकाराला प्रगतीपथावर नेण्यासाठी विधायक विचाराची गरज प्रतिपादन केली. प्रास्ताविक डॉक्टर मनोहर तुपकर यांनी केले. संस्थेच्या उभारणीची भूमिका शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांनी मांडलेल्या पंचसूत्रीनुसार असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाधिकारी आकाळ, प्राचार्य विष्णुपंत पाटील आदींनी विचार व्यक्त केले. यावेळी शिवश्री पांडुरंग पाटील यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी इंजिनियर रविकांत काळवाघे, ॲड. प्रकाश जाधव, इंजिनिअर गुलाबराव कडाळे, सौ सिंधुताई पाटील, इंजिनीयर दत्तात्रय शेळके, डॉक्टर सौ.ज्योती खेडेकर, विजय काकडे, सौ वैशाली आकाळ, मोहिनी चेके, डॉक्टर अंकिता खरात, इंजिनिअर कोमल तायडे, नंदकिशोर सरडे, रामेश्वर भालके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार संचालन शिवश्री संजय खांडवे यांनी तर आभार प्रदर्शन कोमल तायडे यांनी मानले. विशेष म्हणजे मराठा सेवा संघाची संस्थापक अध्यक्ष शिवश्री पुरुषोत्तम खेडेकरांनी प्रेक्षकांमध्ये बसून या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

## महत्त्वाचे

### श्रीगणेश उत्सवानिमित्त अतिरिक्त गाड्या

**शेगाव :** श्री गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशभक्तांच्या सोयीसाठी लोकमान्य टिळक टर्मिनस आणि नागपूर दरम्यान ६ अतिरिक्त गणपती विशेष ट्रेन चालवण्यात येणार आहेत. विशेष गाड्यांचा तपशील पुढीलप्रमाणे:

गाडी क्रमांक ०२१०१ विशेष दिनांक २२.०८.२०२५ ते ०५.०९.२०२५ पर्यंत दर शुक्रवार रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथून ००.१५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी नागपूर येथे १३.४० वाजता पोहचेल. (एकूण ३ सेवा)गाडी क्रमांक ०२१०२ विशेष दिनांक २२.०८.२०२५ ते ०५.०९.२०२५ पर्यंत दर शुक्रवार रोजी नागपूर येथून १४.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे ०५.०० वाजता पोहचेल. (एकूण ३ सेवा)थांबे - ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धा. संरचना: एक वातानुकूलित द्वितीय, ६ वातानुकूलित तृतीय, ९ शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि १ द्वितीय आसन व्यवस्थासह व सामान गार्ड ब्रेक व्हॅन. अनारक्षित डब्यांचे बुकिंग यूटीएस प्रणालीद्वारे करता येईल आणि सुपरफास्ट मेल/एक्सप्रेस गाड्यांसाठी लागू असलेल्या सामान्य शुल्कानुसार आकारले जाईल.

### युवकाचा सर्पदंशाने मृत्यू

**खामगाव :** गौरक्षण रोडवरील फकडदेवी मंदिराजवळील रहीवासी ओम देविदास घेगे (१८) हा तरूण १६ ऑगस्ट २५ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास रावण टेकडी भागात गुरांना चारण्यास घेवून गेला होता.

यावेळी त्याच्या पायाला सापाने दंश केला. त्याला त्वरीत पस्तिरातील एका इसमाने सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर प्रथम ोपचार केल्यानंतर जीएमसी अकोला येथे रेफर करण्यात आले होते. उपचारादरम्यान काल १७ ऑगस्ट २५ रोजी पहाटे अकोला येथे निधन झाले. त्याच्या पश्चात आई, वडील, चार विवाहीत बहीणी व बराच मोठा आप्त परिवार आहे

### आजोबाची नातवाने केली फसवणूक

**खामगाव :** सुटाळा बु. येथील विठ्ठल मंदिराजवळील रहिवासी पांडुरंग पंढरी हिरळकर (७८) यांना डोळ्याचे ऑपरेशन करावयाचे असल्याने ते काल १७ ऑगस्ट २५ रोजी नातू आशिष राजेंद्र हिरळकर (रा. सुटाळा बु.) याच्यासोबत कॅनरा बँकेत पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या खात्यात पैसे नसल्याचे बँकेकडून त्यांना सांगण्यात आले.

त्यामुळे त्यांनी बँक खात्याचे स्टेटमेंट काढून तपासणी केली असता आशिष राजेंद्र हिरळकर याने आजोबा पांडुरंग हिरळकर यांचे बँक खाते काढण्यावेळी स्वत:चा मोबाईल नंबर खात्याला लिंक करून युपीआय आयडी द्वारे २८ ऑगस्ट २०२० ते २६ जुलै २०२४ पर्यंत आजोबा यांच्या बँक खात्यातून ४ लाख रूपये काढून त्यांचा विश्वासघात केला व आर्थिक फसवणुक केली असल्याचे दिसून आले. या प्रकरणी पांडुरंग हिरळकर यांनी काल ५७ ऑगस्ट २५ रोजी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरूध्द कलम ३१६ (२), ३१८ (४) भान्यास नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोहेकों मनोहर गोरे करीत आहे.

# पावसात नाल्याच्या कामासाठी रस्त्याची खोदाई

## रहिवाशांचा जीवघेणा प्रवास सुरू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.१८ :** लोणार शहरातील मेहकर रोड परिसरातील गीतम लॉज समोरील ड्रेनेज नाल्याच्या कामासाठी रस्ता खोदण्यात आला असून कित्येक दिवसांपासून हे अर्धवट पडले आहे. परिणामी, शेकडो रहिवाशांचा मुख्य मार्ग बंद झाला असून शाळकरी मुले, कामावर जाणारे चाकरमानी आणि स्थानिक नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

गीताम लॉज समोरील कॉलनीत ड्रेनेज नाल्याचे काम ऐन पावसाळ्यात सुरू करण्यात आले आहे. नागरिकांनी आधीच प्रशासनाला विनंती केली होती की, पावसाळ्यात खोदकाम करू नये. मात्र या विनंतीचा नगरपालिका प्रशासनाने कोणताही विचार केला नाही. या भागातील घरांचे मुख्य रस्त्यावरून संपर्क पूर्णतः तुटलेला आहे. खोदलेला रस्ता चिखलमय, घसरडा व अतिशय अपायकारक आहे. नागरिकांना रोजच्या जगण्यासाठी, कामावर जाण्यासाठी, शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवणीसाठी जाताना जोखमीने भरलेला मार्ग पार करावा लागत आहे. या खोदलेल्या रस्त्यावर अपघाताचा धोका प्रचंड वाढला आहे.

मोटारसायकली घसरत आहेत. वृद्ध आणि महिला चालताना त्रास होत आहे. अशा वेळी कुणाचा जीव गेला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? हा सवाल नागरिक प्रशासनाला विचारत आहेत. विशेष म्हणजे या खोदलेल्या रस्त्याचे काम अतिशय धीम्या गतीने होत असल्यामुळे नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीही कृती झालेली नाही. काही ठिकाणी खोदकामानंतर यंत्रणाही दिसून येत नाही.

त्यामुळे अपूर्ण कामावर तात्पुरती व्यवस्था करावी. नागरिक, विद्यार्थी, चाकरमान्यांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा, अन्यथा दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



''आम्ही गीतम लॉज समोरील रहिवाशी आहोत. ड्रेनेज लाईनच्या कामासाठी कॉलनीत जाणारा रस्ता खोदण्यात आला. नगरपालिकाला तोंडी सांगण्यात आले होते की, आमच्या लोकांना जाण्यासाठी हा एकमेव रस्ता असल्यामुळे पावसाळ्यात हा रस्ता खोदण्यासाठी नागरिकांचा विरोध होता. मात्र नगरपालिकेने या तोंडी सूचनाकडे दुर्लक्ष करत रस्ता खोदला गेला. मात्र, रस्त्याचे गेल्या काही दिवसापासून काम अर्धवट ठेवून कामगार देखील काम करताना दिसत नाहीत. त्यामुळे आम्हा नागरिक, शाळकरी मुले आणि चाकरमान्यांचा जीवघेणा प्रवास सुरू आहे.'' – **श्री तेजनकर,** स्थानिक नागरिक

# लोकनेते स्व.विलासराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त काँग्रेसकडून अभिवादन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.१८:** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते स्व.विलासराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून अभिवादन करण्यात आले.

खामगाव येथील काँग्रेस पक्षाच्या जनसेवा कार्यालयात ता.१४ ऑगस्ट रोजी लोकनेते स्व.विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी स्व.विलासराव यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकला. सर्वसामान्यांच्या गरजांची जाण ठेऊन त्यांच्या प्रश्नांसाठी झटणारे कुशल प्रशासक, राजकारणात राहून समाजकारण करण्यात अधिक समाधानी राहणारे मुत्सदी नेते, प्रभावी वक्ते म्हणून स्व.विलासराव देशमुख यांची ओळख होती. त्यांनी राज्याच्या कृषी, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार, कला, क्रीडा, संस्कृती अशा अनेक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. याप्रसंगी खामगाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहान, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, धनंजय देशमुख, जुलकर नैन शेख चांद, खामगाव शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, कृउबास संचालक राजाराम काळणे, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, जिल्हा संघटन सचिव अतुल सिरसाट, महिला काँग्रेस शहर अध्यक्ष सरबजीतकौर सलुजा, वर्षा इंगोले, गजानन वाकुडकर, कैलास फाटे, अनंता ताठे, विजय इंगळे, कैलास ताठे, माजी नगर सेवक इब्राहीम खान, अस्लम पटेल, श्रीनाथ पांडे, शिरीष देशमुख, कैलास पाटील, सुधाकर डुकरे पाटील, संतोष देशमुख, जितेंद्र देशमुख, विलास चौहान, कैलास साबे, वसिम भाई, संतोष चौहान, सोहन गुजराती, दिपक खंडेराव, सैय्यद अकबर, मोमेश राठी, अनिल ठाकरे, विलास नवसागर, ऋषीकेश सांजोळके, प्रणव जोगी, हसन खान, इर्फान भाई, अफसर उल्ला, मजिद भाई, भगवान बोंबटकार, वसीम भाई, अशफाक उल्लाखान, अयान खान, मुनीर उल्लाखान, आवेस खान, जुलकर शेख, दिपक देशमुख, शेख मोबीन, अक्षय शंकरवार, मो.इसरान, सैय्यद जाफर, दिनेश सपकाळ, अजय पवार, अमित तायडे, सुरेश सोनोने, दिलीप भटकर, विलास चव्हाण, कुलदिप राजपूत, सौरभ रिछारिया, बंटी टिंगले यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सरस्वती प्राथमिक आश्रम शाळेत दहीहंडी उत्साहात साजरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**देऊळगाव साकर्सा दि.१८ :** येथे श्री सरस्वती प्राथमिक आश्रम शाळेत दहीहंडीचा कार्यक्रम म ोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक गोकुळाष्टमी निमित्त विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. लहान मुलांनी फुगडी, गाणी, पोवाडे आणि नृत्य सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले. यानंतर दहीहंडी फोडण्याचा मुख्य कार्यक्रम रंगला. विद्यार्थ्यांच्या पथकांनी ''गोविंदा आला रे आला''च्या गजरात मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडली. फोडलेल्या दहीहंडीतून दही, फुले आणि मिठाई उडाल्यावर उपस्थितांनी जल्लोष केला. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक होने सर, शिक्षक जाधव सर,शिंदे सर, दिवटे सर, पवार सर, चिपडे सर, राहाटे सर, ठेंग सर, सौ. देशमुख मॅडम, तसेच पाटील सर, धंदरे,राठोड, सरोदे शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुसळधार पावसामुळे डोणगाव येथे काच नदीला पूर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.१८ :** येथे दि. १७ ऑगस्टला सकाळी ४ वाजतापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे येथील काच नदीला पूर आला सदर पुलाचे पाणी नदीकाठी असलेल्या अंधारवाडी परीसरात घुसले.

पोलीस स्टेशन समोरील तलाव तुडुंब भरल्याने तलावाकाठी राहणाऱ्या लोकांच्या घरात पाणी घुसले असून परीसरातील नदी नाले तुडुंब भरले असून सकाळ पासून सदर राज्य महामार्गोवर असणारी वाहतूक ठप्प झाली आहे. डोणगाव येथे जिकडे पहावे तिकडे पाणीच पाणी दिसत असून विद्युत पुरवठा खंडीत झाला आहे. डोणगाव येथील संपुर्ण शेतात पाणीच पाणी दिसून येत असल्याने यावर्षी बळीराजा हतबल झाला असून सदर पुरामुळे झालेले नुकसानाचे त्वरित पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी काँग्रेस चे विनायक टाले यांनी केली असून तलावाकाठी व नदी काठी राहणाऱ्या घरांचे पाहणी करून नुकसान ग्रस्तांना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत द्यावी अशी मागणी येथील युवा नेते ठेकेदार शेख रफीक शेख हाफीस यांनी केली आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**वडेनर भोलजी दि.१८:** १७ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला रथावर ठेवून प्रतिमेचे पूजन करून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. मातंग समाजाचे श्रीकृष्ण वानखडे, सोपान वानखडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले. वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सुरेश वानखेडे, प्रल्हाद वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी समितीचे अध्यक्ष मंगेश सकळकर, आदित्य वानखडे, नारायण सोनोने, भास्कर सोनोने, विठ्ठल सोनोने, काशीराम वानखडे, सागर बोदडे, शेषराव वानखडे, कैलास तायडे, क्षितिज म्हस्के करण वानखडे आदी समाज बांधवानी कार्यक्रम यशस्वी केला.

# स्वातंत्र्यदिनी अनोखा टाईम मॅनेजमेंट यशस्वी उपक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**रायपूर दि.१८:** स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने स्पीकिंग इंग्लिश ठाकूर क्लासेस तर्फे विद्यार्थ्यांसाठी एक वेगळा आणि उपयुक्त ''टाईम मॅनेजमेंट'' विषयावर विशेष उपक्रम राबविण्यात आला. हा कार्यक्रम बुलढाणा येथील बुलढाणा रेसिडेन्सीमध्ये सकाळी घेण्यात आले. या कार्यक्रमाला शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त संतोष ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना केवळ भाषण, स्पीकिंग इंग्लिश कौशल्यच नव्हे, तर वेळेचे योग्य नियोजन कसे करावे, आरोग्य विषयी अनेक बाबी समजावून सांगितले. दैनंदिन कामांमध्ये प्राधान्यक्रम कसे ठरवावे आणि यशस्वी जीवनासाठी वेळेचे महत्व याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात प्रेरणादायी गोष्टी, प्रत्यक्ष उदाहरणे, आणि इंटरॅक्टिव्ह गेम्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन शिकवण्यात आले. आणि या कार्यक्रमाच्या माध्यमातून जमा झालेली राशी अपंग शाळेला दान करण्यात येणार आहे. विद्यार्थी व पालकांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा कार्यक्रमांनी मुलांचे व्यक्तिमत्व सर्वांगीण विकसित होते असे मत व्यक्त केले.

# कोलवड येथे कालभैरव कावडयात्रेचा जल्लोष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१८ :** रिमझिम पाऊस, सजलेले देखावे, कालभैरवाची भली मोठी मूर्ती त्यासमोर नंदी व त्यापुढे भक्ती भावे थीरकणारी तरूणाई असे दृश्य काल कावड यात्रेत दिसून आले. काल भैरव कावड यात्रेचे हे चौथी वर्ष होते. दरवर्षी तरुण वर्गाकडून ही यात्रा आनंदात उत्साहात साजरी केली जाते. बुद्धेश्वर ते कोलवड अशी ही कावड यात्रा निघाली. गर्द वनराईने नटलेल्या डोंगरातून रात्री बारा वाजता कावड यात्रेला सुरुवात झाली. खांद्यावर कावड घेऊन मोठा जमाव निघाला होता. ठिकठिकाणी कावड यात्रेचे स्वागत करण्यात आले. महिलांनी औक्षण केले तर काही ठिकाणी चहा फराळाची व्यवस्था करण्यात आली.१८ ऑगस्ट रोजी श्रावणाच्या चौथ्या सोमवारी हे आयोजन करण्यात आले. दुपार दरम्यान कोलवड येथे कावड यात्रा पोहचली. २५ किलोमीटरचे हे अंतर तरुणाईने रात्रीच्या अंधारात पार केले. रिमझिम पावसात भक्ती भावे यात्रा यशस्वी पार पडली. यासाठी कालभैरव कावड यात्रेचे समस्त पदाधिकारी, कोलवड ग्रामस्थानी विशेष परिश्रम घेतले. जय भोले शंकराचा गजर करीत कावड यात्रेचा समारोप करण्यात आला.

# उबाठा तालुका प्रमुख महेंद्र पाटील यांचा शिवसेनेत प्रवेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**साखरखेर्डा दि.१८ :** आम्ही उध्दव ठाकरे यांना सोडून एकनाथ शिंदे यांच्या नेतृखाली शिवसेना पक्ष वेगळा केला. सत्तेत असून पक्षांतील कार्यकर्त्यांची कामे होत नव्हती. हळूहळू शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेसने संपविण्याचा प्रयत्न केला होता. शिवसेना जिवंत ठेवण्यासाठी आम्ही जो निर्णय घेतला तो योग्यच होता. हे जनतेला सुध्दा पटले होते. म्हणून पुन्हा शिवसेना केंद्रात आणि राज्यात सत्तेवर आहे. काही आमचेच कार्यकर्ते दुधा मनस्थितीत होते. ते थांबले परंतू त्यांना आपली चुक कळली आणि ते पुन्हा आमच्या सोबत घर वापसी करीत आहेत. महेंद्र पाटील हे घराणे मूळचे शिवसेनेचे आहे, आजही ते शरीराने उबाठा सोबत असले तरी मनाने मात्र आमच्या सोबत होते. आज त्यांचा जाहीर पक्ष प्रवेश सोहळा होत असताना त्यांच्यावर प्रेम करणारे शेकडो शिवसैनिक प्रवेश सोहळ्यात सहभागी झाले. राजकारण करीत असताना डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आणि पायाला भिंगरी बांधून काम करणाऱ्याला जनता स्विकारते ते गुण पाटील घराण्यात आहे. असे विचार केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी साखरखेर्डा येथील पक्ष प्रवेश सोहळ्यात मांडले.

श्री पलसिध्द महास्वामी मठात आज शेकडो शिवसैनिकांचा पक्ष प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर हे होते. तर जिल्हा प्रमुख बळीराम मापारी, उपजिल्हाप्रमुख बाबुराव मोरे, धनशिराम शिंपणे, अतिष तायडे, युवासेना जिल्हा प्रमुख ऋषिकेश जाधव, तालुका प्रमुख वैभव देशमुख, देऊळगाव राजा तालुका प्रमुख सुदाम काकड, शिवसेना नेते योगेश जाधव, अनिल चित्ते, नरेंद्र डिघोळे, मायावती म्हस्के, गंभिरराव खरात, दामुआण्णा शिंगणे, अशोक खरात, अनंता शेळके उपस्थित होते.

पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिलीप बेंडमाळी, संतोष राजपूत , गोपाल राजपूत , युवासेना तालुका प्रमुख संदीप मगर, राजू गप्पे, दिपक गवळी, निलेश इंगळे यांनी केले होते. तर संचालन निलेश पोंधे यांनी केले.

# वामनदादा कर्डक जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१८ :** वामनदादा सारख्या घरादारावर तुळशीपत्र ठेवणाऱ्या वैचारिक, समाज प्रबोधनकारी क्रांतिकारकांनीच बाबासाहेबांच्या विचाराचा वारसा महाराष्ट्रच नव्हे तर देशभर पुढे चालविला. ग्रामीण भागातील जलसे, शाहिरी, लोकगीते या माध्यमातून प्रबोधनकारांनीच वामनदादांचा विचार जिवंत ठेवण्याचे काम केले आहे. साध्या सरळ सोप्या शब्दांमधून वामनदादांनी सर्वसामान्य माणसाच्या काळजाला हात घालत प्रबोधन, जागृती केली. असे विचार पत्रकार अरुण जैन यांनी स्थानिक हुतात्मा स्म ारक परिसरातील वामनदादा कर्डक यांच्या पुतळ्यासमोर जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाहीर डी.आर.इंगळे तर सभास्थानी उपस्थितांमध्ये सचिव तथा साहित्यिक सुरेश साबळे, ॲड सुमित सरदार, प्रा आर आर वानखेडे, पी आर इंगळे, अमोल खरे, मिलिंद वानखेडे, कुणाल पैठणकर, दामोदर बिडवे, अशोक दाभाडे, महेंद्र सावंग, भीमराव थोरवे, शिवाजी लहाने पंचफुलाबाई पगारे इत्यादी हजर होते. कार्यक्रमापूर्वी शहरातील गांधीभवन चौकातील साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जिल्हाभरातून आलेल्या विविध लोककलवंताची आणि उपस्थितीची रॅलीने कार्यक्रम स्थळी आगमन झाले. महापुरुष यांच्या प्रतिमा आणि वामनदादा कर्डक यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन आणि दीपप्रज्वलन करण्यात आल्यानंतर आयोजकांच्यावतीने अतिथीचे स्वागत करण्यात आले. प्रतिष्ठानचे सचिव तथा साहित्यिक सुरेश साबळे यांनी प्रास्ताविक भाषणात वामनदादा कर्डक यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त भूमिका मांडली.

कार्यक्रमास अनुरूप सुमित सरदार यांनी आपल्या भाषणात वामनदादा कर्डक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फोंडेशनच्या वतीने यावर्षी पासुन दरवर्षी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या नावाने रोख रूपये अकरा हजार पुरस्कार देण्यात येणार असून सन २०२५ या वर्षीचा पुरस्कार बुलढाण्याचे लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान देण्याचे घोषित करण्यात येत आल्याचे जाहीर केले. प्रा.आर आर वानखेडे, कुणाल पैठणकर, यांनी मनोगत मांडले. विजय वानखेडे मांडकेकर, संघपाल गवई, शाहीर फुलकर, भीमराव थोरवे, शिवाजी लहाने आणि विविध महिला मंडळ, गायन पार्ट्यांचा सहभाग होता. चांडोळ आणि दुधा गावच्या महिला मंडळानी भारूड आणि लोकगीते सादर केली. वाद्यवृंदात सुमित गवई, मुकुल मोरे, अमोल झनके, तुषार सरदार यांनी साद संगत केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे पत्राकार सिद्धार्थ आराख, विजय मोरे, सुदर्शन अहिरे, धम्मा गवई, मंगल मिसाळ मोहन सरकटे, संदीप मोरे, बबन गवई, गणेश कदम, मल्हारी गवई, रतन पवार यांच्यासह अनेक जणांनी हातभार लावला.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५

## थोडक्यात

### विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

**अमरावती :** मुलगा पाहिजे म्हणत विवाहितेचा छळ करीत पतीसह सासऱ्यांनी तिला घरातून बाहेर हाकलले. ही घटना तळेगाव ठाकूर येथे घडली. याबाबत विवाहितेने दिलेल्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी सासरच्या पाच जणांवर गुन्हा दाखल केला.

### जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**अमरावती :** शशीनगर येथे सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकत बडनेरा पोलिसांनी एकूण १६ हजार २४० रुपयांचे साहित्य जप्त करीत एकूण सहा जणांवर गुन्हे दाखल केले.

### घरासमोरून चोरून नेली चार चाकी

**अमरावती :** नागपूर येथून स्टँप पेपरवर लिखापढी करीत रोशन श्रीकृष्णराव खांडेकर (२९, रा.आसरा, ता. भातकुली) यांनी चार चाकी (एमएच ४९-बी २१४४) विकत घेतली. मात्र, अज्ञाताने ती घरासमोरून चोरून नेली. ही घटना असरा येथे घडली. याबाबत खांडेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून भातकुली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### कैद्याच्या बॅगेत मिळाले अंमली पदार्थ

**अमरावती :** अभिवचन रजेवरून कारागृहात परततेल्या जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्याच्या बॅगेत ६५ हजारांचे ५०० ग्रॅम अंमली पदार्थ आढळले. याबाबत वशिाल गौतम पराड (३१, रा. मुंबई) याच्याविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिसात गुन्हा नोंदवला.

### अडथळा निर्माण करणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल

**अमरावती :** गद्रे चौकात रहदारीस अडथळा निर्माण करीत रस्त्याच्या मध्ये कार (एमएच २७-डीयू २८६९) उभी करणाऱ्या प्रतिक सुभाष टेकाडे (३६) याच्यावर राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### उसणे पैशासाठी युवकाला काठीने मारहाण

**नांदगाव खंडेश्वर :** उसणे घेतलेले पैसे उशिरा दिल्यामुळे युवकाला शिवीगाळ करून त्याला काठीने डोक्यावर मारून जखमी केले. ही घटना इंदिरा नगर नांदगाव खंडेश्वर येथे १४ ऑगस्ट रोजी रात्री घडली. शंकर परविन ढोक (२१) असे फिर्यादीचे नाव आहे. आरोपी पुरूषोत्तम नारायण वाघोडे (६५) याच्याकडून शंकरने १०० रूपये मागितले होते. तेव्हा एक-दीड तासात पैसे परत दे असे आरोपीने म्हटले तेव्हा शंकरने म्हटले की, पैसे मी उद्या देतो या कारणावरून आरोपी पुरूषोत्तमने शिवीगाळ करून शंकरच्या डोक्यावर काठीने मारून जखमी केले. तसेच पैसे न दिल्यास जिवाने मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

### वीज पडून माजी पोलिस पाटलाचा मृत्यू

**अंजनगाव सुर्जी:** धामणगाव रेल्वे शनिवारी दुपारी संततधार पाऊस विजेचा कडकडाट व सुरू असताना मंदिरातून परतलेल्या एका ६८ वर्षीय माजी पोलिस पाटलाचा वीज पडून मृत्यू झाल्याची घटना ढाकुलगाव येथे दुपारी दोन वाजताच्या सुमारास घडली. सुदामराव शामरावजी ठाकरे असे मृत्यू पावलेल्या माजी पोलिस पाटलाचे नाव आहे ते दुपारी मंदिरात गेले होते घराकडे परतत असताना अचानक वीज कडाडली. ती वीजत्यांच्या अंगावर पडून त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा आप्त परिवार आहे.

# बोगस जॉब कार्डमुळे ६७१ घरकुल होल्डवर

## घरकुलाचे अनूदान प्राप्त, मजुरी मात्र रखडली | तीन महिन्यांपासून प्रतीक्षा, लाभार्थ्यांमध्ये संताप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** लाभार्थ्यांना घरकुलाचे अनूदान प्राप्त झाले मात्र मजुरी पैसे तीन महिन्यांपासून मिळाले नाही. केद्र शासनाकडे सदरचा निधी प्रलंबित असल्याने लाभार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. घरकूलमाध्ये लाभार्थ्यांनी बोगस जॉबकार्ड लावल्याने प्रशासनाकडून त्यांचे पैसे थांबविण्यात आले आहे.



पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना मजुरीचे अनुदान तीन महिन्यांपासून न मिळाल्याने संताप व्यक्त होत आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात या वर्षी ५२ हजारांवर घरकुल मंजूर झाले आहे. यावेळी अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ होऊन एकूण २ लाख १० हजार रुपयांचे अनुदान मंजुर आहे. यामधील २८ हजार रुपये मजुरीसाठी राखीव असून, ही रक्कम थेट मजुरांच्या खात्यात जमा केली जाते. मात्र, केंद्र शासनाकडून निधी मिळण्यात विलंब झाल्याने मे महिन्यापासून मजुरीचे अनुदान लाभार्थ्यांना मिळालेले नाही. हे अनुदान मनरेगा विभागाअंतर्गत वितरित केले जाते. मजुरीचा हप्ता कधी मिळणार? असा प्रश्न आता लाभार्थ्यांकडून वारंवार उपस्थित केला जात आहे. घरकुलाचे बांधकाम पुर्ण झाले असताना आता मजुरीकरिता लाभार्थ्यांकडू मंजुराकडून तकादा लावल्या जात आहे. तर काही लाभार्थ्यांचे घरकुलांचे बांधकाम मंजुरी अभावी रखडले आहे. त्यामुळे संबंधित विभागाकडून तातडीने कार्यवाही करून थकलेली रक्कम वितरित करण्याची मागणी होत आहे.

### बोगस जॉबकार्ड लावण्याऱ्यांची होणार चौकशी

शासनाकडून ग्रामीण भागात लाभार्थ्यांना घरकूल योजना चालू आहे. ज्या लाभार्थ्यांना घरकूल मिळाले अश्या लाभार्थ्यांना एका घरकूलासाठी तीन जनांचे जॉबकार्ड लावावे लागते. मात्र घरकूल लाभार्थ्यांनी बोगस जॉबकार्ड लावले आहे. हा प्रकार शासनाच्या लक्षात आल्यावर याबाबत सखोल चौकशी करून ज्या लाभार्थ्यांनी बोगस जॉबकार्ड लावले अश्या लाभार्थ्यांचे घरकूलाचे जॉबकार्डवरील हफ्ते थांबविण्यात आले आहे. त्यामुळे आता बोगस जॉबकार्ड लावणाऱ्यांची सुद्धा चौकशी केली जाणार आहे.

### जिल्ह्यातील ६७१ घरकुल थांबविले

एकाच व्यक्तीने दोन ठिकाणी जॉब कार्ड लावल्याचे निदर्शनास आल्याने जिल्ह्यातील ६७१ घरकुल थांबविण्यात आले आहे. शासनाकडून जिल्हा ग्रामिण विकास यंत्रनेकडे तशी यादी पाठविण्यात आली आहे. परंतु डुप्लीकेट जॉब कार्ड हटविण्याकरिता जिल्हास्तरावर लॉगिंगमण्ये पर्याय नसल्याने याबाबत शासनाकडे मागदर्शन मागविण्यात आले आहे.

# प्रवासी ऑटोने गांजाची वाहतूक : दोघांना अटक

## दोन किलो गांजा जप्त, स्थानिक ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अचलपूर, दि. १८ :** प्रवासी ऑटोने गांजाची वाहतूक करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून २ किलो गांजा व ऑटो जप्त करण्यात आला आहे.

मुख्तार ऊर्फ मुस्तफा खान मंजूर खान (२८) रा. जोगीपुरा अचलपूर, शेख नासीर शेख युसूफ (२२) रा. हिरापुरा अचलपुर अशी अटक आरोपींची नावे आहेत. गुन्हेशाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पोलिसांनी चांदूरबाजार नाका, आसेगाव पूर्णा येथे नाकाबंदी केली असता एक ऑटो येतांना दिसला. त्याला थांबवून त्याची पाहणी केली असता ऑटोत समोरील सिटवर दोन इसम बसून दिसले. दोन्ही




इसमांना त्यांची चौकशी करीत पंचासमक्ष झडती घेतली असता मुख्तार ऊर्फ मुस्तफा खॉ मंजूर खाँ याच्या हातात असणाऱ्या बॅगमध्ये २ किलो ८५ ग्रॅम गांजा किंमत ४१ हजार ७०० मिळून आला. दोन्ही आरोपींना सदर गांजा मालाबाबत विचारपुस केली असता त्यांनी दोघांनी मिळून सदर गांजा अमरावती येथून आणला असून अचलपूर येथे चिल्लर विक्रीकरिता घेवून असल्याचे जात सांगितले.

त्यांच्याकडून गांजा आणि बजाज कंपणीचा तीनचाकी प्रवासी ऑटो क्र. एम एच २७ बी डब्ल्यू ७९६० असा एकूण २ लक्ष ४१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपीविरुध्द पो. स्टे. आसेगाव पूर्णा येथे अमली पदार्थ कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास आसेगाव पूर्णा पोलिस करीत आहे.



नेरपिंगळाई- विदर्भात प्रसिद्ध असलेल्या पिंगळाईदेवी गढावर भाजपाचे ज्येष्ठ नेते पद्माकरराव पाखोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पिंगळादेवी संस्थांचे अध्यक्ष विनित पाखोडे, सागर सवढे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# २९ गावांतील ३९२० हेक्टर पिके पाण्याखाली

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या पावसामुळे २९ गावांतील ३९२० हेक्टर पिके पाण्याखाली आली आहे. शिवाय १८ गावांतील ३२१ घरांची पडझड झाली असून धामणगाव रेल्वे तालुक्यात ४ जनावरांचा मृत्यू झाला तसेच ३३ हेक्टरवरील जमिन खरडून गेली आहे. चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, धामणगाव तालुक्यांना पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे.

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अहवालातून समोर आले आहे. एकूण २९ गावांतील ३९२० हेक्टर क्षेत्र पावसामुळे



बाधित झाले असून, सोयाबीन व तूर ही पिके सर्वाधिक प्रभावित झाली आहेत. अमरावती जिल्ह्यात सरासरी १०.३ मिमी इतका पाऊस नोंदवला गेला. यामुळे मोशी, चांदूर बाजार व धारणी तालुक्यांमध्ये पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मोर्शी तालुक्यात ५ गावांतील ११० हेक्टर क्षेत्र, तर धारणी तालुक्यात २ गावांतील १.१० हेक्टर क्षेत्र बाधित झाले. चांदूर बाजार तालुक्यात तब्बल २२ गावांतील ३८०९ हेक्टर क्षेत्रावर पिकांचे मोठे नुकसान झाले असून ३३ हेक्टर क्षेत्रात जमिन खरडून गेली आहे. जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यातील दोन बैल, एक गाय व एक वासरु अशी एकूण ४ जनावरे मृत्यूमुखी पडल्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यात एकूण १८ गावांमध्ये ३२१ घरे बाधित झाली असून, त्यापैकी ५० घरे पूर्णपणे कोसळली आहेत. सर्वाधिक घरांचे नुकसान चांदूर रेल्वे तालुक्यात झाले आहे. जिल्हा प्रशासनाने बाधित भागांची पाहणी करून मदत कार्य सुरू केले असल्याचे सांगण्यात आले आहे. शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी पंचनामे करण्यात येत असून नुकसानग्रस्तांना तातडीची मदत देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तिवसा :** वरखेड येथील युवकाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवार १६ ऑगस्ट रोजी दुपारी ५ वाजता दरम्यान उघडकीस आली. शुभम दिलीप बोके (२८) असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. तो मिस्त्री कामगार होता. तिवसा पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदन करीता उपजिल्हा रुग्णालय तिवसा येथे पाठविणयात आले आहे. शुभमच्या आत्महत्या करण्याचे कारण कळू शकले नाही.

# तिवसातील अतिवृष्टीचा खासदारांनी घेतला आढावा

## गावोगावी व शेत शिवारात दिल्या भेटी | प्रशासनाला दिले तातडीने पंचनामा करण्याचे निर्देश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**तिवसा, दि. १८ :** अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंतराव वानखडे यांनी आज तिवसा तालुक्यात शनिवार १६ ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे, व शेतमालाचे नुकसानीची पाहणी केली.

नदीकाठी वसलेल्या गावांचा दौरा करत त्यांनी नदीकाठी असलेल्या शेतीचे झालेले नुकसान प्रत्यक्ष बघून शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. सोबतच जिल्हाधिकारी, तहसीलदार तिवसा, कृषी विभाग व वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याच क्षणी दौऱ्या दरम्यान पंचनाम्यामध्ये जास्तीत जास्त नुकसान झाल्याची माहिती शासनाकडे पाठवून शेतकऱ्यांना भरीव व तातडीची मदत मिळावी अशा अनुषंगाने अहवाल तयार करण्याबाबत निर्देशित केले. यावेळी खासदार बळवंत वानखडे यांनी तिवसा शहरातील पिंगळाई नदी परिसर, शेंदूरजना बाजार, जाफरापूर, मोझरी, अनकवाडी, रघुनाथपूर, मालधुर, वाठोडा शेत शिवार, डेहनी, निंभोरा, भांबोरा, वरखेड, तारखेड या गावांना भेटी देत, बळवंत वानखडे यांनी तालुक्यातील सहकार व स्थानिक





स्वराज्य संस्थेच्या आजी माजी पदाधिकाऱ्यांसह सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यांच्यासह घरात पाणी शिरलेल्या कुटुंबाच्या सुद्धा भेटी घेतल्या, त्याचप्रमाणे पोखरा योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या गावांमध्ये बांधबंधिस्ती करण्यात यावी याच्या उपाययोजना असल्याने यासंदर्भात तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या बाबत सरपंच,सचिवांना सूचना दिल्या.

तिवसा -शेंदूरजना बाजार रोडवरील शेतामध्ये प्रचंड पावसाचे व नाल्याचे पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागाच्या संबंधित या उपायोजना करावयाच्या आहेत त्याबाबत बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून या संदर्भात पत्रव्यवहार करण्याच्या अनुषंगाने सकारात्मक पाऊले उचलली. तहसीलदार तिवसा यांच्याकडून झालेल्या नुकसानीची माहिती खासदार बळवंत वानखडे यांनी घेतली. पालवाडी गावामध्ये साचलेल्या पाण्यामुळे गावकऱ्यांची तारांबळ उडाली त्याबाबतीत त्यांनी ग्रामविकास अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. निवडणुकीपूर्वी मंजूर झालेल्या पानंद रस्त्याचे सुरू न झालेल्या कामांमुळे निंभोरा येथील शेतकऱ्यांनी प्रशासन व शासनाविरोधात खासदार महोदयांकडे नाराजी व्यक्त केली. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुरेश साबळे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष सुरेश मेटकर, तालुका कॉंग्रेस कार्याध्यक्ष वैभव स. वानखडे, अभिजीत बोके, प्रदीप बोके, बाजार समिती सभापती रवी राऊत, शहर कॉंग्रेस अध्यक्ष सेतू देशमुख, कार्याध्यक्ष सुनील बाखडे, किशोर दिवे, शरद वानखडे, गजानन अळसपुरे, मुकुंद पुनसे,जसबीर ठाकूर, सतीश पोजगे, लोकेश केने, दीपक सावरकर, जितेंद्र चौधरी, किशोर चौधरी, बाळासाहेब घुरडे, सिद्धार्थ खांडेकर, मारोतराव वाघमारे, वैभव ढवळे, प्रफुल उमप, नरेंद्र विघ्ने, किसन मुंदाने, योगेश वानखडे, प्रणव गौरखडे, प्रमोद वानखडे, नितीन मेहकरे, संजय चौधरी, विशाल सावरकर, अजिंक्य चौधरी, हरिदास भगत, अतुल खुळे, सुनील राऊत, प्रफुल गंधे, गजानन भोंबे, प्रफुल वानखडे, दिनेश वानखडे, अनिल चोरे, पंकज कळंबे, राजू देशमुख, दिवाकर भुरभुरे, सरपंच सुरज धुमनखेडे, सचिन वानखडे, देवदत्त खोंडे, परीक्षेत बोके, अनिकेत तालन, वैभव बोके, सागर राऊत, वैभव काकडे, अनंत शेंद्रे, तुषार लेवटे, अनिकेत प्रधान, गौरव चौधरी, किशोर गोरडे, चंद्रशेखर ढगे, गजानन गोरडे, नरेंद्र थोटे, बबनराव पुनसे, नामदेवराव तांबे, सुयोग कांडलकर, आशिष बायस्कर, नरेंद्र साबळे, प्रशांत साबळे, दिनेश खरबडे, योगेश साबळे, संजय इंगळे, राजिक शेख, ज्ञानेश्वर गहूकर, यादवराव मुंद्रे, मनोज वाढोनकर, निलेश डागा, रोहन वानखडे, सरजा वाघमारे, या नुकसानग्रस्त भागाचा दौऱ्यादरम्यान शेकडो शेतकरी, कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### बँक खात्यातून पैसे लंपास

**वरूड :** वरुड स्टेट बँक शाखा, जरुड येथील एका ग्राहकाच्या खात्यातून ४६ हजारांची रक्कम काढून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी वरूड पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. जरूड येथील रहिवाशी राहुल वानखडे यांचे वरुड स्टेट बँक शाखेत खाते आहे. त्यांचा मोबाईल बंद पडल्याने ११ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता जियोचे सिम बंद पडल्याने त्याकरीता आधार कार्ड अपडेड केल्याशिवाय सिमकार्ड चालु होत नसल्याने त्यांनी ते अपडेट केल्यानंतर १२ ऑगस्ट रोजी त्यांच्या खात्यातून उपरोक्त रक्कम कपात झाल्याचे त्यांना कळाले. याविषयी बँकेत जावून चौकशी केली असता बँकेने त्यांचे खाते बंद केले आहे. परंतु सदर्दू प्रकार अज्ञात इसमाने केलेला असावा, असा माझा संशय असल्याने याप्रकरणी त्यांनी पोलिसांत तक्रार केली आहे.

### शिंदी येथे भरदुपारी घरफोडी

**पथ्रोट :** येथील पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या वडनेर भुजंग व शिंदी येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करीत एकूण ६२ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत प्राप्त फिर्यादीवरून पथ्रोट पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवला. दोन दिवसात घडलेल्या या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अंजनगाव सुर्जी येथील रहिवाशी आकाश बुंदेले (३६) यांचे वडनेर भुजंग शिवारात शेत आहे. त्यात एक टिनपत्र्याची झोपडी आहे. त्यात त्यांनी शेती साहित्यासह अन्य काही सामान ठेवले आहे. अज्ञात चोरट्याने झोपडीच्या कुलूपाची साखळी तोडून एकूण ११ हजारांचे साहित्य चोरून नेले. याबाबत त्यांनी पथ्रोट पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला. घरफोडीची दुसरी घटना शिंदी येथे घडली. गावातीलच वृद्ध फिर्यादी लताबाई इंगोले (६६) या नेहमीप्रमाणे मजुरीच्या कामासाठी गेल्या. तत्पुर्वी त्यांनी घराला कुलूप लावून त्याची चाबी घराच्याच ओसरीत ठेवली. एका परिचिताने ती चाबी घेवून कुलूप उघडत घरात प्रवेश केला. कपाटात ठेवलेला एकूण ५१ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

### शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. १५ ऑगस्ट ते दि. २९ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी कळविले आहे.

### इमारतीवर चढून उडी मारण्याचा प्रयत्न

**अंजनगाव सुर्जी :** येथील पंचायत समितीच्या इमारतीला १४ ऑगस्टपर्यंत संत गाडगे बाबा प्रशासकीय इमारत असे नाव देण्यात यावे, अशी मागणी काही शहरवासियांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली होती. अन्यथा १५ ऑगस्ट रोजी त्याच इमारतीवर चढून उडी मारण्याचा इशारा दिला होता. प्रशासनाच्या विनंतीकडे लक्ष देता इमारतीवर चढणाऱ्या आंदोलकांवर अंजनगाव सुर्जी पोलिसांनी गुन्हे दाखल केले.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेवर सायबर हल्ला

## तातडीने सुरक्षात्मक उपाययोजना : संचालक मंडळाच्या बैठकीत तातडीचे निर्णय

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व्हरवर सायबर अटॅक झाल्याचे समोर आले आहे. या हल्लयातून महत्त्वाची माहिती व डेटा लीक होण्याचा धोका निर्माण झाल्याने बँकेने तातडीने सर्व शाखांना सावध केले आहे. याच पार्श्वभुमिवर शनिवारी संचालक मंडळाची तातडीची बैठक बोलावून उपाय योजना करण्याबाबत काही निर्णय घेण्यात आले आहेत. बँकेच्या मुख्यालयातील डेटा सेंटरवर झालेल्या या हॅकिंग प्रकरणी पी.सी. वरून काही धोकादायक फाइल्स




तयार झाल्याचे आढळले. या माध्यमातून बँकेच्या नेटवर्कची माहिती बाहेर जाण्याची शक्यता असल्याचे सायबर सुरक्षा तज्ज्ञांचे म्हणणे आहे. सदर घटना लक्षात आल्यानंतर बँकेने कर्टिन व नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर (एआसी) यांच्याशी संपर्क साधला असून, त्यांच्याकडून आवश्यक ती मदत घेण्यात येत आहे. तातडीच्या उपाययोजनांत सर्व्हर वेगळे करण्यात आले असून बँकेची ऑनलाइन प्रणाली सुरळीत करण्यासाठी तांत्रिक उपाय राबविण्यात येत आहेत. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीच्या उपाय योजनाकरिता लागणाऱ्या खर्चाची मंजूरी व अन्य तातडीच्या उपाय योजनांकरिता शनिवारी संचालक मंडळांची बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत विरोधकातील ११ संचालकांनी देखील या निर्णयाला तातडीने मान्यता देत सायबर अटॅक रोखण्यासाठी सर्तकता बाळगणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे विरोधकांनी कौतुक केले.

### सायबर सुरक्षेसाठी बँकेने घेतलेले निर्णय

सेंट्रलाइज अँटी व्हायरस सिस्टम, फायरवॉल प्रणाली मजबूत करणे, अॅडपॉइंट डिटेक्शन सेवा, डेटा लॉस प्रिव्हेंशन (डीएलपी) तंत्रज्ञान पीन पॅन सेवा, सायबर सिक्युरिटी ऑपरेशनल सेंटर आदी आदी सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाय योजना करण्याचे निर्णय घेण्यात आलेत. तसेच बँकेच्या सर्व शाखांना विशेष सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून कोणतेही संशयास्पद मेल अथवा फाइल उघडू नये, अशी माहिती देखील देण्यात आली आहे.

### संगणक समितीवरून बैठकीत वादंग

बँकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाची असलेल्या संगणक समितीचा मुद्दा संचालक हरीभाऊ मोहोड, रविंद्र गायगोले यांनी उपस्थित केला असता, सीईओंनी देखील चुक झाल्याचे मान्य केले. परंतु उपाध्यक्ष व पिठासीन अधिकारी अभिजित ढेपे यांनी मात्र यावर चर्चा करण्यास नकार देत विषय बदलविला. त्यामुळे विरोधकातील खा. बळवंत वानखडे, वीरेंद्र जगताप यांनी सदर विषयावर आपले मत व्यक्त केले.

## कोणत्याही परिस्थितीत कधीही हार मानू नका : अमोल चवणे

- हरिकिसन मालू विद्यालयात 'पिस कॉर्नर' चे उदघाटन
- रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाचा उपक्रम



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** स्पर्धेच्या युगात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर ताण वाढला आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी पिस कॉर्नर (शांतता कोपरा) खूप महत्वाचा झाला आहे. विद्यार्थ्यांनी ताणतणाव कमी करून तसेच भावनांवर नियंत्रण ठेवून आलेल्या परिस्थितीला सामोरे जावे मात्र कोणत्याही परिस्थितीत कधीही हार मानू नये असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाचे अध्यक्ष अमोल चवणे यांनी केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाच्यावतीने हरिकिसन मालू विद्यालयात 'पिस कॉर्नर' ची स्थापना करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. सर्वप्रथम त्यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्ति गित, नृत्य सादर करुन मान्यवरांची दाद मिळावीली. यासोबतच बडनेरा येथील गांधी मराठी प्रायमरी शाळेत ध्वजारोहन तसेच मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्याचबरोबर बडनेरा न्यु टाऊन येथील शहिद स्मारक २ समिती व बडनेरा स्टुडंट कॉन्फरंसच्या सहकार्याने गरजू व्यक्तिंना आत्मनिर्भर बनविण्यासाठी शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. यावेळी क्लबचे सचिव डॉ.पूजा कोल्हे, राम छुटलानी, सुरेश मेठी, रोहित अग्रवाल, संजय बोरोडे, अमित तिडके, दिलीप कौस्किया, आर.आर.खंडेलवाल, अमित तिडके,अखिलेश खेतान, गौरव वानखडे, स्वप्निल करवा, निलेश खंडेलवाल, अक्षय पेठे, डॉ.प्रवीण बोडखे, नीता कौस्किया, अॅड. रोहिनी चवणे, पायल करवा, श्वेता खेतान, श्रुतिका पेठे यांच्यासह हरिकिसन मालू व गांधी शाळेतील शिक्षक पौर्णिमा सुरजे, विजया शीरभाते, जयश्री गवळी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधार्यांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## तिरंग्याच्या साक्षीने बेनोडा परिसरात बाईक रॅली दणदणली

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बेनोडा, दि. १८ :** देशाच्या स्वातंर्त्याचा अमृतमहोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी बेनोडा येथे स्वातंर्त्य दिनानिमित्त भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे आयोजन संदीपभाऊ वासनिक व अखिल माकोडे मित्रपरिवार यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

रॅलीची सुरुवात बेनोडा येथील शाहिद स्मारकाजवळून झाली. त्यानंतर नागझरी, जामगाव, खडका या प्रमुख मार्गावरून होत माणिकपरू येथील शाहिद पंजाब जणिरामजी उईके स्मारक येथे



रॅलीचा समारोप करण्यात आला. दादाजी दरबार खडका कडून रॅली मध्ये सहभागी झालेल्या तरुणांनकरीता अल्पआहारराची वेवस्था केली गेली होती. देशभक्तीपर घोषणाबाजी, तिरंगा पताका आणि मोटारसायकलींवर लावलेले देशभक्तीपर फलक यामुळे परिसरात वातावरण भारावून गेले होते. या रॅलीमध्ये हृष्टष्ट स्कॉड चे युवक उत्साहाने सहभागी झाले होते. सोबतच बेनोडा पोलीस स्टेशन ने सुद्धा आपला सहभाग या रॅलीमध्ये दर्शवला असून तरुणांना वेसनमुक्त राहण्याचा संदेश ठाणेदार विवेक देशमुख यांनी दिला. मार्गभर ठिकठिकाणी ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत करून देशभक्तीचे वातावरण उंचावले. या उपक्रमाद्वारे युवकांनी बलिदान दिलेल्या शहीदांचे स्मरण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. रॅलीच्या माध्यमातून ऐक्य, देशप्रेम आणि शहीदांविषयी आदरभाव जागृत करण्याचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी विनय फरकाडे, विवेक देशमुख, सरपंच बेनोडा रजनी अशोक कुबडे, उत्तम पाटोडे, डॉ नारायण फरकाडे, दीपक फरकाडे, सौ. प्रतिभा ना. फरकाडे, ज्ञानेश्वर इगोले, प्रदीप पुंड, सुभाष कदम, अरुणा फरकाडे, गजानन फरकाडे, किशोर नागले, रतीराम दुर्वे विलास कुर्शीगे, उपस्थित होते.

## देशीदारू विक्रेत्यांवर पोलिसांची धाड

**अमरावती :** शहरात वेगवेगळ्या ठिकाणी देशी दारूची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाडी घाली आरोपींनी ताब्यात घेत मुद्देमाल हस्तगत केला. संजय गांधी नगर नं. दोन येथून प्रशांत अशोक रणवीर याला ताब्यात घेत त्याच्याकडून ८८० रूपयांच्या देशी दारू बॉटल्स जप्त केल्या. कुंभारवाडा येथून बाबुलाल हसन रायलीवाले याच्या ताब्यातून ५ हजार ४०० रूपयांची २७ लीटर गावठी दारू जप्त केली. फ्रेजरपुरा पोलिसांनी ही कारवाई केली. पुढील तपास पोलीस करीत आहे.

## मातृ सेवा मुलींचे वस्तीगृह येथे रक्षाबंधन सण साजरा

**अंजनगांव सुर्जी, दि. १८ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था व्दारा संचालित,मातृसेवा मुलींचे वस्तीगृह, वानखडे पेठ, सुर्जी अंजनगाव येथे दि.९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन हा भाऊ बहिणीचा सण मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. मातृसेवा मुलींचे वस्तीगृह हे आदिवासी मुलींचे वस्तीगृह असून येथे दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी राहतात. त्यामुळे भावाला राखी बांधण्यासाठी गावी जाऊ न शकल्याने काही अंतरावर असलेले कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे मुलांचे वस्तीगृह आहे हे संस्थेच्या सदस्या रोहिणी आठवले यांच्या लक्षात येताच त्यांनी तेथील अधीक्षकांसोबत भेटू घेऊन भाऊ बहिणीचा पवित्र नात्यांच्या या सणाला विद्यार्थीना आपल्या वस्तीगृहात बोलावून त्यांच्या हाताला राख्या बांधून रक्षाबंधन हा सण मोठा आनंदाने साजरा केला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा प्रा. डॉ.सुजाताताई आठवले संस्थेचे सचिव गुणवंत वानखडे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबाराव वानखडे होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी आठवले यांनी केले तर आभार प्रदर्शन विलास धांदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मातृसेवा मुलींचे वस्तीगृहाच्या अधिक्षीका पूजा देशमुख , कर्मचारी विलास धांडे, शिला बोबडे यांनी सहकार्य केले.

## विनयभंग प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. १८ :** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील दहीगाव रेचा येथील लिंग पिसाट असलेला मोहन उर्फ पिंटू हरिभाऊ धामोळे याने धाडी शेत शिवारात कामाला गेलेल्या महिलांसमोर आंतरवस्त्र काढुन विचीत्र हावभाव व ईशारे करुन विनयभंग केला असता महीलांचे वतीने पोलीस स्टेशन अंजनगाव येथे तक्रार दाखल करण्यात आली,पोलिसांनी मिळालेल्या तक्रारीवरून आरोपीला अटक करुन विनय भंगाचा गुन्हा दाखल केला.

सविस्तर माहिती अशी की, दहिगाव रेचा येथील रहिवासी लिंग पिसाट मोहन धामोळे वय वर्ष ४५ याने दिनांक १२ ऑगष्ट रोजी सकाळच्या सुमारास पीडित महिला व तिच्यासोबत असलेल्या तीन महिला सुभाष ताडे यांच्या धाडी येथील शेतात पराटी निंदन करायला गेल्या असता १० वाजताच्या सुमारास आरोपी हा शेतात येऊन काम करीत असलेल्या महीलां जवळ येत अंगावरील कपडे व अंतरवस्त्र काढत विचीत्र अंगविक्षेप करीत आरोपीने पीडिता व तीन महिलांना अश्लील हातवारे व लज्जा निर्माण होईल असे बोलून त्यांचा विनयभंग केला.

यापुर्वी सुद्धा आरोपी मोहन याने तक्रारदार महीलेच्या महिलेच्या मागे लागून घरासमोर जाऊन ती घरी एकटी पाहून अश्लील इशारे हातवारे व शरीर सुखाची मागणी केली होती. मात्र पिडीत महीलेने समाजात बदनामी होईल म्हणून आरोपीविरुद्ध पोलीसात तक्रार दाखल केली नाही.मात्र आरोपीच्या स्वभावात फरक पडला नाही, मात्र घटनेच्या दिवशी स्त्री लंपट व लिंग पिसाट मोहन उर्फ पिंटू धामोळे याने मर्यादा ओलांडून पीडिता व इतर महीलांसमोर लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले त्यामुळे पीडित महिलेने अंजनगाव पोलीस स्टेशन गाठून जबानी तक्रार दाखल केली.

महीलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करुन आरोपीला अटक केली, त्याला न्यायालयात हजर केले असता १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.सदर घटनेत आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करून ४८ तासाच्या आत दोषारोप पत्र तयार करण्यात आले.

## अमली पदार्थ विरोधी दिनी मोटर सायकल रॅली द्वारे जनजागृती




दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**खोलापुर, दि. १८ :** स्थानिक पोलीस स्टेशन मध्ये स्वातंर्त्यदिनानिमित्त ठाणेदार सुलभाताई राऊत यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आल्यानंतर अमली पदार्थ विरोधी दिन म्हणून मोटरसायकल रॅली गावाच्या मुख्य रस्त्यावरून काढून जनजागृती करण्यात आली. अमली पदार्थाला युवा पिढी बळी पडू नये. अमली पदार्थाने होणारे दुष्परिणाम याविरुद्ध संदेश देण्यात आला. ही जनजागृती मोटरसायकल रॅली ठाणेदार सुलभाताई राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आले असून रॅलीत पोलीस अधिकारी ,पोलीस कर्मचारी, महिला पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंजनगाव बारी परिसरात पिकांचे नुकसान

## पार्डी देवी येथील रेल्वे भुयारी मार्ग पूर्णपणे जलमय | गावाचा संपर्क टुटला, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. १८ :** गेल्या १२ दिवसांच्या उघडीपनंतर दिवभरापासून जिल्हासह परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली असुन त्यामुळे पिकांना जीवनदान मिळाले असून संततधार पावसामुळे अंजनगाव बारी परिसरातील तलाव, नाले, ओढे दुथडी भरून वाहत असुन बळीराजा सुखावला असुन बऱ्याच दिवसांपासून करपणाऱ्या उभ्या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. अंजनगाव बारी लगतच्या पार्डी देवी येथील रेल्वे भुयारी अंडरपास मार्ग पुर्णपणे जलमय झाला आहे. या नाल्यामध्ये अंजनगाव बारी पासून येणारे लहान मोठ्या नाल्याचे पाणी वाहत असल्याने साचल्याने पाण्याचा विसर्ग वाढला आहे. त्यामुळे जनजीवन ठप्प झाले असुन सभोवतालच्या पाच गावांचा संपर्क तुटला आहे. यामध्ये पार्डी मार्गावरील उदखेड, अऱ्हाड -कुऱ्हाड, वडगांव जिरे (रायघोळ नदीला पूर आला), तसेच तालुक्यातील चांदूर रेल्वे मालखेड रेल्वेसह असंख्य गावांचा संपर्क टुटल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



### खोलापूर परिसरात जनजीवन विस्कळीत

**खोलापूर :** जोरदार मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने काही काळ ठप्प होती मोटर सायकल चालकांनी कुटुंबास पाण्याच्या बचावासाठी आश्रय घेतला. तर गावातील रस्ते नाले तुडुंब पाण्याने भरल्याने नागरिकांना रहदारीसाठी मोठी समस्या निर्माण झाली. कोल्हापूर परिसरात गत तीन ते चार दिवसापासून सतत मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने परिसरातील शेती पिके पाण्याखाली आले. तूर पराठी सोयाबीन मोठा प्रमाणात या पिकांचा पेरा असल्याने सततच्या पावसाने धोका निर्माण होण्याची



शक्यता नाकारता येत नाही.

त्यातच नागरिकांना या भुयारी मार्गाने जिवघेणा प्रवास करावा लागत असुन रेल्वे प्रशासन उड्डाण पूलांची मागणी फेटाळल्याने या मार्गावर कायमस्वरूपी तोडगा कधी निघेल हा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील २४ तासात जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी गडगडाटी वादळे, विजांच्या कडकडाटासह व सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाची संततधार (४०-५० किमी प्रतितास वेगाने) जोरदार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### विरुड रोंघे अंजनसिगी, तलेगांव जलमय, रस्त्यांवरून नदीसारखे पाणी, शेती व घरांचे नुकसान



**धामणगाव रेल्वे :** येथे मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे संपूर्ण गाव जलमय झाले आहे. गावातील मुख्य रस्ते, गल्लीबोळ पाण्याखाली गेले असून रस्त्यांवरून नदीसारखा पाणीप्रवाह सुरू आहे. पाण्याचा हा वेग एवढा जास्त आहे की वाहनांची ये-जा ठप्प झाली आहे.

पावसाच्या पाण्यामुळे अनेक शेतजमिनीत पाणी साचले असून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषत- सोयाबीन व कापूस पिकांवर पाण्याचा परिणाम होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटात भर पडली आहे. काही घरांमध्ये पाणी शिरल्याने कुटुंबांना घराबाहेर जावे लागले आहे. गावातील पाण्याची पातळी वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. स्थानिक प्रशासनाने पाणी ओसरेपर्यंत नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले असून, नुकसानग्रस्त ठिकाणांचा पंचनामा सुरू केला आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, अशा प्रमाणात पाणी साचण्याची घटना यापूर्वी क्वचितच घडली होती. पावसाचा जोर कायम राहिल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तसेच अंजानसिंगी ,तलेगांव,धामनगांव तालुक्याला फटका बसला आहे. धामणगाव रेल्वे तालुक्यातील अंजनस्गिी परिसरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात पाऊस झाला त्या पावसामुळे शेतकऱ्यांचा प्रचंड नुकसान झालेला आहे नदीकाठी असणाऱ्या गजानन पुनसे गंगाधर पुनसे रवींद्र पुणसे ज्ञानेश्वर वैद्य असे अनेक नदीकाठी असणाऱ्या शेतकऱ्यांचे शेतामध्ये नदीचं पाणी जाऊन नैसर्गिक आपत्ती झालेली आहे महाराष्ट्र सरकारने लवकरात लवकर पंचनामे करून सर्व शेतकऱ्यांना एकरी चाळीस हजार रुपये जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करण्यात यावी अशी क्रांतिकारी शेतकरी संघटनेची मागणी आहे.

# राज्याच्या जडणघडणीत वसंतराव नाईकांचा मोलाचा वाटा

## पालकमंत्री संजय राठोड; पुसद येथे वसंतराव नाईक कृषी गौरव पुरस्काराचे वितरण; प्रयोगशील शेतकरी व कृषी शास्त्रज्ञ सन्मानित

**यवतमाळ, दि.१८ प्रतिनिधी**



वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांचा विकासाचा केंद्रबिंदू शेतकरी हाता. शेतकऱ्यांना समोर ठेऊन ते धोरण आखायचे. त्यांना सुखी संपन्न करण्यासाठी त्यांनी वेगवेगळी धोरणे आणली. शेती, सिंचन, वीज, उद्योग असे राज्याच्या विकासासाठी त्यांनी सर्वांगीण काम केले. राज्याच्या जडणघडणीत त्यांचा अतिशय मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले.

बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद येथे वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित वसंतराव नाईक कृषी गौरव पुरस्कार वितरणप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्री बोलत होते. कार्यक्रमास पुरस्कार वितरण सोहळा समितीचे स्वागताध्यक्ष तथा राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आ. बाबूसिंग महाराज, आ. किसन वानखेडे, माजी आमदार डॉ. संदीप धुर्वे, विजय खडसे, नीलय नाईक, ख्वाजा बेग, महाराष्ट्र राज्य हाउसिंग फायनान्स कार्पोरेशनचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष ययाती नाईक, डॉ. टी.सी.राठोड, दीपक आसेगावकर, ॲड. आशीष देशमुख, महंत जितेंद्र महाराज, धनंजय सोनी आदी उपस्थित होते. शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी नाईकांनी चार कृषी विद्यापीठे निर्माण केली. दुष्काळाच्या काळात अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेसाठी मोठे काम केले. शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न देणारे बियाण्यांचे संकरित वाण त्यांनी आणले. पालकमंत्री पुढे बोलताना म्हणाले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा विस्तार नाईकांनी केला. प्रत्येक शेतकऱ्यास सिंचनासाठी वीज उपलब्ध झाली पाहिजे, अशी त्यांची भूमिका असल्याचे औष्णिक वीज प्रकल्पांना त्यांनी चालना दिली. कापूस खरेदीत शेतकऱ्यांची होणारी लूट थांबविण्यासाठी कापूस एकाधिकार योजना राबविली. त्यांनी अनेक सिंचन प्रकल्प सुरू केले. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्यासाठी बाजार समित्या निर्माण झाल्या पाहिजे, अशी भूमिका त्यांनी घेतली. आजचा दिवस त्यांचा स्मृतीदिन तर आहेच, त्यांच्या विचारांना आचरणात आणण्याचा दिवस देखील असल्याचे पालकमंत्री म्हणाले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना राज्यमंत्री इंद्रनील नाईक म्हणाले, वसंतराव नाईक यांना पाऊस फार आवडायचा. त्यामुळेच त्यांनी मुख्यमंत्री असताना मुख्यमंत्री निवासस्थानाचे नाव 'वर्षा' असे ठेवले. त्यांनी राज्यात हरितक्रांती आणली, धरणे बांधले, रोजगार हमी योजना सुरू केली, पंचायतराज व्यवस्था निर्माण केली. सुधाकर नाईक यांच्या संकल्पनेतून वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान सुरू झाले. या प्रतिष्ठानच्यावतीने आतापर्यंत ५८५ शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला असल्याचे इंद्रनील नाईक म्हणाले. यावेळी आ. बाबूसिंग महाराज व माजी आमदार नीलय नाईक यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

### वसंत वैभव स्मरणिकेचे प्रकाशन

सुरुवातीस वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पालकमंत्री व अन्य मान्यवरांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या कार्यावर आधारित 'वसंत वैभव' या स्मरणिकेचे प्रकाशन पालकमंत्री व मान्यवरांच्या हस्ते झाले. प्रा. दिनकर गुल्हाने यांनी स्मरणिकेचे संपादन केले. कार्यक्रमाचे संचलन डॉ. माधवी गुल्हाने व प्रा. संजय चव्हाण यांनी केले. प्रा. गोविंद फुके यांनी आभार मानले. कार्यक्रमास शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेतकरी, कृषी शास्त्रज्ञांचा पुरस्काराने गौरव

पालकमंत्री संजय राठोड व मान्यवरांच्या हस्ते शेती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्याच्या विविध भागातील प्रयोगशील शेतकरी व कृषी शास्त्रज्ञांचा वसंतराव नाईक कृषी गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यात विनोद संपतराव तोडकर कासेगाव, जि.सांगली, जनार्दन संतराम अडसूळ तरडगाव, जि. सातारा, रमाकांत काशिनाथ बागूल कुसुंबा, जि.धुळे, वंदना प्रभाकर पाटील पळासखेडा, जि. जळगाव, दादासाहेब दौलतराव शिंदे सिंदोन, जि.छत्रपती संभाजीनगर, बालाजी दत्तराव महादवाड डोंगरगाव, जि.नांदेड, कुंदन देवराव वाघमारे गीताई नगर, जि.वर्धा, नरसिंग थावराजाधव जवळा, जि.यवतमाळ या शेतकऱ्यांना समावेश आहे. तसेच कृषी शास्त्रज्ञांमध्ये मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव जि.सातारायेथील वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. दत्तात्रेय साहेबराव थोरवे, प्रोत्साहनार्थ पुरस्कार ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीचे प्रा. नीलेश अशोक नलावडे, समाज माध्यम शेतकरी मार्गदर्शक पुरस्कार बालिंगे जि. कोल्हापूर येथील सागर बापूसो कोपर्डेकर यांना देण्यात आला. यावेळी वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामासाठी प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष दीपक आसेगावकर व माजी प्राचार्य डॉ. उत्तम रुद्रावार यांना सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

---

## महत्वाचे

### भोसा येथे स्वातंत्र्यदिन साजरा

**यवतमाळ :** येथील प्रतिभा फाउंडेशनने १५ ऑगस्ट रोजी भोसा येथील नवजीवन सेवा संस्थेच्या निवासी मतिमंद विद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा करून एक सामाजिक आदर्श निर्माण केला. फाउंडेशनच्या संस्थापिका इंजि. प्रतिभा पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले डॉ. सुधा खडके व प्रतिभा पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सचिन शेळके, अतुल पवार, साधना पवार, संस्थेचे अध्यक्ष शेख रफिक, शारीक शेख, सगीर भाई अन्सारी व सर्व शिक्षक उपस्थित होते. या शाळेत नेहमीच उपयुक्त उपक्रम राबवू, असे आश्वासन पवार यांनी दिले.

### काठीने हल्ला

**उमरखेड :** 'तुमची गाय माझ्या घरासमोर कशी आली,' या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून चार जणांनी संगनमत करून माय-लेकाला काठीने मारहाण केल्याची घटना शुक्रवारी (दि. १५) सायंकाळी मुरली येथे घडली. याप्रकरणी बिटरगाव पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सिकंदर कृष्णा जाधव (वय २२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी प्रकाश बळीराम राठोड, अनिल गोकुळ राठोड, रोहिदास जयवंता राठोड आणि मनोहर जयवंत राठोड यांनी त्यांच्या घरासमोर येऊन वाद घातला. आरोपींनी त्यांना आणि त्यांच्या आईला शिवीगाळ करत लाकडी काठीने डोक्यात मारून जखमी केले.

---

# आर्णी प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी करण शेलकर

## उपाध्यक्षपदी इम्रान बेग यांची निवड, लोकशाही मार्गाने निवडणूक संपन्न

**आर्णी, दि. १८ प्रतिनिधी**



आर्णी प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी करण शेलकर यांची, तर उपाध्यक्षपदी इम्रान बेग यांची निवड झाली आहे. शुक्रवारी (दि. १५) लोकशाही मार्गाने पार पडलेल्या या चुरशीच्या निवडणुकीत, सचिवपदी रमेश राठोड यांची निवड करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही या निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते.

आर्णी प्रेस क्लबच्या कार्यकारणीचा एक वर्षाचा कार्यकाळ संपल्याने, शुक्रवारी (दि. १५) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात नव्या कार्यकारिणीसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. प्रेस क्लबच्या परंपरेनुसार, दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी लोकशाही मार्गाने निवडणूक घेऊन, नव्या पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रेस क्लबचे संस्थापक अध्यक्ष गणेश हिराळे, जाफर शेख, नौशाद अली आणि अरिफ शेख यांनी काम पाहिले. अध्यक्षपदासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत, करण शेलकर यांनी बाजी मारली. या निवडणुकीसाठी प्रेस क्लबच्या सर्व सदस्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून, त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संस्थापक अध्यक्ष गणेश हिरोळे, जाफर शेख, आरिफ शेख, नौशाद अली, करण शेलकर, राम होले, आशिफ शेख, इम्रान बेग, जफर पठाण, प्रशिक मुनेश्वर, राम पवार, चिंतामण चहांदे, सचिन चहांदे, रमेश राठोड, इरफान रजा, अनिकेत खरोळ आणि देवानंद पवार उपस्थित होते.

---

# मागासवर्गीयांना सत्तेत प्रतिनिधित्व मिळवून देणार

## डॉ. नीरज वाघमारे : वंचितच्या 'संवाद यात्रे'ला झरी तालुक्यात झंझावाती प्रतिसाद

**झरी जामणी, दि. १८ प्रतिनिधी**



शोषित आणि वंचित समाजाला जागृत करण्यासाठी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांनी सुरू केलेल्या 'पदाधिकारी व कायकर्ता संवाद यात्रे'ला दुर्गम आणि आदिवासीबहुल असलेल्या झरी तालुक्यात झंझावाती प्रतिसाद मिळाला. प्रस्थापित पक्षांनी आजपर्यंत बहुजनांना सत्तेपासून दूर ठेवले, आता बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात सत्ता संपादन करण्याची वेळ आली आहे, असे आवाहन डॉ. वाघमारे यांनी केले.

डॉ. वाघमारे यांनी १४ ऑगस्ट रोजी झरी तालुक्यातील जामणी, सतपल्ली, पाटण, जुनोनी, अडेगाव, राजुर आणि मांगली या गावांना भेटी देत कार्यकर्त्यांशी आणि नागरिकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, 'प्रस्थापित मनुवादी पक्षांनी आजपर्यंत अल्पसंख्यांकांना सत्तेत साधा प्रवेशही करू दिला नाही. मात्र, बाळासाहेब आंबेडकरांनी सर्व छोट्या-छोट्या समाज समूहांना सत्तेत वाटा मिळावा, यासाठी वंचित बहुजन आघाडीची स्थापना केली आहे. त्यामुळे, आपण सर्वांनी आघाडीच्या पाठीशी उभे राहावे. या दौऱ्यात डॉ. वाघमारे यांचे गावागावात जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा महासचिव मिलिंद पाटील, राजेंद्र निमसटकर, राजु कांबळे, प्रियल पथाडे, गौतम हस्ते, राजबा धोटे, महादेव धोटे, गगन ड्यागर्लावर, अशोक बट्टावार, अनुप भांदककर, शरद पळवेकर, सुखदेव वाघमारे, नवनाथ देवतळे, भूषण काटकर, गंगाधर बनकर, राजीव करमणकर, निकेश कांबळे, राजू धोटे, गौतम मून, उत्तम मून, गौतम बाराहाते, सुधाकर नरांजे, हेमराज नगराळे, अमर रामटेके आणि ओमप्रकाश तेलंग आदी पदाधिकारी उपस्थित होते.

---

# आमदार राजू तोडसाम यांनी होडीतून केली पूरग्रस्त भागाची पाहणी

## शेतकऱ्यांच्या बांधावर जात दिले मदतीचे आश्वासन; तहसीलदारांना पंचनाम्याचे निर्देश

**कैलास कोरवते**





**घाटंजी, दि.१८ :** तालुक्यातील पैनगंगा आणि वाघाडी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आमदार प्रा. राजू तोडसाम यांनी पूरग्रस्त गावांना भेट दिली. त्यांनी आळी, भीमकुंड, सावंगी संगम आदी गावांमध्ये जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. अनेक शेतांमध्ये पाणी साचल्याने रस्ते बंद होते, त्यामुळे त्यांनी होडीतून प्रवास करत आणि चिखल तुडवत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून नुकसानीची पाहणी केली. ४८ तासांनंतरही अनेक पिके पाण्याखाली असल्याने त्यांनी चिंता व्यक्त केली.

यावेळी त्यांनी पूरग्रस्तांना धीर देत, शासनाकडून तातडीने मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले. तसेच, घटनास्थळावरूनच तहसीलदारांना दूरध्वनी करून पंचनामे करण्याचे तत्काळ निर्देश दिले, ज्यामुळे उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी पारवा पोलिस स्टेशनचे ठाणेदार श्री नरसाळे, रमेश धुर्वे, बंडू तोडसाम, मुज्जू पटेल, बाळू जाधव, रितेश बोबडे, अमीत पडलवार, अरविंद जाधव, ईशान गुप्ते, प्रदीप टोंभरे, पोचारेडी जिधेवार, श्रीनिवास अण्णा, सुरेश अगीरकर, स्वामी मादेवार, जीवन मुद्दलवार, श्रीनिवास खांडेवार, प्रमोद अलुरवार, महेश श्रीपदवार, राकेश आपतवार, जितेंद्र अलुरवार, संदीप कोवे, सह शेकडो कार्यकर्ते आणि प्रत्येक गावातील नुकसाग्रस्त शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# मंगरुळ तांड्यात 'तीज' उत्सवाची सांगता

## नऊ दिवसांच्या व्रतानंतर 'गवारा' विसर्जन, पारंपरिक गीतांनी निनादला परिसर

**मंगरुळ, दि. १८ प्रतिनिधी**



नेर तालुक्यातील मंगरूळ येथील तांड्यात बंजारा समाजाचा नऊ दिवसांचा पारंपरिक 'तीज' उत्सव (गवारा) भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. निसर्ग आणि संस्कृतीचा अनोखा संगम असलेल्या या उत्सवाची सांगता, वाजत-गाजत मिरवणूक काढून आणि 'गवारा'चे विसर्जन करून करण्यात आली.

९ ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या या उत्सवात तांड्यातील अविवाहित तरुणींनी बांबूच्या टोपल्यांमध्ये गहू पेरून 'गवारा'ची स्थापना केली होती. घरात सुख-समृद्धी नांदावी, यासाठी त्यांनी नऊ दिवस उपवास करून दररोज सायंकाळी पारंपरिक बंजारा गीते गात 'गवारा'भोवती फेर धरला. शनिवारी, १६ ऑगस्ट रोजी या व्रताची सांगता झाली. यानिमित्त तांड्यातून वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली, ज्यात तरुणींनी 'गवारा' डोक्यावर घेऊन सहभाग घेतला. ही मिरवणूक जवळच्या नदीवर पोहोचली. जिथे 'गवारा'चे विधीवत विसर्जन करण्यात आले. हा सण म्हणजे बंजारा समाजाची गौरवशाली संस्कृती आणि निसर्गासोबत असलेले अतूट नाते जपण्याचा महत्वपूर्ण उत्सव आहे, असे तांड्याचे नायक यांनी सांगितले. या उत्सवामुळे संपूर्ण तांड्यात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

---

# गोदावरी अर्बनने देशातील सर्व राज्यात आपले कार्यक्षेत्र वाढवावे

## पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने: गोदावरी अर्बनची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात, ग्राहकांना ७ टक्के लाभांश जाहीर

**यवतमाळ, दि.१८ प्रतिनिधी**



गोदावरी अर्बनने अत्यंत कमी कालावधीमध्ये देशातील पाच राज्यात आपल्या कार्याचा ठसा उमटवला असून सहाव्या राज्यात शाखा उघडण्यासाठी परवानगी मिळाली आहे. संस्थेची वाटचाल पाहता येणाऱ्या काळात देशातील सर्वच राज्यात गोदावरी अर्बनचे कार्यक्षेत्र विस्तार होईल, असा विश्वास पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांनी व्यक्त केला. गोदावरी अर्बनची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे उद्घाटन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना ते म्हणाले की, मराठवाड्यातील एखाद्या पतसंस्थेने अत्यंत कमी कालावधीत ग्राहकांची विश्वासार्हता मिळवून उत्तुंग भरारी घेतली आहे, ही अभिमानास्पद बाब आहे.

गोदावरी अर्बनच्या कर्मचाऱ्यांमध्ये आता जी जिद्द व चिकाटी निर्माण करण्यात आली आहे. त्यात अध्यक्ष राजश्री हेमंत पाटील यांची मोलाची भूमिका आहे. संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, गोदावरी अर्बनचा वाढता आलेख सर्व कर्मचाऱ्यांच्या सचोटीने होत आहे. सर्व सामान्य नागरिकांना आधार देण्याचे काम गोदावरी अर्बन गेली बारा वर्षांपासून करीत आहे. संस्थेचे काटेकोर नियोजन व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर करीत आहेत. यावेळी बोलताना अध्यक्ष राजश्री पाटील म्हणाल्या की, मी जरी या संस्थेची अध्यक्ष असली तरी एक विश्वस्त म्हणून काम पाहते. संस्था कायमच सर्व सामान्यांच्या स्वप्नांना आकार देण्याचे काम करीत असून यापुढेही करीत राहील असा ठाम विश्वास उपस्थितांना दिला. माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा म्हणाले की, नांदेडच्या भूमीत लावलेले हे छोटेसे रोपटे इतके मोठे झाले हे मला संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पाहून लक्षात आले. गोदावरी अर्बनची घोडदौड अत्यंत पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. यावेळी संस्थेच्या ग्राहकांना ७टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. संस्थेच्या वतीने साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त प्रा.डॉ. सुरेश सावंत, महाराष्ट्र शासनाचा कै. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकारितेतील सर्वोच्च पुरस्कार प्राप्त लेखक तथा पत्रकार संदीप काळे व महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार प्राप्त सचिन मोहिते यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'गोदावरी कार्निव्हल'चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सहभागी स्पर्धकांपैकी अर्धापूर शाखेचे शाखाधिकारी सोमेश संगेवार 'गोदावरी किंग' तर सेन्ट्रल ऑपरेशन हब मुंबईच्या मनाली प्रधान यांची 'गोदावरी क्वीन'म्हणून निवड करण्यात आली. या पुरस्काराचे स्वरूप एकावन्न हजार व सन्मानपत्र आहे. दरवर्षी संस्थेत उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. उत्कृष्ट शिपाई अवॉर्ड भूषण काळमेघ-कळंब शाखा, उत्कृष्ट कनिष्ठ अधिकारी अवॉर्ड हेमंत उम्रतकर-कळंब शाखा, उत्कृष्ट सहाय्यक अधिकारी अवॉर्ड बेग मिर्झा दिलशाद मिर्झा फरहत-दारव्हा शाखा, उत्कृष्ट अधिकारी अवॉर्ड गजानन पाटील- सिडको शाखा, उत्कृष्ट सहाय्यक व्यवस्थापक अवॉर्ड चेतन पटेलिया-घाटंजी शाखा, उत्कृष्ट उप-व्यवस्थापक अवॉर्ड अविनाश बोचरे-मुख्य शाखा, उत्कृष्ट शाखा व्यवस्थापक अवॉर्ड विजय मोडक-वणी शाखा यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सभेच्या प्रारंभी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मागील सभेच्या इतिवृत्ताचे व अहवालाचे वाचन करताना संस्थेचा आर्थिक वर्षातील लेखाजोखाचा सादर केला. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात संस्थेच्या २७०० कोटी रुपयांच्या ठेवी असून ४७०० कोटींचा एकूण व्यवसाय संस्थेने केला. मागील वर्षीच्या तुलनेत १६.७६टक्के इतकी लक्षणीय वाढ संस्थेच्या एकूण व्यवसायात झाली आहे. ४२७ कोटींची तरलता गुंतवणूक, २१७८ कोटींचे कर्ज वितरण, ७०.०४टक्के सि.डी. रेशो तर या आर्थिक वर्षात ४७ कोटी १९ लाख एकूण नफा झाला असून, सहकारकायद्यानुसार आवश्यक तरतुदी वजा जाता २७ कोटी ५४ लाख एवढा शुद्ध नफा झाला आहे. अर्धापूरचे शाखाधिकारी सोमेश संगेवार यांनी संचालन केले. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थापक ना. हेमंत पाटील, नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर, माजी आमदार गजानन घुगे, अध्यक्ष राजश्री पाटील, उपाध्यक्ष हेमलता देसले, सचिव ॲड. रवींद्र रगटे, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, संचालक प्रा. सुरेश कटकमवार, वर्षा देशमुख, अजय देशमुख, साहेबराव मामिलवाड, यशवंत सावंत, नैसन्सच्या संस्थापक सुमालता राव, सुधन गोल्ड लोनचे व्यवस्थापकीय संचालक संदीप कोयटे, वैधानिक लेखापरीक्षक जीवन लाभशेटवार, उ.अ. अली असगर हुसैन, डेप्युटी जनरल मॅनेजर सुरेखा दवे, असिस्टंट जनरल मॅनेजर रवी इंगळे, विजय शिरमेवार, सीनियर मॅनेजर आनंद संगावार यांच्यासह पाच राज्यातील अधिकारी-कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# पैनगंगेला पूर, पळशी गाव पाण्याने वेढले

## २००६ च्या महापुराच्या आठवणीने ग्रामस्थ भयभीत; प्रशासन 'अलर्ट मोड'वर, ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी हलवण्याची शक्यता

**उमरखेड, दि.१८ प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यात पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे पळशी गाव पाण्याने वेढले गेले असून, २००६ च्या महापुराची पुनरावृत्ती होण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रशासन 'अलर्ट मोड'वर असून, कोणत्याही क्षणी ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी हलवण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.





इसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्याने आणि संततधार पावसामुळे पैनगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. पुराच्या पाण्याने पळशी गावाला चहूबाजूंनी वेढा घातला आहे. परिस्थिती आणखी गंभीर झाल्यास, २००६ प्रमाणेच पळशी, देवसरी आणि चिंचोली येथील नागरिकांना स्थलांतरित करावे लागण्याची शक्यता आहे. या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आमदार किसनराव वानखेडे आणि भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी महसूल अधिकाऱ्यांसह गावाला भेट दिली. त्यांनी प्रशासनाला सुरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. वृत्त लिहिस्तोवर ग्रामस्थांना स्थलांतरित करण्यात आले नव्हते, मात्र पाण्याची पातळी वाढत असल्याने प्रशासन परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे. या संकटामुळे नदीकाठच्या ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

### आमदार वानखेडे यांनी बोलावली तातडीची बैठक

**उमरखेड :** उमरखेड-महागाव मतदारसंघात १५ ऑगस्टपासून सुरू असलेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे झालेल्या प्रचंड नुकसानीचा आढावा घेण्यासाठी आमदार किसनराव वानखेडे यांनी मंगळवारी (दि. १९) तातडीची बैठक बोलावली आहे. येथील पंचायत समिती सभागृहात दुपारी २ वाजता ही बैठक होईल. या पावसामुळे सुमारे एक लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून, अनेक घरे उद्धवस्त झाली आहेत. नैसर्गिक आपत्तीसह काही शासकीय यंत्रणांच्या चुकांमुळेही पूरस्थिती गंभीर झाल्याचा आरोप होत आहे. या बैठकीत नैसर्गिक व कृत्रिम आपत्तीच्या कारणांवर चर्चा करून, भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी उपाययोजनांवर देखील भर दिला जाईल. या बैठकीला मतदारसंघातील सर्व संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी हजर राहणार आहेत, असे देखील कळविण्यात आले आहे.

# इसापूर धरणाचे १३ दरवाजे दीड मीटरने उघडले

## पैनगंगा नदीला पुन्हा पुराचा धोका; ६३,८६० क्युसेक पाणी नदीपात्रात

**उमरखेड, दि.१८ प्रतिनिधी**

इसापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची आवक वाढल्याने, आज दुपारी १२ वाजता धरणातून पैनगंगा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे. सध्या धरणाचे १३ दरवाजे दीड मीटरने उघडण्यात आले असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



इसापूर धरणाच्या वरच्या बाजूला असलेल्या जयपूर बंधाऱ्यातून पाण्याचा विसर्ग वाढत असल्याने, धरणातील पाणी पातही नियंत्रित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. आज दुपारी १२ वाजता आणखी २ दरवाजे उघडून, एकूण १३ दरवाजे दीड मीटरने उघडण्यात आले आहेत. या १३ दरवाजांमधून पैनगंगा नदीत तब्बल ६३,८६० क्युसेक (१८०८.३० क्युमेक्स) पाण्याचा प्रचंड विसर्ग सुरू आहे. धरणात येणाऱ्या पाण्याची आवक पाहून विसर्ग आणखी वाढविण्याबाबत किंवा कमी करण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे इसापूर धरण पूरनियंत्रण कक्षाने कळविले आहे. या वाढलेल्या विसर्गामुळे पैनगंगा नदीला पूर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नदीकाठच्या आणि पुरामुळे बाधित होणाऱ्या गावांतील नागरिकांनी खबरदारी घ्यावी, आपली मालमत्ता आणि जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## महत्वाचे

### गणेश गुजर यांच्या भक्तिगीतांचे प्रसारण बुधवारी

**यवतमाळ :** येथील नादब्रह्म संगीत विद्यालयाचे संचालक आणि सुप्रसिद्ध गायक गणेश गुजर यांच्या स्व-रचित भक्तिगीतांचे प्रसारण नागपूर आकाशवाणी केंद्रावरून होणार आहे. 'सुगम संगीत' या कार्यक्रमाअंतर्गत आज, सोमवार (दि. १८) आणि बुधवार (दि. २०) रोजी सकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी या भक्तिगीतांचा आस्वाद श्रोत्यांना घेता येईल. या प्रसारणात राष्ट्रसंत श्रीगुरुदेव तुकडोजी महाराज, स्व. कवी गजेश तोंडरे आणि स्व. कवी शिवा राऊत यांच्या लेखणीतून साकारलेल्या रचनांचा समावेश आहे. दोन्ही दिवशी वेगवेगळ्या रचना प्रसारित होणार असल्याची माहिती गणेश गुजर यांनी दिली. आपण नेहमीच माझ्या कलेवर प्रेम केले आहे आणि यापुढेही कराल, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी सर्व रसिक श्रोत्यांचे आभार मानले आहेत.

## निधन



### प्रभाकरराव देशमुख

**यवतमाळ :** येथील लोकनायक बापूजी अणे विद्यालयाचे माजी शिक्षक व मुख्याध्यापक प्रभाकरराव देशमुख (वय ८२) यांचे सोमवारी (दि. १८) त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने शहरातील शैक्षणिक आणि सामाजिक वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार, त्यांचे पार्थिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला वैद्यकीय संशोधनासाठी दान करण्यात आले. त्यांच्या या उदात्त निर्णयामुळे त्यांनी समाजापुढे एक नवीन आदर्श ठेवला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, दोन नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

# विशेष पदभरतीसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचा मोर्चा

## ८५ हजार रिक्त पदे तत्काळ भरण्याची मागणी; घोषणाबाजीने दणाणला परिसर

**यवतमाळ, दि.१८ प्रतिनिधी**

अनुसूचित जमातीची १२,५२० पदांची विशेष भरती आणि इतर ८५,००० रिक्त पदे तत्काळ भरण्याच्या मागणीसाठी, आज यवतमाळात आदिवासी विद्यार्थ्यांनी भव्य मोर्चा काढला. बिरसा मुंडा चौकातून निघालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला, जिथे शिष्टमंडळाने निवेदन सादर केले.



सोमवारी सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या मोर्चात जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे शेकडो विद्यार्थी सहभागी झाले होते. 'एकजूट हीच ताकद' अशा घोषणा देत, त्यांनी शासनाचे लक्ष वेधले. या मोर्चाला राजमुद्रा प्रतिष्ठान आणि शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनीही पाठिंबा दिला. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. निनाद सुरपाम म्हणाले, 'संघटित शक्तीमुळे कोणतीही लढाई जिंकता येते. त्यामुळे तरुणांनी आपले ध्येय ठरवून चिकाटीने प्रयत्न करावेत.' आंदोलकांनी मागण्या मान्य न झाल्यास लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. निवेदन देताना राजमुद्रा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन मिर्झापूरे, प्रा. निशांत सिडाम, प्रेम धुर्वे, गौरीशंकर कन्नाके, धीरज मोरे, श्रीकांत वायदंडे, कृष्णा पुसनाके आणि प्रा. पंढरी पाटे उपस्थित होते. या मोर्चाने प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

# उमरखेड तालुक्यात पूरस्थिती गंभीरच

**यवतमाळ, दि.१८ प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यात पूरस्थिती सलग तिसऱ्या दिवशीही गंभीर बनली असून, पैनगंगा नदीकाठची अनेक गावे अद्यापही पुराच्या विळख्यात आहेत. इसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग पुन्हा वाढविल्याने पाणी पातळी वाढत असून, प्रशासनाने शेकडो कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविले आहे.



रविवारी पावसाने थोडी उसंत घेतल्याने इसापूर धरणाचे दोन दरवाजे बंद केले होते. मात्र, रात्री पाणलोट क्षेत्रात पुन्हा पाऊस सुरू झाल्याने, सोमवारी सकाळी धरणातून पुन्हा मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. यामुळे पैनगंगेच्या पुराचा फटका बसलेल्या गावांची स्थिती आणखी बिकट झाली. अनेक गावांचा संपर्क तुटलेलाच असून, हजारो हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पुराचे पाणी घरात शिरल्याने अनेक घरांची पडझड झाली असून, नागरिक बेघर झाले आहेत. 'तालुक्यातील ३०० ते ४०० कुटुंबांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले असून, त्यांच्या जेवणाची आणि निवाऱ्याची व्यवस्था प्रशासनामार्फत केली जात आहे. आम्ही परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहोत, ' अशी माहिती तहसीलदार राजेश सुरडकर यांनी दिली. या नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिकांचे मोठे हा होत आहेत.

# वणी परिसरात ६० वर्षीय वृद्धाचा दगडाने ठेचून निर्घृण खून

## नग्नावस्थेत आढळला मृतदेह, मंदर शिवारातील घटनेने खळबळ

**वणी, दि. १८ प्रतिनिधी**

वणी शहरातील मंदर शिवारातील गौरी विहार लेआऊटमध्ये, एका ६० वर्षीय वृद्धाचा दगडाने ठेचून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. १८) पहाटे उघडकीस आली. देवराव गुंजेकर (६०, रा. वागदरा) असे मृत वृद्धाचे नाव असून, ते भंगार वेचण्याचे काम करत होते. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.




सोमवारी पहाटे फिरायला गेलेल्या काही नागरिकांना, एका वृद्धाचा नग्नावस्थेतील आणि रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह आढळून आला. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, पोलिस निरीक्षक गोपाल उंबरकर, सहायक पोलिस निरीक्षक निलेश अपसुंदे, दत्ता पेंडकर आणि पोलिस उपनिरीक्षक धीरज गुल्हाने यांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात, मृतकाच्या चेहऱ्यावर आणि डोक्यावर दगडाने वार करून हत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे. मृतकाचे कपडे जवळच असलेल्या एका सिमेंट चेंबरमध्ये आढळून आले. पोलिसांनी नातेवाईकांच्या मदतीने मृतकाची ओळख पटवली असून, पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. ही हत्या नेमक्या कोणत्या कारणातून झाली, याचा पोलिस कसून तपास करत आहेत. या निर्घृण हत्येमुळे वणी शहरात खळबळ उडाली असून, आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी जोर धरत आहे.

# दुचाकी चोरट्यास अटक

**यवतमाळ, दि. १८:** येथील लोहारा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत मोठी कारवाई करत, नेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेली मोटारसायकल जप्त करून एका संशयित चोराला अटक केली आहे. रविवारी (दि. १७) गस्तीवर असलेल्या डीबी पथकाला वाघापूर परिसरात एक व्यक्ती संशयास्पदरित्या फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. पथकाने नाग मंदिराजवळ सापळा रचून त्याला ताब्यात घेतले असता, चौकशीत ती दुचाकी (क्रं. एमएच २९, एन ३०५३) चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार रोहित चौधरी यांच्या नेतृत्वात संतोष आत्राम, पवन चिरडे, प्रशांत राठोड आदींच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. आरोपीला पुढील तपासासाठी नेर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# पुरामुळे २७१५ हेक्टरवरील पिके पाण्याखाली

## आमदार राजू तोडसामांकडून पाहणी; आर्णी, घाटंजी तालुक्यातील १७ गावांना फटका

**आर्णी, दि.१८ प्रतिनिधी**

पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे बाधित झालेल्या आर्णी व घाटंजी तालुक्यातील गावांची आमदार राजू तोडसाम यांनी आज पाहणी केली. त्यांनी बोटीने प्रवास करत नुकसानीचा आढावा घेतला आणि बाधितांना धीर देत, प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.



१६ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळेआणि धरणातून सोडलेल्या पाण्याने तालुक्यातील १७ गावांना पुराचा फटका बसला आहे. तहसील कार्यालयाच्या माहितीनुसार, आतापर्यंत २७१५ हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली असून, ३११२ शेतकरी बाधित झाले आहेत. आमदार तोडसाम यांनी आज सकाळी राणीधानोरा, मुकिंदपूर, साकूरसह अनेक गावांना भेट दिली. 'गेल्या चार वर्षांपासून पुरामुळे आमचे मोठे नुकसान होत आहे,' अशी व्यथा शेतकऱ्यांनी त्यांच्यासमोर मांडली. त्यांनी पूरग्रस्त शेतकरी व नागरिकांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. एक घर पूर्णतः कोसळले असून, २४ घरांमध्ये पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे सर्वेक्षण करून अहवाल तत्काळ सादर करावा, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी त्यांच्यासोबत विलास राऊत पाटील, मंगेश वानखेडे, निखिल ब्राह्मणकर यांच्यासह अनेक स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी त्यांच्यासोबत गावातील सरपंच, उपसरपंचासह प्रतिष्ठीत विलास राऊत पाटिल, मंगेश वानखडे, निखिल ब्राम्हणकर, विलास पाटिल गावंडे, किसन लडके, बबलू तिवारी, शैलेश ठाकूर, रघुनाथ ठाकरे, लक्ष्मण वारंगे, शिवाजी भालेवाड, योगेश चौधरी, संदीप चौधरी, शुभम चिलकेवाड, विवेक पांडे, संतोष गावंडे, दिलिप हजारे सोबत होते.

# "आम्ही आमच्या देवा भाऊंच्या सदैव पाठीशी"

## यवतमाळ जिल्ह्यातील सव्वालाख बहिणींनी पाठविली राखी



**यवतमाळ, दि.१८ प्रतिनिधी**

'रक्षाबंधनाचा पवित्र धागा (रक्षासूत्र) आणि 'आम्ही आमच्या देवा भाऊंच्या सदैव पाठीशी'हे कृतज्ञतेचे शब्द व्यक्त करीत यवतमाळ जिल्ह्यातील एक लाख २५ हजार (सुमारे सव्वालाख) बहिणींनी, आपले 'देवा भाऊ' अर्थात राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना रक्षासूत्र पाठविले आहे. 'शासनाच्या योजनेतून मिळालेल्या आर्थिक सक्षमतेबद्दल, या लाडक्या बहिणींनी पत्रांद्वारे आपल्या भावना व्यक्त करत अनोखे रक्षाबंधन साजरे केले आहे.



> 'रक्षा बंधन हा सण बहीण आणि भावामधील नात्याची वीण घट्ट करणारा आहे. शिवाय, नैतिक जबाबदारीची शिकवण देणारा आहे. बहिणीने रक्षासूत्र बांधावे आणि भावाने तिच्या सुरक्षेची जबाबदारी घ्यावी, हेच हा सण शिकवत असतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील लाखो लाडक्या बहिणींच्या सुरक्षेची आणि त्यांना सक्षम करण्याची जबाबदारी स्वीकारली. म्हणूनच 'आमचा भाऊ, देवा भाऊ' या उपक्रमाला जिल्ह्यातील बहिणींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.'
>
> –शैला मिर्झापूरे,
> जिल्हाध्यक्ष, भाजप महिला मोर्चा.



रक्षाबंधन म्हणजे भाऊ-बहिणींच्या नात्याचा पवित्र सण. याच सणाला यवतमाळ जिल्ह्यात एका अनोख्या सामाजिक आणि भावनिक उपक्रमाची जोड मिळाली. भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या वतीने, 'आपला भाऊ, देवा भाऊ' या उपक्रमांतर्गत, जिल्ह्यातील सुमारे एक लाख २५ हजार महिलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी राख्या पाठविल्या. या राख्या, राज्याचे माजी मंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते मदन येरावार आणि जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांच्याकडे भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापूरे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी सुपूर्द केल्या. या राख्या मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविल्या जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी, भाजपने महिलांना मानधन सुरू करून आर्थिकदृष्ट्या सबळ करण्याचा प्रयत्न केला होता. याच निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, महिलांनी राख्यांसोबत भावनिक पत्रेही लिहिली आहेत. याप्रसंगी जिल्हा महामंत्री रेखा कोठेकर, प्रदेश चिटणीस माया शेरे, माजी जिल्हाध्यक्ष कीर्ती राऊत, अनुसूचित जाती मोर्चाच्या माजी जिल्हाध्यक्ष निर्मला विणकरे, जिल्हा सहसंयोजिका माधुरी केवटे यांच्यासह महिला मोर्चाच्या अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी सर्व प्रभारी, संयोजिका, सहसंयोजिका यांनी परिश्रम घेतले. 'राख्यांसोबत पाठविलेल्या पत्रांमधून बहिणींनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.' त्या लिहितात, 'देवा भाऊ, राखीला तू आमच्या बहिणीचा मान दिला आणि आम्हाला सक्षमतेचे दान दिले. या आर्थिक सक्षमतेमुळे आमच्या कुटुंबाला हातभार लागला आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे बळ मिळाले. आम्ही आमच्या देवा भाऊच्या पाठीशी सदैव उभे राहू,' असे अभिवचन या बहिणींनी दिले आहे. हा 'आपला भाऊ, देवा भाऊ' उपक्रम, माजी मंत्री मदन येरावार आणि जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आला.' भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापूरे यांनी सांगितले की, 'जिल्ह्यातील यवतमाळ, राळेगाव, कळंब, बाभूळगाव, वणी, मारेगाव, आर्णी, घाटंजी आणि पांढरकवडा येथील १९ ग्रामीण आणि शहरी मंडळांमधून सुमारे एक लाख २५ हजार राख्यांचे संकलन करण्यात आले.'